
अर्थ
ऑगस्ट '७५ • ३ रुपये
संचालक मंडळींनी नियुक्त केलेल्या अर्थ तज्ज्ञांनी कंपनीच्या भावी विकासाची जी योजना दिली आहे त्यातील आकड्यांचा भाग फारसा लक्षात घेऊ नये !
ह्याचे कारण....अब्ज,कोटी ,दशलक्ष इत्यादी रूपये मिळवणे ,उसने उभे करणे वा गुंतवणे ह्या गोष्टी त्यांच्या अनुभवाच्या पलिकडे आहेत !!
म्हणून मुद्याचा भाग हा की..............!!!

# अर्थ मासिकासंबंधी थोडी माहिती

प्रा. बा. गो. काळे ह्यांनी 'अर्थ' हे नियतकालीक आर्थिक प्रश्नांची सामान्य जनांस माहिती व्हावी व त्यातून महाराष्ट्राचा आर्थिक अभ्युदय होत रहावा, ह्या ध्येयाने १९३५ मध्ये सुरू केले. त्यांच्या निधनानंतर १९४६ ते डिसेंबर १९७४ पर्यंत त्यांचे चिरंजीव, प्रख्यात लेखक व विचारवंत श्रीयुत श्री. बा. काळे ह्यांनी न्या. रानडे व प्रा. काळे ह्यांची समाजहितेच्छू परंपरा चालू ठेवण्याच्या निष्ठेने हे कार्य पुढे चालविले.

वैयक्तिक जबाबदारीवर आणि कोणत्याही व्यापारी संस्था, उद्योग-समूह वा राजकीय पक्ष इत्यादींचे मिंधे न होता ध्येयवादी प्रेरणेने चालविलेले, आर्थिक विषयांना वाहिलेले हे एकमेव नियतकालिक, त्याच ध्येयधोरणांशी सुसंगती राखून आम्ही पुनरुज्जीवित करण्याचा संकल्प केला आहे.

आपल्या ह्या मासिकात-आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, महाराष्ट्रीय स्तरांवरच्या आर्थिक घडामोडी, उद्योग-कारखानदारी, व्यापार, स्वतंत्र व्यवसाय, व्यवस्थापन, चलन, वित्त, बँकिंग, नियोजन, विकास, शेती, ग्रामीण उद्योग, सहकार, श्रमिक, तरुणांना उपयुक्त मार्गदर्शन, कॉलेज व हायरसेकंडरी अभ्यासक्रमास संदर्भ व पूरक वाचन, नवीन प्रक्रिया, यंत्रे, प्रकल्प ह्यांना प्रसिद्धी, गृहोपयोगी अर्थशास्त्र आणि ग्रंथपरिचय, ह्यांसारख्या जिव्हाळ्याच्या आर्थिक विषयांच्या अभ्यासाचे उपयुक्त साहित्य उपलब्ध होईल.

अर्थतज्ज्ञ, नामवंत प्राध्यापक, यशस्वी व उमलते उद्योगपती-व्यापारी-बँकर-सहकारी नेते-श्रमिक संघटक इत्यादींकडून लेख मिळविण्याचा आमचा प्रयत्न राहील. त्यामुळे सिद्धांताचा अभ्यास करणाऱ्यांना व्यवहाराची (Application) माहिती होते. तसेच व्यवहारात यशस्वी झालेल्या व्यक्तींना तात्त्विक बैठक व आर्थिक धोरणाविषयी योग्य अंदाज करण्यास उपयुक्त व अद्ययावत माहिती मिळणे शक्य होईल.

सध्याच्या युगात आर्थिक संघर्ष जास्त निकराचा झाला आहे. आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी आर्थिक प्रश्नांचे समग्र ज्ञान प्राप्त करून घेणे, हे सर्वांना अनिवार्य झाले आहे. ह्या दृष्टीने अर्थ हे मासिक आपल्या संस्थेतील सर्व घटकांच्या वाचनात यावे तसेच वैयक्तिक स्वतःच्या संग्रहीदेखील असावे, असे आपणास अर्थातील साहित्याच्या उपयुक्ततेमुळे वाटत राहील. अर्थचा दर्जा त्या दृष्टीने सतत अधिक चांगला होत रहावा, ह्या दृष्टीने आमचे परिश्रम सातत्याने चालू राहतील.

आपण ह्या मासिकाचे वाचक, लेखक, टीकाकार तसेच शक्य असल्यास जाहिरातदार होऊन ह्या चांगल्या कार्यास उदार आश्रय द्यावा, ही विनंती.

आपले नम्र

कमलाकर परचुरे सुभाष बर्वे भालचंद्र राव

---

### चेंबर ऑफ कॉमर्स व इण्डस्ट्रीजचे सभासद, बँकर्स, व्यापारी, कन्सल्टंट्स व उद्योगपती ह्यांसाठी

अर्थमध्ये आम्ही 'उद्योग-वार्ता' हे सदर सुरू करीत आहोत. त्यात आपण केलेल्या उत्पादनातील नवीन तंत्रांचा वापर, उत्पादनवाढीचे प्रकल्प, आयातपर्यायतेकरिता केलेले विशेष प्रयोग तसेच खर्च व किमती कमी करून गुणवत्ता वाढवण्याकरता केलेले प्रयत्न ह्यांना विशेष प्रसिद्धी दिली जाईल.

शासन, समाज, अर्थतज्ज्ञ व संबंधित संस्था ह्यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या दृष्टीने आपण आपल्या उद्योग-व्यवसायातील अडचणी व त्रुटी ह्यांच्यासंबंधी मोकळेपणाने आपले विचार लेख वा मुलाखत ह्यांच्याद्वारे मांडावेत. आपले हे मासिक त्या दृष्टीने एक फार उपयुक्त व चांगले माध्यम होऊ शकेल. जनतेतील तसेच शासक वर्गातील आपल्यासंबंधी असलेले पूर्वग्रह व गैरसमज दूर होण्यास त्याची मदत होईल. अशा प्रकारच्या लेखनातील वेळ व त्रास वाचविण्याच्या दृष्टीने आम्ही आवश्यक ते सहकार्य देण्यास सदैव उत्सुक आहोत.

### रचनात्मक कार्य करणाऱ्या लोकनेते व सहकारी चळवळीतील संघटकांसाठी विनंती विशेष

शहरी विचारवंत व ग्रामीण परिसरातील कृषि-उद्योग चळविणाऱ्या कार्यकर्त्यात अंतर पडू नये, ह्या दृष्टीने आपण कार्यान्वित केलेल्या विविध लोकोपयोगी आर्थिक प्रकल्पांची माहिती अशा मासिकातून वेळोवेळी प्रसिद्ध होणे अगत्याचे आहे. शहरी लोकांचे पूर्वग्रह नाहीसे करण्याकरता कोणतेही कार्य उभे करताना ग्रामीण भागात कोणत्या अडचणी येतात, ह्यांची इतरेजनांस जाणीव देणे तितकेच आवश्यक झाले आहे. यांत्रिकीकरण तसेच विज्ञाननिष्ठ आधुनिकीकरणाचा वेग इतका प्रचंड आहे की शहर व खेडे ह्यांतील फरक केवळ कृत्रिमच राहील, अशी आता तरी स्थिती आहे.

आपल्या परिसरातील नव्या उमेदीच्या तरुण कार्यकर्त्यास एकूण जागतिक व राष्ट्रीय स्तरावरची आर्थिक माहिती अद्ययावतपणे होणे जरुरीचे झाले आहे. ह्या दृष्टीने त्यांच्या आकांक्षा व आवाका वाढविण्याकरिता अर्थचे वाचन व त्यावरील विचारमंथन आपल्या पुढाकाराने शक्य होईल.

आपण केलेल्या आर्थिक प्रगतीबद्दलचे समाधान कोणाला तरी सांगावे, असे वाटणे साहजिक आहे. त्याचप्रमाणे आपल्या भागातील आर्थिक प्रकल्पांकरता कोणत्या अडचणी येतात तेही इतरांना सांगितले गेले तर अशा सुसंवादाने अडचणी निवारण करण्याच्या दृष्टीने योग्य ते धोरण व कार्यवाही होण्यास अनुकूल वातावरण तयार होत असते.

ह्या दृष्टीने आपले लेख व हृद्गत अर्थ मासिकात छापण्यास आम्हाला फार आनंद होईल.

अर्थचे धोरण 'अकरणात्मक' ( Negative ) नाही. कार्य करणाऱ्यांच्या हातूनच चुका होतात; त्यांच्या कार्यात त्रुटी राहतात. पण कार्यात काय साधले, कितपत साधले आणि झाले त्यापेक्षा अजून चांगले होण्याकरिता काय करणे आवश्यक होते... ह्या गोष्टींना आमच्या दृष्टीने जास्त महत्त्व देणे उचित होईल.......... ह्या विचारांशी आपण सहमत असाल ह्या अपेक्षेने आपल्याकडून योग्य ते सहकार्य मिळत राहील असे वाटते.

क्रम :


१. आलोक
२. सौ. कुमुद पोरे
३. डॉ. वसंतराव पटवर्धन
४. प्रा. प्र. वि. सोवनी
५. राजेंद्र पटवर्धन
६. प्रा. राम बिवलकर
७. प्रा. वि. ज. गोडबोले
८. प्रा. अरविंद पुराणिक
९. अरविंद महादेव पटवर्धन
१०. डॉ. बोकील
११. कुलकर्णी
१२. श्यामकान्त देशपांडे
१३. वाचकांची पत्रे
१४. श्री. वा. काळे



# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक
दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : पहिले अंक : पाचवा : ऑगस्ट ७५
किंमत : ३ रुपये वार्षिक वर्गणी : ३० रुपये


## आलोक

### जग–सागरी सार्वभौमत्वाचा प्रश्न

भारतीय समुद्रातील दिगो गार्शिया तळ, सुवेज कालवा, तसेच मायागेझ जहाजाचे प्रकरण अशा अनेक कारणांनी आंतरराष्ट्रीय महासभेपुढे सागरी सार्वभौमत्वाचा कायदा संमत करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची निकड भासू लागली आहे. नुकतीच १४० राष्ट्रांची अनौपचारिक बैठक झाली. सागरी वाहतुकीचे महत्त्व आंतरराष्ट्रीय व्यापारात फार आहे. जागतिक व्यापारातील ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गेच होतो. पृथ्वीचा एकूण ७० टक्के भाग समुद्रानेच व्यापला आहे. समुद्रातील संपत्ती विशेषतः पेट्रोल व इतर वायू, तसेच मासे, प्रवाळ, रत्ने ह्यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच राहील. नव्या संहारक अस्त्रांचे प्रयोग समुद्रतळातच होत असल्याने प्रदूषणाचा व सागरातील जलचर प्राण्यांच्या संहाराचा प्रश्नही विचारात घेण्यासारखा आहे. आगामी ३० वर्षांत, जहाजांच्या एकूण संख्येत चौपटीने वाढ होईल असा अंदाज आहे. २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत आरमारी सामर्थ्य, तसेच जलवाहतूक ह्यांत इंग्लंड, अमेरिका, जपान, फ्रान्स, डेन्मार्क, जर्मनी व रशिया ह्या प्रगत देशांचा वाटा मोठा होता. १९६० नंतर विकसनशील देशांनीही आपल्या सागरी वाहतूकक्षमतेत वाढ केली आहे. तेलांनी श्रीमंत झालेल्या राष्ट्रांजवळ गेल्या २-३ वर्षांत, जहाजांची संख्या वाढली आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या परिसरातील समुद्रावरची अधिसत्ता वाढवावी अशा प्रेरणेने प्रयत्नशील झाले आहे. १९७० मध्ये यूनोने सामूहिक चर्चेने सागरी अधिसत्ता ठरविण्याकरिता एक आचारसंहिता तयार करण्याच्या प्रश्नाला चालना दिली होती. १९ व्या शतकापर्यंत किनाऱ्यापासून ३ मैल सागरी क्षेत्रावर जवळच्या देशाची सत्ता मान्य करण्याचा संकेत होता आणि उरलेला समुद्र सर्वांच्याच मालकीचा. जसे आकाशात उड्डाण व संचार करण्याचा काही मर्यादित प्रमाणावर मूलभूत मानवी हक्क संमत आहे, त्याचप्रमाणे समुद्रावर नागरी वाहतूक व व्यापार करण्याचा मूलभूत हक्क उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा असते. नुकत्याच झालेल्या बैठकीत किनाऱ्यापासून २५ मैल क्षेत्रावर जवळच्या देशाची सार्वभौम सत्ता असावी असे ठरते आहे. ह्याचे कारण नव्या आरमारी अस्त्रांचे पल्ले वाढले आहेत म्हणून संरक्षणाच्या दृष्टीने ते आवश्यक झाले आहे. त्याचप्रमाणे २५ मैलांच्या सागरी क्षेत्रात 'मुंबई हाय 'सारख्या पेट्रोलखाणी सापडल्यास त्यांचा फायदा त्या देशाला मिळावा

असे वाटणे स्वाभाविक आहे; पण काही देशांच्या किनाऱ्यापासून २०० मैल अंतरावर मासे सापडतात, तसेच पेट्रोल, खनिज संपत्ती व नैसर्गिक वायू उपलब्ध आहेत. अशा वेळी पेचप्रसंग निर्माण होतो की सार्वभौमत्व कोणत्या मर्यादेपर्यंत वाढवायचे? किनाऱ्यापासून दूर खोल समुद्रात मँगॅनीज, निकेल, कोबाल्ट, तांबे आणि इतर मौल्यवान धातू सापडतात व सध्या ह्या गोष्टी जमिनीतून काढूनही अपुऱ्या भासत आहेत. म्हणूनच यूनोने खोल समुद्राचा ठाव घेण्याचा हक्क सर्व मानवांना सारखा आहे असे तत्त्व मान्य केले आहे. तसेच २०० मैलांचा मत्स्योद्योग व खनिज उद्योगांचा राखीव पट्टाही तत्त्वतः मान्य झाला आहे; पण ह्या दोन्ही संकेतांचा फायदा औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांनाच जास्त होईल. कारण त्यांचे तंत्र अधिक विकसित झाले आहे. कोणताही कायदा झाला की त्याचा फायदा अधिक शक्तिमान व संपन्न देशांनाच होईल असा संशय व भीती अविकसित राष्ट्रांना वाटणे साहजिक आहे. म्हणून विकसित व विकसनशील राष्ट्रांनी समुद्राचा उपयोग दोन्ही गटांच्या हिताचा साधताना विकसनशील राष्ट्रांच्या पदरात जास्त माप घातल्यास सर्व जगाचे हित अधिक होईल. ह्या संदर्भात रशिया व जपान ह्यांच्यात, तसेच अमेरिका व कॅनडा ह्यांच्यात मत्स्योद्योगाच्या बाबतीत जे सहकार्याचे करार झाले आहेत ते उल्लेखनीय आहेत; पण एक-दोन देशांनी एवढे करून भागण्यासारखे नाही. जगातल्या सर्व देशांनी समुद्रसंपत्तीचा जास्तीत जास्त चांगला उपयोग कसा होईल ह्याचा एकत्र विचार करणे अगत्याचे झाले आहे.

## अवकाशाचे सार्वभौमत्व

जे समुद्राचे तेच थोड्याबहुत फरकाने अवकाशाच्या बाबतीत लागू पडेल. आकाशातल्या नागरी विमान-उड्डाणांना अलीकडे भुरट्या चाचेगिरीचा (Hijacking) फार ताप होऊ लागला आहे. लष्करी विमानांच्या हालचालीवर नियंत्रण करणे कायदेशीररीत्या योग्य आहे; पण नागरी विमानांना असे पेचात आणून त्याचा राजकीय दबावाकरता व धमक्यांकरता उपयोग करून घ्यावयाचा हे गैर आहे. नुसत्याच विमानांच्यापुरता आता हा प्रश्न मर्यादित राहिला नसून अवकाशात सोडलेले उपग्रह, अग्निबाण, संदेशवहनसाधने, अवकाशयान ह्यांच्या बाबतीतल्या शास्त्रीय प्रयोगांवर कोणत्या मर्यादा तसेच हक्क असावेत हे ठरविण्याची निकड भासते आहे.

कृत्रिम उपग्रहांचा उपयोग दूरचित्रण तसेच संदेशवहन ह्याचबरोबर देशातील वाया जाणाऱ्या साधनसंपत्तीची पाहणी करण्याकरता सुद्धा होत आहे. सारांश आर्थिक विकासाचे साधन म्हणून उपग्रहांचा उपयोग जास्त प्रमाणावर होऊ लागला आहे. ह्याचे उत्तम व एकच उदाहरण सांगायचे झाले तर आफ्रिकेतील सहेल भागाची उपग्रहातर्फे जी नुकतीच पाहणी झाली त्यामुळे अनमोल अशा खनिजसंपत्तीचा शोध लागू शकला. ह्या अद्ययावत तंत्राचा उपयोग विकसनशील देशांच्या आर्थिक प्रगतीकरता करून देण्याकरता विकसित देशांनी सहकार्याचा हात पुढे करणे इष्ट होईल.

## आगामी पीकपाण्याचा जागतिक अंदाज

यूनोच्या अन्न व शेतीसंघटनेने (FAO) नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. यंदाच्या १९७५-७६ या वर्षी जागतिक शेतकी उत्पादन एकंदरीत समाधानकारक होईल असे वाटते. विशेषतः गहू व भरड धान्यांचे उत्पादन मागील वर्षापेक्षा वाढेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. राय, ओट, बार्ली, मका ह्यांच्या उत्पादनात मागील वर्षापेक्षा ७८ टक्क्यांनी वाढ होईल; अशा भरड धान्यांचे उत्पादन ७०० दशलक्ष टनांपेक्षा जास्त होईल. त्यामुळे जगातील उपभोग व साठे ह्याकरता भरपूर धान्य उपलब्ध होईल. एकट्या गव्हाच्या उत्पादनाचा अपेक्षित आकडा ३८५ दशलक्ष टन आहे. मागील वर्षाच्या तुलनेने गव्हाचेदेखील उत्पादन सात टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे. त्यामुळे गहू व भरड धान्ये दोन्हींचे उत्पादन वाढणार असल्याकारणाने आगामी वर्षाकरिता साठा करण्यास गहू शिल्लक राहील असे वाटते. यंदाचे गव्हाचे उत्पादन १९७२-७३ च्या विक्रमी उत्पादनापेक्षाही २ टक्के जास्तच असेल. ह्याचे एक प्रमुख कारण ह्या वर्षी गव्हाखालील क्षेत्रात २० ते ३० टक्क्यांनी वाढ अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना इत्यादी देशांत झाली आहे.

## बांगला देश

नुकतीच म्हणजे जून ६ ला 'एकपक्षीय मर्यादित लोकशाही' चे तत्त्व स्वीकारून बांगला देशचे नेते मुजिबूर रहमान ह्यांनी सारी सत्ता स्वतःच्या ताब्यात घेतली होती. मुजीब हेच राष्ट्राध्यक्ष होते. तसेच पक्षाचे अध्यक्ष तेच. पक्षाच्या मध्यवर्ती समितीत सैन्य, नाविकदल तसेच विमानदल ह्यांचे अधिकारीही

मदस्य म्हणून घेतले गेले. पूर्वीचे कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य मोनी सिंग व मुजफ्फर अहमद ह्यांचाही समावेश कार्यकारिणीत केला गेला. ७ जूनला सहा कलमी कार्यक्रम जाहीर झाला. पंतप्रधान म्हणून श्री. मन्सूरअल्ली ह्यांची नेमणूक झाली. १६ जूनला वृत्तपत्रांच्या धोरण व स्वातंत्र्यावर नियंत्रणे घातली गेली. बंगलादेश ऑब्झर्व्हर, दैनिक बंगला ह्यांच्या नियामक-मंडळाची फेररचना करण्यात आली. बंगाली इत्तेफाक व बांगलादेश टाइम्स ही पत्रे पूर्णपणे सरकारी ताब्यात घेण्यात आली. बांगलादेश टाइम्सचे संपादक म्हणून मुजीब ह्यांचे पुतणे फजलूल हक मोनी ह्यांची नेमणूक करण्यात आली. सरकारने वृत्तपत्रव्यवस्थापनाचे एक मध्यवर्ती मंडळ स्थापन करण्याचा इरादा जाहीर केला. मुजीब ह्यांनी स्मगलरविरोधी मोहीम निर्धाराने हाती घेतली. गेले महिना-दोन महिन्यांत मुजीब ह्यांच्या नेतृत्वाची कसोटी होती. देशात आर्थिक प्रश्न भेडसावत होते, राजकीय असंतोष होताच; पण दरम्यान मुजीब ह्यांच्या परदेशचे दौरे, तसेच नवे व्यापारी करार इत्यादींनी बांगला देशातील परिस्थिती पूर्णपणे ठीक आहे असे वाटत होते. दि. १५ ऑगस्ट १९७५ ला आपल्या स्वातंत्र्य-दिनाच्या ध्वजवंदनाचा कार्यक्रम होईतोपर्यंत बांगला देशात काय भयानक चालले आहे त्याची आपल्याला कल्पनाच नव्हती. मुजीब, त्यांची पत्नी, नातेवाईक, निकटवर्तीय अशा सुमारे २०० व्यक्तींची कत्तल झाली. लष्कर व जुन्या समिती-तील काही नेते ह्यांच्या संगनमताने एक अनपेक्षित क्रांती झाली. नव्या बांगला देशाचे सध्याचे अध्यक्ष श्री. मुश्ताक अहमद ह्यांनी निधर्मी लोकसत्ताक गणतंत्र राज्य व तटस्थता, शांती व मैत्री ह्याच धोरणांचा पुनरुच्चार केला आहे. बांगला देशाकरता जो आर्थिक ताण आपण आतापावेतो केला त्या-बाबतीत गीतेतले एक सूत्र : 'कर्तव्यावर आपला अधिकार असतो...फलाची अपेक्षा कर्म करणाऱ्याने करायची नसते' हेच लक्षात घेणे उचित होईल.

## पाकिस्तान

पाकिस्तानचे अर्थमंत्री श्री. मुहम्मद हनीफ खान ह्यांनी ७ जून रोजी नव्या वर्षाचे बजेट सादर केले. चालू वर्षाकरता ४४ दशलक्ष पौंडांची अधिक रक्कम केवळ संरक्षणकार्याकरता दिली गेली आहे. पुढच्या वर्षीची व चालू वर्षाची अशी दोन्ही मिळून ही रक्कम २८२ दशलक्ष पौंडांपर्यंत जाईल. १९७४-७५ हे मागील वर्ष आर्थिकदृष्ट्या असमाधानकारक होते असे त्यांचे मत आहे. ह्याचे कारण ह्या वर्षी परदेशी देण्याघेण्या-तील तूट ११०० दशलक्ष डॉलरपर्यंत झाली आहे. ह्याच्या आधी पाकिस्तानच्या स्थापनेपासून आतापर्यंत इतकी तूट कधीच भासली नाही. राष्ट्रीय उत्पन्नात मागील वर्षी फक्त २·६ टक्क्यांनी वाढ झाली; पण त्या वाढीचा फायदा अजिबात झाला नाही. ह्याचं कारण ३·४ टक्क्यांनी वाढलेली चलन-वृद्धी हे होय. ह्याचा सरळ अर्थ विकासाचा दर आता धन राहिला नसून ऋण झालेला आहे. फ्रान्सने मिराज् जातीची लढाऊ विमाने देण्याचे कबूल केले आहे. चीनने रणगाडे तयार करून देण्याकरता सहकार्य पुढे केले आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८·६% संरक्षणावर खर्च केला जात आहे. सध्या देशात १७०० रणगाडे, ३॥ लाख खडे लष्कर आणि ५ लक्ष राखीव फौज, तसेच तीन फ्रेंच पाणबुड्या, ४ लढाऊ जहाजे, ९ पेट्रोल बोट्स, २८३ लढाऊ विमाने, २१ मिराज विमाने इत्यादींनी संरक्षणव्यवस्था सज्ज आहे. अमेरिकेकडून 'सी किंग' जातीची हेलिकॉप्टर्स घेण्याकरता ऑर्डर देण्यात आली आहे असा अंदाज आहे. पाकिस्तानच्या आर्थिक दुरावस्थेच्या पार्श्वभूमी-वर हा संरक्षणखर्च उठून दिसतो. बजेट सादर करते वेळी निषेधाचा भाग म्हणून विरोधी पक्षाचा एकही सदस्य उपस्थित नव्हता. कारण की विरोधी पक्षाचे नेते अब्दुल वली खान हे सध्या 'आत' आहेत.

## इराण

इराणच्या आर्थिक विकासाच्या पंचवार्षिक योजनेच्या महत्त्वाकांक्षी खर्चाला थोडीशी कात्री लावण्यात आली आहे. देशाच्या नियोजनमंडळाचे प्रमुख श्री. अब्दुलमजीद मजीदी ह्यांनी १५ जूनला तशा स्वरूपाची घोषणा केली. योजनेचा विस्तार मर्यादित करण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे इराणच्या तेलाच्या दैनंदिन निर्यातीत १३ लक्ष बॅरल्सची घट झाली आहे. विशेषतः पाश्चात्य प्रगत देशांमधील उद्योगसंस्थांनी तेलाच्या मागणीत डिसेंबर १९७४ पासून एकदम मोठ्या प्रमाणावर कपात सुरू केली आहे. ह्याचा परिणाम देशाच्या उत्पन्नावर साहजिकच झाल्याकारणाने दुय्यम महत्त्वाच्या योजनांवरच्या खर्चापेक्षा प्राथमिक महत्त्वाच्या योजनांना प्राधान्य देण्यात आले आहे. नियोजनप्रमुखांचे असेही मत आहे की केवळ तेलाच्या निर्यातीतील घट एवढेच कारण नसून देशात सुमारे प्रतिवर्षी २० टक्के दराने चलनात वाढ होत असल्याकारणाने देशातील नियोजनखर्चात कपात करणे इष्ट

ठरेल. गेल्या वर्षीची तेल-उत्पन्नातील घट २१ बिलियन डॉलर आहे. तेलउत्पन्नातल्या घटीचे एक कारण परदेशांतील मागणीत घट; पण त्याचबरोबर दुसरे म्हणजे तेलाचा उठाव होण्याकरता देशातल्या बंदरांच्या क्षमतेला मर्यादा होत्या. म्हणूनच इटली व द. कोरिया ह्यांच्याशी करार करून इराण आपल्या बंदरांची वाढ व सुधारणा करीत आहे. देशात मात्र उत्पन्न वाढत असल्यामुळे आवश्यक वस्तूंची टंचाई भासू लागली आहे. उदाहरणार्थ सीमेंट २·३ दशलक्ष टन, पोलाद १·६ दशलक्ष टन, ५·६ दशलक्ष टन विटा, ३७४० इंजिनिअर, १८२० डॉक्टर, ७००० शिक्षक, ६५०० तंत्रज्ञ व ८४००० कुशल कामगार असे टंचाईचे आकडे अर्थमंत्री हुशंग अन्सारी व नियोजनप्रमुख मजीदी ह्यांनी दिले आहेत. इराणचे तेल व खाणमंत्री श्री. जमशेद अमॉझेगर ह्यांनी निर्यात झालेल्या तेलाची देणी स्पेशल ड्रॉइंग राइट्सपेक्षा डॉलरच्या स्वरूपातच दिली जावी असे मत व्यक्त केले आहे. ह्याचे कारण अमेरिकेचा डॉलर पुन्हा हळूहळू अलीकडे सुधारू लागला असून तेलउत्पादकांना त्यांच्या येण्याच्या रकमांचा हिशोब एस्. डी. आर. मध्ये केल्यास तोटा होईल. येत्या सप्टेंबरमध्ये होणाऱ्या 'ओपेक'च्या सभेत ते ह्या विचाराला चालना देणार आहेत. इराण, इराक व अल्जीरिया ह्यांच्या सरहद्दींचे प्रश्न तीन देशांच्या सामोपचाराने सुटले. त्रिवर्गांनी ८० पानी तह नुकताच बगदाद येथे मान्य केला आहे.

## इझ्रेल

इझ्रेलच्या मंत्रिमंडळाची खास बैठक ८ व ९ जून ह्या दिवशी होऊन पंतप्रधान राबीन ह्यांना इजिप्तच्या सादत ह्यांच्याशी समझौता व तात्पुरता शांततेचा तह करण्याच्या धोरणाला पाठिंबा देण्यात आला. त्याप्रमाणे इझ्रेलच्या आघाडीवरच्या सैन्यापैकी काही पथके एकतर्फी काढून घेण्यात आली. विशेषत: सिनाई वाळवंटातील प्रदेश मोकळा करून शांततेस पोषक असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. इझ्रेलचे अर्थमंत्री राबिनोविझ ह्यांनी इझ्रेल व अमेरिकेतील संयुक्त आर्थिक करारावर नुकतीच सही केली आहे. उभय देशांतील व्यापार, कारखानदारी व गुंतवणूक तसेच कच्च्या मालाची देवाणघेवाण व विकासाकरिता संशोधन ह्याबाबतीत सहकार्य वाढावे अशी अपेक्षा आहे. ९२ वर्षांचे तत्त्वज्ञानाचे ख्यातनाम ज्यू प्राध्यापक एस्. एच्. बर्गमन १८ जून रोजी कालवश झाले. १९२० मध्ये पॅलेस्टाइनमध्ये जाऊन त्यांनी इझ्रेल स्वतंत्र करण्याच्या कार्यात सक्रिय भाग घेतला होता.

## जपान

जपानमधील मंदी कमी करण्याकरता नुकताच एक आठ कलमी कार्यक्रम सुरू झाला आहे. गेल्या महिन्यापासून जपान व अमेरिका ह्या दोन देशांमधील घसरणीची (Recession) परिस्थिती आता सुधारू लागली आहे. रोजगार व उत्पादन वाढविण्याकरता जपानने खालील गोष्टींवर भर दिला आहे. १. घरबांधणीला उत्तेजन, २. प्रदूषणविरोधी मोहीम, ३. इमारती व साधनसामग्रीची सुरक्षितता, ४. सार्वजनिक बांधकामाच्या योजनांवर सरकारी खर्चात वाढ, ५. उद्योगधंद्यांचा व्याजाचा बोजा कमी करणे, ६. लघुउद्योगांना विशेष सवलतीच्या दराने व भरपूर कर्जसहाय्य, ७. औद्योगिक रचनेकरता आवश्यक असलेल्या खर्चावरचे नियंत्रणे शिथिल करणे, ८. सरकारी क्षेत्रातील मागणी तसेच भाडे-खरेदी (Hire-purchase) योजनांना उत्तेजन देऊन एकूण उपभोग्य वस्तूंच्या मागणीत वाढ करणे, जपानचे ७४ वर्षांचे पंतप्रधान श्री. इसाकू साटो हे ३ जून रोजी निधन पावले. त्यांच्यानंतर टाकेओ मिकी ह्यांची पंतप्रधानपदी निवड झाली. १६ जून रोजी उजव्या अतिरेकी गटाच्या ३४ वर्षांच्या हिरोयोशी फुदेयासू ह्याने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. सुदैवाने त्यांना फारशी इजा झाली नाही. जपानने चीनशी १८ जून रोजी नुकताच जो मित्रत्वाचा करार केला आहे त्याबद्दल रशियाला थोडी चिंता वाटत आहे. रशियाने चीनच्या धोरणाबाबतीत जपानला सावधगिरीची सूचना दिली आहे. दरम्यान म्हणजे १ जूनला रशिया व जपान ह्या दोघांत मत्स्योद्योगावर आवश्यक निर्बंध घालण्याकरता ३ वर्षांचा करार झाला आहे. रशियन मासेमारी जहाजांमुळे जपानच्या कोळ्यांचे सुमारे ३४० दशलक्ष येन इतके नुकसान झाले होते. ह्या करारामुळे मासेमारी धंद्याची उभय देशांना हितकारक आचारसंहिता तयार झाली.

## रशिया

जून ८ रोजी मनुष्यविरहित एक अवकाशयान शुक्रावर पाठवण्यात आले. ह्या यानाचे सांकेतिक नाव आहे 'व्हीनस-

९'. पृथ्वीपासून ५२ दशलक्ष किलोमीटर अंतराचा हा प्रवास आहे. रशियाने शुक्रावर यान उतरवण्यात जे यश मिळवले आहे ते अजोड आहे. ह्यापूर्वी १९६२ व १९६७ मध्ये अमेरिकेने मॅरिनर-यान शुक्रावर पाठवण्याचा प्रयत्न केला होता; पण तो अपेशी ठरला.

## चीन

चीन व फिलिपिन्स ह्या देशांमध्ये जून ९ रोजी राजनैतिक संबंध सुरू करण्याकरता परस्परांचे राजदूत आता पाठवण्यात येणार आहेत. हा करार चाऊ एन लाय व अध्यक्ष मार्कोस ह्यांच्यात हॉस्पिटलमध्ये जिथे सध्या चाऊ विश्रांती घेत आहेत त्या ठिकाणी झाला. नुकतेच नेहमी वर्षानुवर्षे त्रास देणारे महापूर व कोरडा दुष्काळ हे प्रश्न उग्र स्वरूप धारण करत आहेत. विशेषतः ह्या हंगामातील गहू व तांदुळाचे पीक त्यामुळे धोक्यात येईल की काय अशी भीती वाटते. ह्या वर्षी गव्हाखालच्या क्षेत्रात वाढ होऊनही उत्पादन त्या प्रमाणात त्यामुळे वाढणार नाही असे वाटते. लीन, होनान इत्यादी प्रांतांत दुष्काळाचे संकट जास्त गंभीर आहे. सुमारे ८ दशलक्ष माऊ (जमिनीचे क्षेत्र हेक्टरसारखे) जमिनीला बाहेरून आणून मुद्दाम पाणी देण्याची पराकाष्ठा करण्यात आली. ह्या दुष्काळाची झळ सुमारे १० लाख शेतकऱ्यांना भासेल असा अंदाज आहे. शांटुंग, शांसी ह्या गव्हाच्या प्रदेशात खते देऊन पिके जमवली आहेत. पिवळ्या नदीच्या तसेच हयू (Huai) नदीच्या खोऱ्यातील गव्हाचे उत्पादन मात्र समाधानकारक आहे.

## भारत

पंतप्रधानांचा नवा आर्थिक कार्यक्रम कार्यान्वित झाला आहे. ह्या कार्यक्रमात दोन भाग महत्त्वाचे : (अ) अल्पकाळातील ताबडतोबीच्या उपायाने सुटण्यासारखे व दैनंदिन जीवनात ज्यांची झळ भासते ते प्रश्न सोडवणे. उदाहरणार्थ : भडकती महागाई आटोक्यात आणणे व त्याकरता आवश्यक ते सर्व उपाय योजणे; (ब) दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे देशातले सध्याचे उत्पादन शेतकी, औद्योगिक इ. सर्व क्षेत्रात फार अपुरे असल्यामुळे जास्तीत जास्त भर उत्पादनवाढीच्या कार्यक्रमावर देणे. ह्या आर्थिक कार्यक्रमाच्या अनुरोधाने सरकारी यंत्रणा विविध क्षेत्रांत तडफदाररीतीने, कार्यक्षमतेने व झपाट्याने कामे उरकण्यावर भर देत आहे. नुकतेच चोरटा व्यापार, काळाबाजार, साठेबाजी, नफेखोरी ह्यांना आळा घालण्याकरता विविध उपाय योजण्यात आले. मे महिन्यात २$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांचे देशी व $\frac{1}{2}$ लक्ष रुपयांचे अवैध परदेशी चलन जप्त करण्यात आले. १४२ खटले भरले गेले. त्यांच्या दंडातून ४ लक्ष रुपये व १ लक्ष १४ हजार रुपयांचे परदेशी चलन वसूल करण्यात आले. मुंबई शहरात प्रचलित झालेली काळा पैसा लपविण्याची युक्ती म्हणजे 'हवाला पद्धती' ह्या अनिष्ट पद्धतीचा कसून छडा लावण्यात आला. ह्या पद्धतीत १० व्यक्ती सामील होत्या-त्यांच्याजवळील २ कोटी रुपये लपविण्याकरता दोन व्यक्तींना हवाला देऊन हिशेबात ते त्यांचे आहेत असे खोटेच भासवले होते. त्यातला एक माफीचा साक्षीदार मिळाला व ह्या साखळीचा छडा लागला. उठल्यासुटल्या संप करण्याच्या प्रवृत्तीचेही आता दमन झाले आहे. नोकरीत सर्वांना सुरक्षितता मात्र वेतनवाढ व उत्पादनात खंड पाडणारी कृत्ये ह्यांच्यावर नियंत्रणे घातली गेली आहेत. सरकारी क्षेत्रातील कारखान्यांची उत्पादनक्षमता व काटकसरीची पद्धत ह्यातही सुधारणा होत आहे. भिलई कारखान्याने ह्या वर्षीच्या पहिल्या ३ महिन्यांतच २५००० टन पोलादाचे उत्पादन वाढविण्याचा विक्रम केला आहे. मागील वर्षाच्या तुलनेने ही वाढ ७% आहे. स्टीलच्या गोळ्यांचे मागील वर्षाचे उत्पादन ४ लक्ष ५८ हजार टनात चालू वर्षाच्या पहिल्या ३ महिन्यांतच ६५००० टनांची भर पडली आहे. ही वाढ १७% आहे. पोलादाची वाहतूक व उठाव ह्यातही वेगाच्या हालचाली झाल्या आहेत. विद्युतनिर्मिती, नायट्रोजनयुक्त खते इत्यादी सरकारी उद्योगांची प्रगती समाधानकारक आहे. परदेशी व्यापाराचा आढावा घेता असे दिसते की मागील वर्षी म्हणजे ७४-७५ मध्ये व्यापारशेष १०९५ कोटी रुपयांनी प्रतिकूल होता. त्याच वर्षी आपली निर्यात ७७० कोटी रुपयांनी निव्वळ वाढली असूनही आपली आयात जास्त असल्यामुळे देण्याघेण्याचा आढावा प्रतिकूल होता. आपल्या आयातीच्या एकूण खर्चात ५० टक्क्यांहून जास्त परदेशी चलन अन्नधान्य, जळण व खते ह्यांवरच खर्ची पडते. त्यांच्या किमतीत चालू वर्षी सरासरी १२ टक्क्यांनी वाढ झाल्यामुळेही आमचा बोजा वाढला. निर्यात प्रोत्साहक सवलती, करमुक्तता व कच्च्या मालाचा पुरवठा इत्यादी गोष्टींचा विचार चालू आहे. रेल्वेची कार्यक्षमता व नियमित वाहतूक ह्यात फारच सुधारणा झाली आहे. मध्यमवर्गातील आयकर भरणाऱ्या ८००० रु. पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या व्यक्तीला नव्या करमुक्ततेच्या

मर्यादेमुळे व नियमांमुळे बराच दिलासा मिळाला आहे. अर्थमंत्री सुब्रह्मण्यम ह्यांनी नव्या आर्थिक कार्यक्रमासंबंधी असे म्हटले आहे की आर्थिक विकासाचा व समृद्धीचा कार्यक्रम सफल होण्यासाठी कालावधीची जरुरी आहेच, तसेच जनतेच्या सहकार्याचीही. अन्नाबरोबरच साध्या भरड कपड्याची गरज बहुसंख्य जनतेला आहे. त्या दृष्टीने प्रा. डी. पी. चट्टोपाध्याय–व्यापारमंत्री–ह्यांनी कापडगिरण्यांना स्वस्त व माफक किंमतीत वरील प्रकारचे कापड जनतेस उपलब्ध करावे असे आवाहन केले आहे. पोलादखात्याचे सचिव श्री. वहूदखान ह्यांच्या निवेदनाप्रमाणे चालू वर्षाच्या उत्तरार्धात पोलाद भरपूर प्रमाणावर बाजारात उपलब्ध होईल. त्याचा फायदा परदेशी चलन मिळवण्यातही होईल. तस्करविरोधी मोहिमेत सर्वश्री के. मोहम्मद कुट्टी, एवीजा रूबेन्स, कन्हैयालाल अंडेलजा, जलील मोहंमद, अब्दुल वहाब हसनअल्ली, छोटा काझी, सादिकल्ली सेहोरवाला, जयंतीलाल कानजी सोनी हे मुंबईचे, के. युसूफ, इस्माईल, पीर मोहंमद हे मद्रासचे व सूर्यकांत रायकर, गोवा ह्यांना अटक करण्यात आली होती. मुंबईचा एक इराणी ड्रायव्हर जलिल मोहंमद मुंबईच्या एका हॉटेलमध्ये कॅशियर म्हणून काम करीत असे. तो इराणी विद्यार्थ्यांना काळे पैसे पुरवत असे. सुमारे १० लक्ष रुपयांची उलाढाल अशा प्रकारे त्याने केली. ७१–७२ पर्यंत वीजनिर्माण वाढत होते; पण त्या मानाने ॲल्युमिनिअमचे उत्पादन वाढत नव्हते. चालू वर्षी ॲल्युमिनिअम-उत्पादनाचे धोरण आखण्यात आले आहे. त्याचा फायदा वीजउद्योगाला सुद्धा होईल. कंपन्यांच्या उधळपट्टीबद्दल व गैरवाजवी खर्चावर आळा बसावा म्हणून डॉ. सरोजिनी महिषी ह्यांनी संस्थाचालकांना समज दिली आहे. अनावश्यक परदेश व स्वदेशातले दौरे, परिसंवाद, परिषदा, जाहिरातबाजी, पॉश हॉटेलात राहणे, संचालकमंडळींच्या महागड्या बैठका इत्यादींवरील खर्चाने उत्पादकता वाढत नसून चैनीच्या राहणीमानाची अनावश्यक चटक वाढत आहे. कंपन्यांनी आपल्या पंखाखाली असणाऱ्या इतर कंपन्यांनी सल्ला–फी म्हणून जबरदस्त पैसे खर्ची दाखवणे इत्यादी गैरप्रकार ठीक नाहीत, ते टाळावेत अशी सूचना केली आहे. वीजमंत्री के. सी. पंत ह्यांनी थर्मल वीज, जलविद्युत इत्यादी योजनांना आगामी काळात महत्त्व दिले जाईल असे आश्वासन दिले आहे.

अभिमान वाटण्याजोगी नुकतीच झालेली एक घटना म्हणजे भारतीय तेलशुद्धीकरण कारखान्याने नोव्हेंबर १९६१ मध्ये सुरू केलेली 'गौहत्ती–जलपैगुरी पाइपलाइन' योजना नुकतीच १ ल्या अवस्थेपर्यंत पुरी झाली आहे. ही लाइन ५६ नद्या ओलांडून आसाम व प. बंगाल राज्यात पेट्रोल व तज्जन्य पदार्थवाहतूक करील. ह्या पाइपलाइनचा व्यास ८ इंच असून लांबी ४२५ किलोमीटर आहे. रेल्वेवरचा बोजा तर वाचलाच पण पेट्रोलवाहतुकीचा खर्चही त्यामुळे बराचसा वाचला आहे. अमेरिकन शेतीशास्त्रज्ञ डॉ. नॉर्मन बॉरिलॉग यांनी भारतातील शेतीच्या आश्चर्यकारक प्रगतीचा उल्लेख १९७० मध्ये नोबेल पारितोषिक स्वीकारताना केला होता. भारतातील सध्या लोकप्रिय बुटक्या जातीच्या गव्हाची रोपटी त्यांनीच केली होती. त्यांच्या प्रयत्नाचे व संशोधनाचे चीज पंजाबच्या गहूउत्पादनातील सध्याची वाढ लक्षात घेता दृश्य स्वरूपात झाले असे म्हणता येईल.

आंतरराष्ट्रीय डेअरी कॉंग्रेसची १९ वी बैठक दिल्ली येथे डॉ. वर्गीस कुरियन ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. इंडिअन एअर लाइन्सचे पी. सी. लाल ह्यांनी अमेरिकन सेव्हन–थ्री–सेव्हन बोइंग विमानाकरता ऑर्डर दिली आहे. हे विमान १२६ प्रवासी घेऊ शकते व त्याचा इंधन व सर्व खर्च ८० प्रवाशांच्या भाड्यात भागतो. ह्या खरेदीकरता ८५ लक्ष डॉलर्सचे कर्ज अमेरिकन बँकेने दिले आहे.

---


**अर्थ मासिकाची वर्गणी**

**संपादक 'अर्थ'**

**९०६, शिवाजीनगर, पुणे ४ ह्या पत्त्यावर चेक वा मनीऑर्डरने पाठवावी.**

# सोन्याच्या मोहकतेचे गूढ

प्रा. सौ. कुमुद पोरे

सोन्याचा मोह देवादिकांपासून, साधुसंतांपासून तो तस्करांपर्यंत सर्वांनाच आहे. सोन्याबद्दल सर्वांत आकर्षण महिलांना. दागिने करता आले नाही तरी आपल्या चिमुकल्या लाडक्या मुलांना 'सोन्या' म्हणून सोन्याबद्दलची हौस त्यातल्या त्यात भागवण्याचा त्यांचा हा एक विरंगुळा असतो. असो. सोने हा विषय तसा रम्य. भल्याभल्या अर्थपंडितांना देखील सोन्याचे उत्पादन, त्याचे साठे, त्याचा व्यापार कसा चालतो इत्यादीविषयी गूढच असण्याची शक्यता. तेव्हा रहस्यमय पण अत्यंत आवडीच्या विषयाचा अभ्यास प्रा. सौ. पोरे ह्यांनी, शैलीदार व सुबोध पद्धतीने अर्थच्या वाचकांना करून दिला आहे. हा सोन्याचा लेख आपल्याजवळ जपून ठेवा... दुसऱ्याला वाचायला दिलात तर अंक परत मिळेलच अशी खात्री देता येत नाही.

**आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्याचे भाव कमी असताना भारतामध्ये सोन्याला एवढी जास्त किंमत का द्यावी लागते ?**

सोने ह्या चकाकणाऱ्या मूल्यवान धातूचे माणसाला फार प्राचीन कालापासून जबरदस्त आकर्षण आहे. सोन्याचा ठेवा माणसं प्राणपणानं जतन करून ठेवतात. असं म्हणतात की गेल्या दहा हजार वर्षांत मानवजातीनं भूगर्भातून काढलेल्या सोन्याचा जवळजवळ पूर्ण हिशेब आपल्याला आजचा जगातील सोन्याचा साठा तपासला तर मिळू शकेल. जवळजवळ अविनाशी असलेल्या ह्या धातूला असलेली मुख्य मागणी उपभोगाकरता नसून साठा आणि संरक्षणनिधी किंवा सुरक्षानिधी म्हणून बाळगण्याकरता आहे.

आज जगामध्ये एकूण सोन्याचा असलेला साठा, सरकारी आणि खाजगी दोन्ही प्रकारचे साठे लक्षात घेता जवळजवळ १७००० लाख औंस एवढा आहे. सोन्याचे सध्याचे जागतिक वापराचे प्रमाण वर्षाला १७० लाख औंस एवढे आहे. म्हणजे जगातील सोन्याचे उत्पादन आज बंद केले तरी आहे तो साठा वापरायचे म्हटलं तर १०० वर्षं जगाला पुरेल; पण प्रत्यक्ष वापर हे सोन्याचं महत्त्वाचं कार्यच मानलं जात नाही. किंबहुना, वापरावी लागू नये म्हणून साठवून ठेवली जाणारी अशी सोनं ही एकमेव वस्तू आहे असं म्हणता येईल. ह्या दृष्टीनं सोन्याला असलेली मागणी ही कशा स्वरूपाची असते हे समजावून घेणं उपयुक्त होईल.

वर पाहिल्याप्रमाणे दैनंदिन वापर हा सोन्याच्या दृष्टीनं कमी महत्त्वाचा आहे. तथापि जे सोनं वापरलं जातं त्यापैकी तीनचतुर्थांश सोनं हे दागदागिने, जडजवाहीर आणि कलाकुसरीच्या वस्तू तयार करण्याकरता, म्हणजेच आर्थिक प्रतिष्ठेचे प्रदर्शन करणाऱ्या विलासी वस्तू तयार करण्याकरता वापरलं जातं. ह्या वस्तूंना केवळ प्रतिष्ठामूल्य असल्यानं सोन्याची किंमत वाढली तर दागिने करण्याकरता अतिश्रीमंत लोकांकडून सोन्याला जास्त मागणी येण्याची शक्यता संभवते. जगात वापरल्या जाणाऱ्या सोन्याचा जवळजवळ आठवा हिस्सा हा दंतवैद्य आपल्या व्यवसायात—दात भरण्याकरता, दाताचा टोपा तयार करण्याकरता वगैरे वापरतात आणि उरलेला आठवा हिस्सा निरनिराळ्या इलेक्ट्रॉनिक, रासायनिक इत्यादि औद्योगिक उत्पादनांमध्ये वापरला जातो. औद्योगिक वापराकरता आणि काही प्रमाणात दंतवैद्यकामध्ये वापरल्या जाणाऱ्या सोन्याची मागणी ही इतर वस्तूंच्या मागणीच्या स्वरूपाची असते; परंतु प्रतिष्ठादर्शनाकरता असलेली मागणी विकृत स्वरूपाची म्हणजे किंमत वाढली तर मागणी वाढण्याचा संभव असलेली अशी असते.

सोन्याचा साठा करण्याकरता असलेली मागणी ही सोन्याला असलेली वैशिष्ट्यपूर्ण मागणी आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अंतिम शेष निवारणार्थ जो निधी सरकारी तिजोरीत अथवा मध्यवर्ती बँकांतून असतो तो सोन्याच्या रूपामध्ये आणि जागतिक पातळीवर स्वीकार्य चलनाच्या रूपामध्ये

असतो. ह्या निधी शक्य तेवढा वापरला जाऊ नये, उलट वाढवावा म्हणजे आंतरराष्ट्रीय जारपेठेमध्ये अर्थव्यवस्थेला आणि राष्ट्रीय चलनाला स्थैर्य लाभते असा अनुभव आहे. विविध राष्ट्रांमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाण-घेवाण सुलभ व्हावी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार सतत वाढता राहावा यासाठी ह्या देवाण-घेवाणपद्धतीवर जगातील सर्व राष्ट्रांचा विश्वास असावा लागतो. त्या दृष्टीने सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत निश्चित असणे आणि ती स्थिर राखणे फार महत्त्वाचे ठरते. १९३४ पासून ते १९७१ पर्यंत सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत अमेरिका डॉलरला एक औंस शुद्ध सोने अशी होती. ही किंमत टिकविण्याकरता सोन्याचे खरेदी विक्रीचे सरकारी व्यवहार या किंमतीला केले जातील ह्याची हमी हवी म्हणजेच डॉलर परिवर्तनीय हवा. डॉलरच्या बदल्यात ठराविक प्रमाणात सोने देणे हे अमेरिकन अर्थव्यवस्थेला जड जाणार असे दिसू लागल्याबरोबर म्हणजेच सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याबरोबर लंडन येथील सोन्याचे बाजारभाव वाढू लागले आणि सोन्याची सरकारी मागणीही वाढू लागली.

सोन्याला सरकारी मागणी असते ती आणखी एका कारणासाठी. ती म्हणजे राष्ट्रीय चलनाला सोन्याचा पाठिंबा ठेवण्यासाठी. पूर्वी सुवर्णचलनमानपद्धतीमध्ये सरकारी सुवर्णसाठ्यावर देशातील चलनपुरवठा अवलंबून असे. आजच्या व्यवस्थापित चलनपद्धतीमध्ये तसा विचार केला तर देशातील चलन हे लोकांच्या सरकारवर असलेल्या विश्वासाच्या आधाराने चालत असते किंवा सरकारी हुकुमाने ते वैध वा अवैध ठरत असते. तेव्हा किती सुवर्णसाठ्याच्या आधारावर किती चलनपुरवठा करता येईल हे सर्वस्वी सरकारी चलननीतीनुसार ठरते; परंतु देशात आणि परदेशांत चलनाला प्रतिष्ठा लाभावी ह्याकरता सरकारी तिजोरीत सुवर्णसाठा असतो.

वास्तविक देशातील चलनाला प्रतिष्ठा लाभते ती त्याच्या बदली आवश्यक त्या वस्तू विकत घेता येतात म्हणून. किंमती चढू लागल्या, भाववाढ झाली म्हणजे चलनाची देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा घसरू लागते. अशा वेळी हाती असलेल्या पैशातून स्थिर मूल्य असलेल्या वस्तू विकत घेण्याची प्रवृत्ती वाढीला लागते. अशा वस्तूंच्या स्वरूपात ठेवलेली बचतच अडीअडचणीला आपल्या कामी येईल असे वाटत असते आणि चलनाच्या स्वरूपातील बचतीचे खरे मूल्य घसरू लागल्याने ही प्रवृत्ती अधिक तीव्र होते.

सोन्याचा साठा करण्यासाठी खासगी मागणी ह्या कारणामुळे वाढत जाते. सोन्याच्या भावातील चढउतार लक्षात घेऊन सोनेबाजारातील सध्याच्या व्यवहाराकरताही सोने विकत घेतले जाते; परंतु बचत सुरक्षित ठेवण्याचं एक पारंपारिक साधन म्हणून सोन्याला असलेल्या मागणीचे प्रमाण त्याहून बरेच अधिक असते. वास्तविक सोन्यात पैसे गुंतवणं पूर्णपणे अनुत्पादक आहे; परंतु बँकेतील व्याजाच्या दरापेक्षा आणि भाववाढीच्या प्रमाणापेक्षाही सोन्याची किंमत जास्त प्रमाणात वाढत असेल तर ते किफायतशीरही ठरतं, व्यक्तीच्या दृष्टीनं.

सोन्याला असलेली खाजगी मागणी वाढण्याचे दुसरे आणि अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे सोने हे जड, टिकाऊ आणि मूल्यवान नव्हे तर सतत वाढत्या किंमतीला विकले जाण्याची शक्यता असल्याने करबुडवेपणा, काळा बाजार इत्यादि मार्गांनी मिळविलेला पैसा दडविण्याकरता उत्तम साधन ठरले आहे. पूर्वी हिंदुस्थानात चांदीवर आधारलेली चलनपद्धती होती. आंतरराष्ट्रीय चलनात चांदीला स्थान होते. तेव्हा चांदीलाही अशीच मागणी होती. १८७२ ते १८९८ ह्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर चांदीचं महत्त्व कमी झालं. मेक्सिकोमध्ये चांदीचं उत्पादन प्रचंड प्रमाणावर वाढलं तेव्हा चांदीची सुवर्णरूपात मोजली जाणारी आंतरराष्ट्रीय किंमत गडगडली. हिंदुस्थानात रौप्यमानपद्धती असल्यानं हिंदुस्थानातील किंमती ह्या सोन्याच्या रूपात विचार करता एकदम कमी झाल्या; निर्यात प्रचंड प्रमाणावर वाढली; परंतु सबंध व्यापार-अधिशेष हा चांदीच्या रूपात सिटवला गेला. परिणामी चांदीचा फार मोठा साठा हिंदुस्थानात जमा झाला. पुढे रौप्यमान स्थगित झाल्यानंतरही चांदीचा साठा सरकारी तिजोरीत, बँकांमध्ये आणि खाजगी तिजोऱ्यांतून विभागला गेला. असं म्हणतात की आज हिंदुस्थानमध्ये असलेला चांदीचा हा साठा सबंध जगातील चांदीची प्रत्यक्ष वापराकरता असलेली मागणी किमान पंधरा वर्षं तरी पुरी करू शकेल. आज सोन्याच्या मानाने चांदीची किंमत खूप कमी आहे. म्हणून चोरट्या व्यापारामध्येही परदेशातून वस्तू आणण्याकरता तसेच सोने आणण्याकरता चांदीच्या रूपात व्यवहार केले जातात. कारण प्रत्यक्ष चांदीच्या निर्यातीला कायद्याने बंदी आहे.

एक प्रश्न नेहमी उपस्थित होतो तो म्हणजे सोन्याची किंमत चढू लागली तर साठा करण्याकरता असलेल्या सोन्याच्या मागणीवर नेमका काय परिणाम होईल ? ह्या बाबत वस्तुस्थिती अशी आहे की साठवणूक करण्याकरता सोन्याला असलेल्या मागणीचा सोन्याच्या बाजारपेठेशी तसा निकटचा संबंध नसतो तर सोन्याच्या प्रत्यक्ष किंमतीखेरीज इतर घटकांचा प्रभाव ह्या मागणीवर फार मोठ्या प्रमाणात असतो. जोपर्यंत आंतरराष्ट्रीय पातळीवर सोन्याच्या चलनपद्धतीत किंमत आ



आ

तोपर्यंत लोक सोन्याच्या रूपामध्ये मूल्यसाठा करून ठेवतील किंवा नाही हे देशातील आर्थिक व राजकीय परिस्थितीवर अवलंबून असते. सतत होणारी भाववाढ आणि त्यामुळे राष्ट्रीय चलनातील मूल्य-ऱ्हास, बचतीच्या मूल्यात होणारी घसरण ह्याचा परिणाम म्हणून साठा करून ठेवण्याकरता सोन्याची मागणी वाढत जाते. सोन्याची किंमतही अशीच वाढत जाणार आहे ही अपेक्षा. ह्याचाही परिणाम सोन्याची मागणी वाढविण्याच्या दिशेनेच होतो. कारण सोन्याची किंमत आज वाढली तरी काही वर्षांनी ती उतरणार आहे अशी मुळीच भीति नसते. कारण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील देवाण-घेवाण सोन्यावर आधारित आहे. तेव्हा आज सोन्याची आंतर-राष्ट्रीय किमत जेवढ्या प्रमाणात वाढते त्यापेक्षा किती तरी अधिक प्रमाणात देशातील चलनावरील विश्वासाचा अभाव आणि काळा पैसा दडविण्याचे साधन म्हणून असलेली प्रचंड मागणी ह्यामुळे आपल्याला बाजारात सोने विकत घेण्यास द्यावी लागणारी किंमत वाढत असते. ह्या किंमतीमध्ये आप-ल्याला काही वेळा तात्कालिक चढउतार दिसतात ते लग्नाचा मोसम म्हणा किंवा चोरट्या आयातीमधून देशामध्ये येणाऱ्या सोन्याच्या प्रमाणातील चढउतार ह्यामुळे होतात.

ह्यावर उपाय काय ? आंतरराष्ट्रीय पातळीवरील देवाण-घेवाण ही सुवर्णमुक्त केली तर मूल्यसाठा म्हणून सोन्याला किमत राहाणार नाही. सोन्याचे प्रतिष्ठामूल्यही गडगडेल आणि सोन्याची किंमत मूल्यमान म्हणून न राहाता इतर कोणत्याही वस्तूप्रमाणे ठरेल; परंतु गेली पाच-साडेपाच हजार वर्षांची माणसाची सोन्याला पैसा मानण्याची पद्धत अशी सहजासहजी बदलणार नाही. तेव्हा परिस्थिती सुधारण्याचा एकमेव मार्ग म्हणजे देशातील चलनाचं मूल्य स्थिर राखणं. चलनाच्या रूपातील बचतीचा मूल्यऱ्हास होत नाही तर मूल्य-वृद्धीच होते असा विश्वास निर्माण झाला की साठवणुकीकरता सोन्याला असलेल्या मागणीला आळा बसेल. त्याचबरोबर दुसरा उपाय आवश्यक आहे तो म्हणजे करबुडवेपणा, काळा-बाजार ह्या मार्गानं मिळलेला काळा पैसा बाहेर काढणं आणि पुन्हा तो जमणार नाही याकरता उपाययोजना करणं. वास्तविक ह्या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. उत्पा-दनातील विसंगती आणि उत्पादनातील विषमता ह्या दोन गोष्टी दूर केल्याखेरीज आर्थिक तोल सावरणे व भाववाढ रोखणे कठीण असते.

### सोन्याचे उत्पादन कमी आहे का ?

१४९२ साली कोलंबसाला नव्या जगाचा शोध लागायच्या आधीच्या जवळजवळ ४३ शतकांच्या ज्ञात मानवी इतिहासा-मध्ये एकूण ३८२५ टन सोने भूगर्भातून बाहेर काढले गेले होते. त्यामानाने पुढील ४७२ वर्षांत सोन्याचा साठा व दर-माणशी उपलब्ध सोन्याचे प्रमाण कसे वाढले हे खालील तक्त्यावरून दिसेल.

| वर्ष | जागतिक लोकसंख्या | | सोन्याचा साठा | | दरमाणशी उपलब्ध |
|---|---|---|---|---|---|
| | लाख | निर्देशांक | टन | निर्देशांक | सोन्याचा निर्देशांक |
| १६०० | ४५०० | १००·० | ७५० | १०० | १०० |
| १७०० | ५१०० | ११३·३ | १७३४ | २३० | २०० |
| १८०० | ९१९० | २०४·२ | ३८३२ | ५०० | २४९ |
| १९०० | १५७१० | ३४९·१ | १६६११ | २२०३ | ६३० |
| १९६५ | ३४००० | ७५५·६ | ७३३४५ | ९७२७ | १२८७ |



# भारताच्या भावी भाग्योदयाचे
## आग्नेय दिशेकडील क्षितिजावलोकन
## डॉ. वसंतराव पटवर्धन ह्यांच्याशी चर्चा

शब्दांकन – कमलाकर परचुरे

महाराष्ट्र बँकेचे जॉइंट जनरल मॅनेजर डॉ. वसंतराव पटवर्धन मे महिन्यात थायलंड, मलेशिया व सिंगापूर ह्या देशांतील बँकेच्या कामानिमित्त गेले असता वित्तीय तसेच औद्योगिक परिस्थितीची त्यांना जवळून माहिती मिळवता आली व पाहणी करता आली. ते परतल्यापासून त्याबाबतीत चर्चा करण्यास त्यांचेकडून वेळ मिळणे कठीण झाले होते. म्हणूनच ह्या अंकात सदरहू चर्चेचा गोषवारा अर्थच्या वाचकांना देताना खूप आनंद होत आहे. भारताच्या विकसनशील कारखानदारी व व्यापाराची दृष्टी पश्चिमेकडून पूर्वेकडेदेखील वळविणे इष्ट आहे अशी प्रेरणा ह्या लेखातून मिळेल असे वाटते.


### आग्नेय आशिया

**आग्नेय आशियातील बऱ्याच प्रमुख देशांना आपण नुकतेच जाऊन आला. आपण कोणकोणत्या ठिकाणांना भेटी दिल्या, तसेच आपला दौरा एकूण किती दिवसांचा होता?**

माझा हा दौरा तसा फार घाईघाईचा झाला. ३ मेला मी बँकॉकला पोहोचलो. ३ मे ते ८ मे ५ दिवस मी बँकॉकमध्येच होतो. ८ मेला बँकॉकहून निघून पेनांगला गेलो. तिथे ३ दिवस राहून ११ मेला कौलालुंपूर व १३ मेपासून सेरेंबॉनला होतो. १६ मेला सिंगापूर व १८ मेला सिंगापूरहून निघून भारतात परतलो. सुमारे १६ दिवसांचा हा दौरा झाला. खरं म्हणजे मनात हाँगकाँगपर्यंत जाऊन यावं असं होतं; पण एक तर ज्या उद्देशाने मी गेलो होतो तो उद्देश मर्यादित होता. तरीही त्या वेळात थायलंड व मलेशिया ह्या दोन देशांमध्ये भारतीय उद्योगधंद्यांच्या संयुक्त सहकार्याच्या योजनांना कितपत वाव आहे आणि थायलंड व मलेशिया तसेच इंडोनेशिया ह्या एशिअन (ASEAN) राष्ट्रकुलातील प्रमुख देशांतील बँकिंग, नाणेबाजार व भांडवलबाजार हे मला अनेकजणांशी केलेल्या बातचितीवरुन थोडेसे वैयक्तिक पातळीवर कळू शकले.

**एशियन राष्ट्रकुलात प्रामुख्याने कोणते देश आहेत?**

एशियन (Associatton of Southeast Asian Nations) ह्या राष्ट्रकुलात आग्नेय आशियातील बहुतेक तटस्थ राष्ट्रांचा समावेश होतो. चीन हा तटस्थ नाही व इंडोचायनाच्या देशात युद्धपरिस्थिती होती म्हणून प्रामुख्याने चीन व युद्धात असलेले देश व दोन्ही कोरिया वगळून बाकीचे आग्नेय आशियातले देश, विशेषत: भारताच्या आग्नेयेकडील देश त्यात आहेत. पूर्वी पं. जवाहरलाल नेहरू व डॉ. सुकर्णो ह्यांनी पुढाकार घेतलेल्या तटस्थ राष्ट्रांच्या गटातील काही




प्रमुख देशांचा त्यात समावेश होतो. अपेक्षा अशी आहे की सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड, लाओस, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया, फिलिपिन्स, द. कोरिया, जपान, बांगलादेश, फिजी इत्यादी देश ह्या राष्ट्रकुलात यावेत; पण ब्रह्मदेशात जवळजवळ राजकीय व आर्थिक व्यवस्था बंदिस्त आहे. द. कोरिया अंतराने दूर व अजून राजकीयदृष्ट्या वादग्रस्त देश आहे. उत्तर कोरियाची तीच स्थिती आहे. जपान प्रगत देशात मोडतो. बांगलादेशातील अंतर्गत परिस्थिती सुस्थिर नाही. त्यामुळे सध्या तरी एशियन समूहात थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, फिलिपाइन्स व सिंगापूर ह्या ५ देशांचा समावेश झाला आहे. मलेशियाचे पंतप्रधान टुल अब्दुल रसाक, इंडोनेशियाचे सुहार्तो, फिलिपिन्सचे मार्कोस, थायलंडचे कुक्रित प्रमोज व सिंगापूरचे ली हे 'एशिअनचे' शिल्पकार आहेत. साधारणपणे ह्या देशांचे धोरण असे की देशांची स्वायत्तता व सार्वभौमता ह्यात कोणत्याही परकीय राष्ट्राचा हस्तक्षेप न येऊ देणे, आपल्याजवळच्या प्रगत व विकसनशील देशांशी व्यापार व उद्योगसंपर्क वाढवून आपआपल्या देशांची आर्थिक परिस्थिती सुधारणे : त्याचप्रमाणे आपसात युरोपीय राष्ट्रकुलाप्रमाणे आर्थिक सहकार्य निर्माण करणे.

**एशिअन संघातील देशांना आपण भेट दिली... त्या देशात राजकीय व आर्थिकदृष्ट्या आपणास प्रामुख्याने काय अनुभव आला ? तसेच इंडोनेशिया हा सर्वात मोठा देश आहे; पण त्याबाबत. आपण पूर्वीपासून विस्ताराने लिहिले आहे व तेथील बँकसंशी तुमचा इथे पूर्वी जवळून संपर्क आल्याने त्याबाबत तुम्ही तो अभ्यास चालू ठेवला आहे. त्याबाबत तिथे आणखी जवळून माहिती मिळाली का ?**

राजकीयदृष्ट्या पाहिलं तर शेजारी इंडोचीनमध्ये ज्या घडामोडी झाल्या आहेत त्यामुळे एक प्रकारची अस्थिर असुरक्षिततेची भावना दिसते. त्याचप्रमाणे आपआपल्या देशांचे राजकीय व आर्थिक हितसंबंध जपले पाहिजेत ह्याकरता जास्तच प्रमाणावर सावधपणा व काळजी निर्माण झाली आहे. चीनबरोबर एकंदरीत मित्रत्वाची, अलिप्ततेची भूमिका ठेवून कोणत्याच देशाशी द्वेषमूलक भूमिका न ठेवता, त्याचप्रमाणे अमेरिकेसारख्या मित्रराष्ट्रांशीही योग्य ते अंतर ठेवूनच ह्या देशांचे सध्यांचे सर्वच धोरण पालटत चालले आहे. अमेरिका, जपान ह्यांपेक्षाही विकसनशील व आपल्याशी साधर्म्य असणाऱ्या छोट्या देशांमध्ये व्यापार व उद्योगधंद्यांच्या बाबतीतले सहकार्य वाढवावे असे त्यांना वाटते. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलिया व इतर ब्रिटिश राष्ट्रकुलातील आग्नेय आशियातील देश तसेच मध्यपूर्वेकडील अरब देश व पाश्चात्य राष्ट्रे ह्यांच्याशीही व्यापार, उद्योग, बँकिंग, नाणेबाजार ह्यांच्या बाबतीत व्यवहार वाढवावेत अशाही योजना चालू आहेत; पण अगदी एकाच वाक्यात ह्या चार देशांतले अवलोकन सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की विशेषत: थायलंड व मलेशिया ह्यांच्यातील

अंतर्गत राजकीय परिस्थिती थोडी तंग असूनही आर्थिक आघाडीवर तेजीचे वातावरण (Booming Economy) मोठ्या प्रकर्षाने जाणवते.

**एशिअन मार्केटबद्दल आपल्याला काय वाटते? त्या मार्केटला वाव किती? कोणत्या गोष्टींची ह्या बाजारात उलाढाल होईल? तसेच ह्या देशांची आर्थिक परिस्थिती कशी आहे?**

ह्या ५ देशांची सर्वांची मिळून सुमारे २० कोट लोकसंख्या आहे. त्यातले सिंगापूर हे सर्वांत लहान राष्ट्र. राष्ट्र कसले? एक शहारापुरते निर्माण झालेले सार्वभौम राज्य (City-State). इतर ४ देशांची लोकसंख्या सरासरी ३·४ कोटी आहे. सिंगापूरची लोकसंख्या जेमतेम पाव कोट म्हणजे सुमारे मुंबई शहराहून कमीच. त्यातला सर्वांत मोठ्या लोकसंख्येचा देश म्हणजे इंडोनेशिया. त्याची वस्ती १५ कोट, मलेशियाची १ कोट, थायलंडची ४ कोट व फिलिपिन्स २·३ कोटीच्या आसपास आहे. २०·२२ कोट लोकसंख्येचा हा गट त्यांचा आर्थिक विकास झपाट्याने घडवत असल्याने, आंतरराष्ट्रीय बाजारास खुला झाला आहे. एवढेच नसून जास्तीत जास्त व्यापारवाढीकरताही उत्सुक आहे. त्यातल्या त्यात सिंगापूर हे अत्यंत संपन्न राष्ट्र, त्याखालोखाल मलेशिया व नंतर थायलंड. मलेशिया व थायलंडची सर्वसाधारण आर्थिक प्रगती व समृद्धी इंडोनेशियापेक्षा जास्त आहे व फिलिपिन्स ह्याची स्थिती त्याखालोखाल असून इंडोनेशियात आर्थिक विकासाकरता फार विशेष स्वरूपाचे प्रयत्न करावे लागतील; पण तेथे निसर्गाने उधळणच केली असल्याने साधनसंपत्तीची कमतरता नाही. सिंगापूर हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय व्यापाराचे एक प्रमुख केंद्र आहे. पाश्चिमात्य देशांत लंडनचे, युरोपात ॲम्स्टरडॅमचे, भारतात मुंबईचे तेच महत्त्व किंबहुना त्याहून जास्त आग्नेय आशियात सिंगापूरचे आहे. जपान, ऑस्ट्रेलिया, चीन, आग्नेय आशियातले सर्व देश ह्यांची निर्यात-आयात ह्यांना पाश्चिमात्य देशांशी सांधणारे सिंगापूर हे एक प्रमुख केंद्र आहे. पूर्वी हाँगकाँगला हे महत्त्व होते; पण अलीकडे हाँगकाँगवर चीनचा दबाव वाढल्याकारणाने, तसेच त्याचे स्थान लष्करीदृष्ट्या धोक्याच्या भागात असल्याकारणाने हाँगकाँगचा बराचसा व्यापार, नाणेबाजार हा सिंगापूरकडे सरकला आहे. सिंगापूरमध्ये आश्चर्याची गोष्ट ही की, उद्योग असा काही नाही, शेतीही नाही, कारखाने नाहीत की मळे नाहीत; पण सिंगापूरचे सारे उत्पन्न व्यापारी पेढ्यांचे व गोदी, मालधक्के, वाहतूक इ. चे. १९७३-७४ च्या राष्ट्रीय उत्पन्नाशी तुलना करता ७४-७५ चे उत्पन्न २६·२ टक्क्यांनी वाढले आहे. निव्वळ उत्पन्नाच्या वाढीचा दर ७ टक्के आहे. बेकारी फार कमी. २ टक्क्यांपेक्षाही कमी. तरीही सामान्य सिंगापुरी मनुष्य या बेकारीबद्दल कुरकुरतोच. ७० कोटी डॉलर्सचा व्यापारशेष अनुकूल, परदेशी चलन ६५० कोटी डॉलर्सचे शिलकीत, तसेच मध्यवर्ती बँकेकडे सोन्याच्या शिलकीत ४१० कोटी डॉलर्सची वाढ झाली आहे. सिंगापूरचा व्यापार प्रामुख्याने जपान, मलेशिया, अमेरिका व युरोपीय राष्ट्रकुलाशी चालतो. अलीकडे सिंगापूरमध्ये काही उद्योग रुजले आहेत ते म्हणजे वीज व इलेक्ट्रॉनिक्स, इमारतीलाकूड, कापड व जहाजबांधणी. १९७३ मध्ये एकूण व्यापार २१० कोटी डॉलर्सचा होता, तर १९७४ मध्ये ३४० कोटी डॉलर्सपर्यंत त्यात वाढ झाली. चलनवाढीचा दर कमी झाला आहे. विशेषतः चांगल्या पिकांमुळे तांदुळाच्या किंमतीत फक्त ५ टक्केच वाढ झाली. बँकांनी कर्जावरील व्याजाच्या दरात तर नुकतीच अर्धा टक्के कपात केली आहे. सिंगापूरचा १ डॉलर म्हणजे भारताचे सुमारे ३·५० रुपये. जागतिक बाजाराच्या ह्या केंद्रात भारताने मात्र अजूनही फारसा शिरकाव केलेला नाही.

मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया हे विषुववृत्ताला जवळ आहेत. त्यांचे उत्पन्न तांदूळ. मलेशिया त्यातल्यात्यात भाग्यवान आहे. कारण जगातील रबर व टिन ह्या व्यापारात व उत्पादनात त्याचा वाटा प्रमुख आहे. मलेशियात विकासाकरता प्रयत्नाची विशेष ओढ प्रकर्षाने जाणवली. अगदी महत्त्वाचे असे की रबराची नवी लागवड करण्यापेक्षा पामची झाडे लावावी व त्याचा तेल (Palmoil) उत्पादनाकरता उपयोग करावा अशी प्रवृत्ती दिसते. पामचे (Palm) झाड १८ महिन्यांत तयार होते, तर रबराच्या झाडाला सात वर्षांइतका जास्त अवधी लागतो. शिवाय सिंथेटिक रबर व प्लॅस्टिक्स ह्यामुळे रबराच्या यातायातीच्या मानाने फारसा नफा होत नाही असे त्यांना वाटू लागले आहे. मलेशियाने नुकतेच साखरउद्योगाकडेही आपले लक्ष वळवले आहे. कारण त्याच्याकडे साखर अजूनही मोठ्या प्रमाणावर तयार होत नव्हती. त्याचप्रमाणे मलेशियाने नव्या इंजिनिअरिंग उद्योगात लक्ष घातले आहे. भारतीय कारखानदारांशी त्यांनी आता औद्योगिक व तांत्रिक सहकार्य वाढवायला सुरुवात केली आहे. उदाहरणार्थ फलटण शुगरच्या माधवराव आपट्यांनी ६ लक्ष पोती, तयार करणारा कारखाना तिथे टाकला आहे, तर आपले कॅम्लिन्सचे दांडेकर ह्यांनी कंपासपेट्या, खोडरबर, रंग इत्यादींचा कारखाना नुकताच सुरू केला आहे. जे. जी. ग्लास ह्यांनी देखील मलेशियात एक कारखाना टाकला आहे. मलेशियन सरकारने पेट्रोकेमिकल्स उद्योगात पाश्चात्यांच्या सहकार्याने वाढ



रबराच्या मळ्यात

करावयाचे ठरवले आहे. आपल्या भारतीयांना अभिमान वाटेल अशी गोष्ट म्हणजे ही की एकूण मलेशियातील २२ कारखाने भारतीय सहकार्यातून निघाले आहेत. आपण जर त्यांच्यावरील व्यापारमंडळांना बोलावून सतत आपण काय करू शकतो हे दाखवले तर हे कारखाने आणखी दुप्पट होऊ शकतील. मलेशियातले एतद्देशीय शेतकरी लोक—भूमिपुत्र—हे त्या मानाने आळशीच. शिक्षण व औद्योगिक तंत्र—व्यवस्थापनात तर ते फारच मागे आहेत. इंडोनेशियाची परिस्थिती थोडीफार अशीच. त्यामुळे आपल्याकडील तंत्रज्ञांना व तंत्रज्ञान-निर्यातीला तिकडे अपरिमित वाव आहे.

ह्या पार्श्वभूमीवर थायलंड मात्र पाश्चात्य संस्कृती, तंत्र व उद्योग ह्यांनी विशेषतः शहरांतून अद्ययावत वाटतो. ग्रामीण भाग सर्वत्र सारखाच; तरीही एक तर शेतीच्या दृष्टीने तो स्वयंपूर्ण आहे. सर्वसामान्य माणसाला सुद्धा तांदूळ भरपूर व तुलनात्मक दृष्ट्या स्वस्त दराने मिळू शकतो. थायलंडमधील शहरे तर एकदम अद्यावत आहेत. महत्त्वाचे उत्पन्नाचे मार्ग म्हणजे इमारतीलाकूड, खनिज संपत्ती व हॉटेलव्यवसाय. थायलंडचे उत्पन्न परदेशी प्रवाशांमुळे फारच वाढले आहे. बँकॉक हे आग्नेय आशियातले एक प्रवाशांना आकर्षित करणारे मोठे विश्रामकेंद्र आहे. सुवर्णपॅगोडा, 'प्राचीन शहर' (Ancient City) वगैरे अनेक आकर्षणे तिथं आहेत. शिवाय कंबोडियातील हिंदु शिल्पकाम असलेले अंकोरवाट शहर, पेनांग, सिंगापूर—जावातील बोरोबोदूर इत्यादी प्रवास-केंद्रांना बँकॉकहून सहज जाऊन येणे सोयीचे आहे. एकट्या बँकॉकमधील हॉटेलमधील निवासाची सोय भारतातील सर्व हॉटेलमधील शय्यासंख्येइतकी (Beds) आहे. ह्यावरून बँकॉक शहरातील टुरिझमची कल्पना येईल. ह्यामुळे थायलंडमध्ये परदेशी चलन प्रतिवर्षी ओतले जात आहे. बाहेरच्या देशांशी विशेषतः अमेरिकेशी संबंध आल्याने ह्या शहरावर अद्ययावत, पाश्चिमात्य, प्रगत देशातील फॅशन्स व संस्कृतीची छाप पडली आहे. थायलंडमधील बँकांनी गेल्या ५ वर्षांत बँकांच्या शाखांचे जाळे वाढवले आहेच; पण परदेशी नामवंत बँकांच्या मदतीने नाणेबाजार व भांडवलबाजारातही खूपच प्रगती केली. एशियन डॉलरमार्केटचे ते एक केंद्र झाले आहे. थायलंडची हवा आपल्या महाराष्ट्रातल्या पुणे, सातारा, सांगली, नाशिक या शहरांसारखी; पण सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, अद्यावतपणा व तसेच एकंदर जीवनात आधुनिकपणा असं थायलंडमध्ये आढळतं. अमेरिकनांनी बराच पैसा ह्या देशात ओतला आहे. तेव्हढा पैसा त्या देशाच्या पंधरापटींनी मोठ्या असलेल्या भारतात घातला असता तर किती तरी बरे झाले असते. थायलंडमध्ये अंतर्गत परिस्थिती विद्यार्थ्यांच्या क्रांतीनंतर तंग असूनही भाववाढीचे प्रमाण मर्यादित आहे. अलीकडे भारतीय अग्रेसर

कंपन्यांशी थायलंडचे कारखानदार संयुक्त सहकार्याच्या योजना आखायाच्या मन:स्थितीत आहेत. किर्लोस्कर ऑइलचे विक्रीकेंद्र तिथे अनेक वर्षे आहे. त्यातल्यात्यात थायलंडमध्ये इंजिनिअरिंग उद्योग विकसित होतील अशी पार्श्वभूमी दिसते. फिलिपिन्सची स्थिती मलेशियासारखीच आशादायक आहे. मलेशियन दैनंदिन जीवनावरही शहरांतून पाश्चात्य संस्कृतीची सावली आहे. एकूण काय ह्या सर्व देशात विकासकार्याला जोर आहे. त्यामुळे मशिनरी, प्लँट, मशिनचे सुटे भाग, इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीज तसेच अत्याधुनिक उद्योग ह्यांच्या विक्री व सहकार्याला आता खूप वाव आहे. मात्र आपण त्यांच्यात मिसळून जायला पाहिजे. तुटकपणा व अलग अस्तित्व ठेवून चालणार नाही. हे आपण करू शकलो तर भारताला ह्या देशात जास्त अनुकूल परिस्थिती आहे. कारण भारत हा चीनपेक्षा जास्त आवडणारा शेजारी आहे. अंतराने अत्यंत जवळ. कलकत्ता ते बँकॉक हे अंतर मुंबई ते कलकत्ता ह्यापेक्षाही जवळच असेल. संस्कृतीने हे देश भारताला निकटचे. जावा, बार्क, सुमात्रा, कंबोडिया, ब्रह्मदेश, हिंदु चीन हे सर्व भाग बृहद्भारताचे अविभाज्य भाग होते. नावे संस्कृत, भाषा संस्कृतला जवळ, स्वभाव तसेच, रामायण-महाभारताचे दैनंदिन जीवनात तेवढेच महत्त्व व वाहतूक व दळणवळण ह्यांनाही सोयिस्कर म्हणूनच भारताने ह्या देशांच्या बाजारपेठेचा भरपूर उपयोग करून घेणे इष्ट होईल. ह्या देशातून भारतात बरेच विद्यार्थी प्रतिवर्षी येत आहेत. भारताबद्दलचे त्यांचे स्नेहसंबंध निश्चितच वाढण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना भेटण्याकरता येणाऱ्या त्यांच्या व्यापारी व कारखानदारवर्गातील पालकांना भारताबद्दल आस्था वाटण्याचा संभव आहे. इथे येणाऱ्या त्यांच्या विद्यार्थ्यांच्यात ही भावना आपण रुजवायचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हा भारतातील कारखानदार, बँकर, व्यापारी, व्यवस्थापन–तज्ज्ञ, संशोधक, शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ह्यांना ह्या एशिअन बाजारात काही काळपर्यंत निश्चितच चांगल्या संधी आहेत.

**भारतातल्या किंवा महाराष्ट्रातल्या कारखानदारांना कोणत्या संधी ह्या देशात मिळू शकतील ?**

ह्या साऱ्या देशात भूमिपुत्रांच्या रोजगार व आर्थिक हितसंबंधाचे रक्षण करण्यावर भर दिला जातो. तसेच परक्या कारखानदारांनी कायम वर्षानुवर्षे स्थानिक लोकांना पिळत रहाणे त्यांना मान्य नाही. म्हणूनच ५ ते १० वर्षांचे तात्पुरते, अल्पमुदतीचे तांत्रिक सहकार्याचे ( Technical Collaboration ) करार करण्यास ह्या देशात मान्यता मिळेल. कालांतराने मालकी–नियंत्रण–व्यवस्थापन ह्या तिन्ही गोष्टी स्वदेशातील लोकांच्या ताब्यात रहाव्या असे त्यांचे धोरण राहील. म्हणूनच आपल्याकडील ज्या कारखानदारांजवळ नवीन प्रक्रिया, तंत्र व उत्पादन–सूत्रे व पेटंटस् आहेत त्यांना तांत्रिक पातळीवर काही मर्यादित स्वरूपाचे नफा व उत्पन्न मिळविणे शक्य होईल.

**आपण स्वत: बँकिंग व फिनान्शियल मॅनेजमेंट ह्या क्षेत्रात जास्तीत जास्त कार्य केले आहे. तिकडील बँकिंगविषयी आपले काय मत झाले ?**

थायलंड व सिंगापूर ह्या राष्ट्रांतील बँकिंग मला अद्ययावत व कार्यक्षम वाटले. विशेषत: नाणेबाजार व शेअरबाजार त्या देशात बराच सुसंघटित आहे. बँकांच्या इमारती, कार्यालयीन व्यवस्था व प्रशासनदेखील दर्जेदार वाटले; पण भारताशी तुलना करता त्यांचे बँकिंग आपल्याइतके ग्रामीण विभागाचे बाबतीत थायलंड, मलेशिया व इंडोनेशिया इथे अजूनही प्रगल्भ झाले आहे असे वाटले नाही. विशेषत: मॅनेजमेंट पातळीवरच्या अधिकाऱ्यांची वाण मला तिथेही भासली. बऱ्याच परदेशी बड्या बँकांची तेथील नाणेबाजारावर पकड आहे आणि परदेशी बँकांबद्दल स्थानिक लोकांच्या मनात एक प्रकारची विश्वासाची व सुरक्षिततेची भावना दिसते. ती जागा स्वदेशी बँका घेऊ शकल्या नाहीत. कॉमर्स, मॅनेजमेंट प्रशिक्षणाचा अभावही दिसतो. तसेच विद्यापीठीय स्तरावरच्या शिक्षणाचा प्रसारही कमीच दिसतो.

**सामान्य आर्थिक जीवनात तुम्हाला कोणत्या गोष्टी आढळल्या ?**

बेकारी व दारिद्र्याचे प्रमाण भारतापेक्षा निश्चित कमी आहे. लोकांच्या आवश्यक गरजा–अन्न, वस्त्र, घर इ. च्या बाबतीत समाधानकारक परिस्थिती. स्थानिक अन्नधान्य-उत्पादन पुरेसे आहे. लोकांच्या चेहऱ्यावर खाण्याची ददात आहे असे असमाधान दिसत नाही. आपल्यापेक्षा तिकडील गावे, शहरे, रस्ते, सार्वजनिक जागा, उद्याने, देवळे, विद्यालये, इ. स्वच्छ व सुंदर वाटतात. बँकॉक, सिंगापूर, कौलालुंपूर इत्यादी शहरांत तर पाश्चिमात्य शहरांसारखी अत्याधुनिकता आढळते. सिंगापूर हे त्यांतल्या त्यात संपन्न शहर. २८ लाख वस्तीच्या ह्या शहरात १० लाख मोटारी असूनही रस्त्यावरील वाहतुकीचे सुयोग्य नियोजन झाले आहे. तिकडील कापड नक्षीदार व रंगीबेरंगी असते. शहरातील मध्यमवर्गीय लोकांचे रहाणीमान पाश्चात्यपद्धतीचे होत आहे. स्त्री–पुरुष दोघेही नोकरी करू लागले आहेत. शहर व खेडी ह्यात मात्र तफावत आहे व संपत्तीच्या वाटणीतही विषमता दिसते. सिंगापूर-

मारख्या छोट्या राज्यात इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट आहेत. तसेच घरबांधणीचा कार्यक्रम सरकारने प्रॉव्हिडंट फंड व विमा यांच्या आधाराने घेतला आहे. साधारणपणे ४ खोल्या अधिक १ हॉल येवढा फ्लॅट २२००० डॉलरमध्ये ( सुमारे ७०००० रु. ) होतो. त्यातले फक्त २००० डॉलर सुरुवातीला भरावे लागतात. दरमहा सुमारे १५० डॉलर भाडे + कर्जहप्ता बसतो. ३ खोल्यांच्या फ्लॅटला ९२ डॉलर म्हणजे सुमारे ३०० रु. मासिक हप्ता द्यावा लागतो. त्यामुळे फ्लॅटपद्धत शहरात फारच लोकप्रिय झाली असून भिन्न उत्पन्नगटाच्या लोकांना आपआपल्या ऐपतीनुसार मालकीच्या घरांचा फायदा मिळू लागला आहे. घरबांधणीला कर्ज प्रॉ. फंडाच्या व विम्याच्या पॉलिसीच्या तारणाने मिळते. त्यामुळे घर बांधण्याचा खर्च मध्यम परिस्थितीतल्या व्यक्तींना देखील झेपू शकतो. तांदूळ ७० सेंटस् ते १ डॉलरपर्यंत म्हणजेच २ ते ४½ रुपयांपर्यंत १ किलो अशा भावाने भरपूर उपलब्ध आहे. साखर १ किलोला १ डॉलर म्हणजे सुमारे ३ रु. किलो आहे. इतकी महागाई-देखील गेल्या ५–१० वर्षांतच झाली आहे.

**भारतातल्या उद्योगव्यापार करणाऱ्यांना एशियन देशातील बाजारपेठात व कारखानदारीत कसा शिरकाव करता येईल ?**

एक तर आपल्या ट्रेड कौन्सलमार्फत आपल्याला आपल्या वस्तूची विक्री करता येईल. मलेशिया, थायलंड ह्या देशांचे बोटीचे भाडे फार थोडे आहे. तसेच विमानवाहतूक नियमित-पणे व जलद आहे. विमानाचे भाडेही तसे कमीच आहे. त्या देशांना प्रत्यक्ष भेटी देणे टूरिस्ट म्हणून देखील इष्ट आहे. त्याचप्रमाणे ' सिंगापूर इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स ' तसेच ' फॉर ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू ' ह्या इकॉनॉमिक बुलेटिन्स-मध्ये तिकडील व्यापार-उद्योग, स्टॉक एक्स्चेंज, बँका इत्यादींची भरपूर माहिती मिळते. त्या देशातील वेगवेगळ्या कारखान-दारांची डिरेक्टरी ह्या चेंबर्समार्फत मिळेल व त्यांच्याशी सहकार्याकरता संपर्क, पत्रव्यवहार व चर्चा करता येईल. ह्या


## ५ सप्टेंबर !

डॉ. राधाकृष्णन् यांचा जन्मदिन–
शिक्षकदिन

सर्व शिक्षकांना विनम्र अभिवादन !

## विद्या सहकारी बँक लि.

जुन्नरकर दत्तमंदिर इमारत,
कॉमनवेल्थजवळ, लक्ष्मीरोड,
पुणे 30

प्रा. प. वि. पटवर्धन
अध्यक्ष

मासिकात आलेली एक उल्लेखनीय जाहिरात बघा.

' For confidential–up to date information about trading with China, you could try Mr Li Chiang, Minister of Foreign Trade. ( He lives in Peking ) ......Or you could subscribe today to the China Trade Report. Lt's your best alternative. "

ही दुसरी जाहिरात पहा—

" Singapore international chamber of Commerce, External Trade Enquiry. Form, 4th floor, Denmark House, Singapore 1. " ( Products required, enquirer's name, Address. )

हा फॉर्म भरून पाठविल्यानंतर विनामूल्य माहिती पुरविण्यात येते. त्यांच्याकडील चेंबर ऑफ कॉमर्सच्या बुलेटिन्स-मध्ये सबंध जगातील, तसेच परिसरातील आर्थिक महत्त्वाची माहिती दिली जाते. त्या पद्धतीचे कार्य आपल्याकडील चेंबर्सनी, बँकांनी करण्याची आवश्यकता आहे.

नव्या महत्त्वाकांक्षी महाराष्ट्रीय कारखानदारांना आपण वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन देण्यात व आर्थिक सहाय्य मिळवून देण्यात खूपच आस्था दाखवली आहे. समजा, नव्या तरुण टेक्नोक्रॅट्सना ह्या लेखामुळे भारताच्या आग्नेय दिशेकडे झेप घ्यावीशी वाटली तर आपण त्यांना मदत कराल काय ?

अवश्य. अहो, त्याकरताच तर मी मुद्दाम अर्थच्या वाचकांकरता ही माहिती दिली. जेवढी शक्य असेल तेवढी मदत, माहिती मी व माझी बँक पुरवेलच; पण त्याहीपेक्षा मी असे सुचवेन की, आपल्याकडील किर्लोस्कर, दांडेकर, आपटे ह्यांच्या उद्योगसमूहांपैकी त्या भागाशी प्रत्यक्षात संबंध आलेल्या उद्योजकांचाच सल्ला ह्या दृष्टीने जास्त बहुमोल ठरेल.

डॉ. वसंतराव अजूनही सांगत राहिले असते. त्यांनी त्यांच्या दौऱ्यातून प्रचंड माहिती मिळविली आहे; पण रविवारचा दिवस...होता ! ज्या बैठकीच्या खोलीमध्ये आम्ही बसलो होतो तिथेच संध्याकाळचे ६ वाजल्यानंतर चित्रवाणीकरता उत्सुक असलेली त्यांची मुले बिचकत बिचकत संकोचाने पुढे आली. हळू आवाजात, चोरपावलांनी येऊन त्यांनी टी. व्ही. चे स्विचही सुरू केले. तेव्हा मी वेळप्रसंग लक्षात घेऊन स्वतःच काढता पाय घेतला.

डॉ. वसंतरावांची ह्या विषयावरची व्याख्याने आयोजित करता आली तर जास्त चांगले होईल. म्हणजे त्यांच्या माहितीचा भरपूर लाभ अर्थशास्त्राचे विद्यार्थी, उद्योगव्यवस्थापनाचे विद्यार्थी, तसेच धडाडीचे तरुण संयोजक ह्यांना होऊ शकेल. अर्थच्या लेखाने ह्या संकल्पाची सुरुवातच झाली असे म्हणता येईल.

॥ श्री ॥

संपादक ' अर्थ ' मासिक, ६९० शिवाजीनगर, पुणे ४

स. न. वि. वि.

आपल्या अर्थ मासिकाचा मी / आम्ही वर्गणीदार होऊ इच्छितो.

कृपया ______________________ महिन्यापासून अंक पाठविणेस सुरवात करावी. कळावे.

व्यक्ती वा संस्थेचे नाव ______________________

पत्ता ______________________

ठिकाण ______________________ दिनांक ______________________

आवेदक

# उद्योग वार्ता

प्रा. प्र. वि. सोवनी

'अर्थ' मध्ये उद्योगवार्ता हे सदर सुरू करण्याचा आमचा संकल्प आम्ही प्रगट केला होता. त्या आवाहनाला प्रा. प्र. वि. सोवनी ह्यांनी अर्थवरील लोभाने योग्य असा प्रतिसाद देऊन आम्हांस उपकृत केले आहे. प्रा. सोवनी हे भूशास्त्राचे प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेजचे उपप्राचार्य, तसेच फर्ग्युसनच्या माजी विद्यार्थ्यांच्या मंडळाचे एक क्रियाशील घटक म्हणून सुपरिचित आहेत. 'सृष्टिज्ञान' ह्या मासिकाचे ते एक संपादक असून सुबोध पद्धतीने शास्त्रीय विषयांवर सातत्याने लेखन करण्याचा त्यांचा व्यासंग मराठी वाचकांना माहीतच आहे. औद्योगिक क्षेत्रातील अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याकरता 'उद्यम' ह्या मासिकात ते गेली अनेक वर्षे 'औद्योगिक आघाडीवर' हे सदर चालवीत आहेत. चालू महिन्यापासून आपल्या अर्थच्या वाचकांकरता 'उद्योग–वार्ता' हे सदर नियमितपणे चालविण्याचा त्यांचा मानस आहे. ह्या सदरातील साररूपाने उपलब्ध झालेल्या बहुमोल माहितीचा उपयोग, प्रामुख्याने उद्योग-व्यापार क्षेत्रातील संस्था व व्यक्ती, तसेच बी. ए. व बीकॉमचे भारतीय अर्थव्यवस्थेचे विद्यार्थी आणि हायर सेकंडरीचे शिक्षक ह्यांना होऊ शकेल. सर्वसामान्य वाचकांसही भारतात कोणत्या दिशेने व वेगाने अत्याधुनिक स्वरूपाचा आर्थिक कायापालट होत आहे हेही जाणून घेताना विस्मय व अभिमान वाटेल. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय जरूर कळवावे ही विनंती.

## 'हिंदुस्थान मशीनटूल्स'ची नेत्रदीपक प्रगती

**इसवी सन १९५३;** बंगलोर येथे सरकारी क्षेत्रातील हिंदुस्थान मशीन टूल्सच्या कारखान्याची उभारणी स्वित्झर्लंडमधील मेसर्स ओर्लीकॉन मशीन टूल्स' यांच्या तांत्रिक साहाय्याने सुरू झाली.

**इसवी सन १९७४;** त्याच हिंदुस्थान मशीनटूल्समध्ये तयार झालेल्या यंत्राची स्वित्झर्लंडमध्ये निर्यात करण्यासंबंधी एका स्विस कंपनीबरोबर करार करण्यात आला. या निर्यातीचे मूल्य ४५ लक्ष स्विस फ्रँक (सुमारे १। कोटी रुपये) इतके होते.

अवघ्या २१ वर्षांच्या कालावधीत एच्. एम्. टीने किती प्रगती केली आहे याचे हे पुरेपूर बोलके चित्र आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून नवभारताची उभारणी करण्यासाठी पंचवार्षिक योजनांची आखणी सुरू झाली. त्या वेळी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे भारताजवळ औद्योगिक प्रगतीसाठी लागणारा कच्चा माल आणि मनुष्यबळ यांची वाण नसली तरी विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांची यंत्रसामग्री तयार करण्यासाठी लागणारी मूलभूत स्वरूपाची यंत्रसाधने म्हणजे मशीनटूल्स यांची मात्र फार मोठ्या प्रमाणात उणीव भासत होती. तसे पाहिले तर किरकोळ मशीनटूल्स तयार करणारे सुमारे २५० कारखाने स्वातंत्र्यपूर्व काळातही अस्तित्वात होते; पण ते अगदीच लहान प्रमाणावर असून भारतीय कारखानदारीची खरी नड त्यामुळे भागणार नव्हती. मशीनटूल्सच्या व्यवसायांत फार मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणे आवश्यक असते आणि त्या मानाने त्यातून होणारी प्राप्ती सावकाशीची असते. असे असल्याने लहान कारखानदारांकडून या बाबतीत फारशी भरीव कामगिरी होण्याची शक्यता नसल्याने भारतसरकारने स्वतःच या व्यवसायात उतरण्याचे ठरवले.

कारखान्याच्या उभारणीसाठी मशीनटूल्सच्या क्षेत्रात गाजलेल्या अशा 'मेसर्स ओर्लीकॉन मशीनटूल्स' या स्विस कंपनीशी तांत्रिक साहाय्याचा करार करून 'बंगलोर' येथे हिंदुस्थानमशीन टूल्सचा पहिला कारखाना उभारण्यात आला. स्वातंत्र्यानंतर औद्योगिक प्रगतीसाठी भारतसरकारने परकीय कारखानदारांशी तांत्रिक सहकार्य करण्याची ही पहिलीच घटना होती.

१९५६ मध्ये कारखाना कार्यान्वित झाला आणि एका वर्षाच्या आतच येथे तयार झालेल्या लेथयंत्रांची देशोदेशीच्या तज्ज्ञांकडून वाखाणणी होऊ लागली. मेसर्स ओर्लीकॉन कंपनीबरोबर केलेल्या कराराची मुदत वास्तविक १९७४ पर्यंत होती; पण कारखान्याची पूर्ण उभारणी झाल्यानंतर या कराराचा फेरविचार करण्यात आला. कारखान्याच्या दैनंदिन व्यवस्थेत परदेशी कंपनीची भागी ठेवल्यामुळे अनेक अडचणी उभ्या राहात होत्या. त्यामुळे सरकारने ओर्लीकॉन कंपनीला त्यांच्या भांडवलाचा वाटा व व्यवस्थापनातील तांत्रिक मदतीबद्दलची रोख रकम देऊन टाकली व कारखान्याची संपूर्ण जबाबदारी स्वतःकडे घेतली. भारताजवळ अद्यापपर्यंत कसबी व प्रशिक्षित कामगार पुरेशा संख्येने उपलब्ध नसल्याने हे पाऊल काहीसे धाडसाचेच होते; पण कंपनीच्या खंबीर व्यवस्थापनामुळे याबद्दल पस्तावण्याची पाळी न येता उलट कंपनीची वाटचाल वेगानेच होत गेली आणि अल्पावधीतच उत्पादन इतके वाढले की कारखान्याच्या उभारणीचा १ कोटी रु.चा खर्च भरून येऊन पुढे सालोसाल नफा उरू लागला. या नफ्यातून पुन्हा बंगलोरलाच एच्. एम्. टी. चा आणखी एक, पहिल्यापेक्षाही मोठा कारखाना उभारण्यात आला. यामुळे दोन्ही कारखान्यांचे मिळून वार्षिक २ हजार यंत्रसाधनांइतके उत्पादन होऊ लागले.

पहिल्या दोन कारखान्यांच्या भरघोस यशामुळे आत्मविश्वास येऊन एच. एम. टी. ने आपले कार्यक्षेत्र भारतभर विस्तारण्याचे ठरवले. त्याप्रमाणे तिसऱ्या-चौथ्या योजनेत इतरत्र आणखी तीन नवे कारखाने सुरू करण्याच्या योजना कार्यान्वित झाल्या. चंडीगड व सिमला यांना जोडणाऱ्या रस्त्यावर 'पिंजोर' या गावानजीक मशीनटूल्सचा तिसरा कारखाना १९६३ मध्ये उभा राहिला. चौथा कारखाना केरळ प्रांतातील अर्नाकुलम् आणि अल्वाये यांच्यामध्ये असणाऱ्या कालामेसरी या गावी १९६४ मध्ये सुरू झाला. १९६५ मध्ये एच. एम. टी. चा ५ वा कारखाना आंध्र प्रदेशात हैद्राबाद येथे उभारण्यात आला.

'मशिन टूल्स'च्या उत्पादनाबरोबरच १९६२ मध्ये एच. एम. टी. ने मनगटी घड्याळे तयार करण्याच्या क्षेत्रात पदार्पण केले. यासाठी जपानमधील मेसर्स सिटिझन वॉच फॅक्टरीबरोबर तांत्रिक सहकार्याचा करार करण्यात आला. बंगलोर येथेच उभारलेल्या या घड्याळाच्या कारखान्यातून सुरुवातीला पुरुषांसाठी स्टेनलेस स्टीलचे जनता व सुवर्णमुलाम्याचे 'सिटिझन' आणि महिलांसाठी सुवर्णमुलाम्याचे 'सुजाता' अशा तीन प्रकारच्या घड्याळांचे उत्पादन सुरू झाले. नंतर त्यात आणखी प्रकारांची भर पडून आता रेडियम तबकडीचे 'जवान', वैमानिकांसाठी 'पायलट' आणि खास निर्यातीसाठी 'सोना' ही घड्याळे तयार होऊ लागली. अगदी अलीकडे रोजचा दिनांक दाखवणारी 'तारीख' आणि किल्ली द्यावी न लागता हाताच्या हालचालीने आपोआप स्प्रिंग गुंडाळली जाणारी स्वयंचलित अशा दोन घड्याळांची भर पडली. आता एच. एम. टी.ने घड्याळांच्या कारखानदारीचे क्षेत्रही विस्तारण्याचे ठरवून काश्मिरात श्रीनगरजवळ झाइनाकोट येथे घड्याळांचा नवा कारखाना सुरू केला आहे. येथे तयार होणाऱ्या घड्याळाचे नाव 'चिनार' असे ठेवले आहे. सध्याचे एच. एम. टी.चे सर्व प्रकारच्या घड्याळांचे वार्षिक उत्पादन ५ लक्षाहून अधिक आहे आणि ते लवकरच १० लक्षांवर नेण्याच्या योजना आहेत.

## ग्रामीण भागासाठी रेडिओ-टेलिफोन :

बंगलोर येथे 'टेलिफोन' उपकरणे तयार करण्याचा भारतातील सर्वात मोठा कारखाना आहे. हे अनेकांना ऐकून माहीत असेल; पण बंगलोरच्या खालोखाल टेलिफोननिर्मितीचा दुसरा मोठा कारखाना अलाहाबादजवळ असलेल्या नैनी या गावी आहे याची फारच थोड्यांना कल्पना असेल. नैनीच्या या कारखान्यात वायरिंग नसलेले डायल टेलिफोन, डायल फिरवण्याऐवजी बटणे दाबून नंबर मिळवण्याचे टेलिफोन आणि बिनतारीने चालणारे रेडिओटेलिफोन तयार केले आहेत.

ग्रामीण भागासाठी अत्यंत उपयुक्त असलेले हे रेडिओटेलिफोन नव्या दिल्लीच्या टेलि कम्युनिकेशन रीसर्च सेंटरच्या साहाय्याने तयार करण्यात आलेले असून मुख्य टेलिफोन एक्सचेंजच्या सभोवतीच्या तीस किलोमीटर त्रिज्येच्या परिसरात असलेल्या कोणत्याही ग्रामीण भागातील सार्वजनिक टेलिफोन केंद्रातून या फोनचा वापर करता येईल. या फोनसाठी तारांच्या जाळ्याची अथवा खांबांची आवश्यकता राहणार नाही. कारण ग्रामीण भागातील सार्वजनिक टेलिफोनकेन्द्रे व मुख्य एक्सचेंज एकमेकांशी हाय फ्रिक्वेन्सी रेडिओ तरंगांनी जोडण्याची व्यवस्था केलेली आहे. ग्रामीण भागांतील फोनएक्सचेंजच्या द्वारा रेडिओलहरींनी एकमेकांशी संपर्क साधू शकतील. या अद्ययावत साधनांमुळे उघड्यावर असलेल्या फोनच्या तारा चोरीला जाण्याचे किंवा वादळे, पूर यामुळे खांब वाकून तारा तुटण्याचे प्रसंगच उद्भवणार नाहीत.

रेडिओ-टेलिफोनबरोबरच या कारखान्यात एक अगदी

आधुनिक स्वरूपाचा टेलिफोन तयार करण्यात आला आहे. या फोनच्या डायलऐवजी 'की बटणे' (Key buttons) आहेत. आकड्यांच्या क्रमाने ती ती बटणे दाबल्याबरोबर एक्सचेंजकडे त्या नंबरची नोंद होऊन कनेक्शन मिळते. **दोषयुक्त डायलमुळे पुष्कळदा चुकीचे नंबर मिळून कॉल्स वाया जातात. ते या 'पुश बटण' टेलिफोनमुळे टळेल. या फोनचे नाव 'अशोक' असे ठेवले आहे.**

तिसऱ्या नव्या प्रकारच्या टेलिफोनचे नाव 'नवीन' असे ठेवलेले असून या फोनच्या आत तारांच्या जड जंबालाऐवजी छापील सर्किटकार्ड आहे. ट्रान्झिस्टरयुक्त कॉम्पोनन्टस्नी हा फोन तयार केल्यामुळे आकाराला अत्यंत सुटसुटीत असून तो बिघडण्याची शक्यताच नाही. नुकतेच या तिन्ही प्रकारच्या टेलिफोनउपकरणांचे उत्पादन सुरू झालेले असून १९७९ पर्यंत या (नैनी) कारखान्याचे वार्षिक उत्पादन पाच लाखांच्या घरात जाईल.

## पाचव्या योजनेतील खतउत्पादनाचा कार्यक्रम

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने कारखानदारी व औद्योगिक विकास या क्षेत्रात बरीच आघाडी मारलेली असली तरी अन्नधान्यउत्पादनाच्या बाबतीत मात्र अद्याप स्वयंपूर्णता गाठलेली नाही. त्यामुळे आता पाचव्या योजनेत सर्वांत जास्त महत्त्व कृषिविषयक कार्यक्रमांना देण्यात आलेले आहे. धान्योत्पादनासाठी सर्वांत महत्त्वाची गरज पुरेशा खतपुरवठ्याची आहे. गेली काही वर्षे भारतातील खताचा वापर आणि उत्पादन यांमध्ये सतत वाढ होत आहेच; पण यापुढील पाच वर्षांत ही वाढ विशेष भरघोस प्रमाणात करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवलेले आहे. भारतातील खतउत्पादनाचे गेल्या काही वर्षांचे आकडे असे आहेत :

| सन | खतउत्पादन लक्ष टन |
|---|---|
| १९६९–७० | ९.५० |
| १९७०–७१ | १०.५० |
| १९७१–७२ | १२.५० |
| १९७२–७३ | १५.५० |
| १९७३–७४ | १९.०० |

**आता यापुढील पाच वर्षांत म्हणजे १९७८–७९ च्या सुमारास भारतातील खतउत्पादन वार्षिक ७० लक्ष टन नायट्रोजन खते आणि १७ लक्ष टन फॉस्फेट खते इतके व्हावे असे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले आहे.** यासाठी सध्या चालू असलेल्या कारखान्यांची वाढ करण्यात येईलच. त्याचप्रमाणे आणखी नवे १०–१२ कारखाने सुरू करण्यात यावयाचे आहेत. यांपैकी तीन कारखाने अनुक्रमे मथुरा (उत्तरप्रदेश), भाटिंडा (पंजाब) व कर्नाल किंवा पानिपत (हरियाणा) येथे उभारण्याच्या योजना आखण्यात आल्या असून दोन कारखाने अनुक्रमे परदीप (ओरिसा) व कांकीनाडा येथे उभारण्यासंबंधी विचार चालू आहे. **पाचव्या योजनेत खतउत्पादनाच्या कार्यक्रमासाठी ११४९ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे.**

## लघु, मध्यम आणि मोठे उद्योग

नवी दिल्ली येथील स्मॉल इंडस्ट्री रीसर्च इन्स्टिटयूटने **'लघु, मध्यम आणि मोठे उद्योग' या नावाची एक अत्यंत उपयुक्त मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित केली आहे.**

भारतापुढे उभ्या असलेल्या अनेक समस्यांपैकी 'बेकारी'ची समस्या फार बिकट व धोकादायक आहे. भारताच्या कृषी आणि औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमातून काही प्रमाणात रोजगारी वाढत असली तरी तेवढ्याने हा प्रश्न सुटत नाही.

बेकारीवरचा एक तोडगा म्हणजे स्वतःचा व्यवसाय सुरू करणे! **आज लघुउद्योगाला खूप वाव आहे; पण दुर्दैवाने त्याविषयीची पुरेशी माहिती कोणालाच नसल्याने व योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने तरुणांची कार्यशक्ती वाया जात आहे.**

या पुस्तिकेने ही निकडीची उणीव बऱ्याच प्रमाणात दूर होण्यास मदत होईल. **या पुस्तिकेत सुमारे ६० व्यवसायांची सविस्तर माहिती-भांडवल, कच्चा माल, यंत्रसामग्री, तांत्रिक ज्ञान, कुशल किंवा अकुशल किती कामगार लागतील, मालाची बाजारपेठ, खर्चाचा अंदाज इत्यादी अत्यंत सुस्पष्टपणे देण्यात आली आहे.** या व्यवसायात चिकट गोंद (ॲडेझिव्ह) निर्मितीपासून तो तारखिळे–उत्पादन इत्यादींची माहिती अकारविल्हे क्रमाने दिलेली आहे. व्यवसायासाठी अत्यंत कमी व्याजाच्या दराने भांडवल कोठून कसे मिळवावे यासाठीही मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. पुस्तिकेच्या शेवटी परिशिष्टात यंत्रसामग्री व कच्चा माल यांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांचे नाव-पत्ते दिलेले आहेत. नव्याने उद्योग-व्यवसायात पडू इच्छिणाऱ्या कष्टाळू व धाडसी तरुणांना ही पुस्तिका अत्यंत उपयुक्त ठरेल. पुस्तिकेची किंमत ४०.०० रु. असून मागणी 'Small, Medium and Large Scale Industries' या नावाने
Small Industry Research Institute
A / 43 Roop Nagar, Delhi–110007
या पत्त्यावर करावी.

**नवीनयंत्रे प्रक्रिया व प्रकल्प**

# ' एसेन स्टिरिओज् 'चे

## तीन तरुण ध्वनितंत्रज्ञ

### लोणकर, कुलकर्णी व जोगाईकर ह्यांची मुलाखत

राजेंद्र पटवर्धन

बालगंधर्व रंगमंदिराच्या समोरच्या घरातली एक छोटीशी खोली. येथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे स्टिरिओ बनवणारी, दिवसरात्र कष्ट उपसणारी मंडळी वावरतात. इथं वृथा भपका नाही. आरास नाही. हिरवळ नाही. इथं आहे बुद्धी, ईर्षा आणि अत्यंत अद्ययावत् तंत्रज्ञान. क्वालिटीचा ध्यास घेऊन राहिलेले तीन युवक इंजिनियर—सारंग लोणकर, शिरीष कुलकर्णी आणि अनिल जोगाईकर. सारंग आणि शिरीष इलेक्ट्रिकल इंजिनियर आणि अनिल इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर. एंटरटेनमेंट इलेक्ट्रॉनिक्स हा जगभर सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय. स्टिरिओ, रेडिओ, टेपरेकॉर्डर यांची ही दुनिया. या दुनियेत रममाण झालेल्या, 'एसेन' स्टिरिओज् बनवणाऱ्या या तिघांच्या कर्तृत्वाची राजेंद्र पटवर्धन याने घेतलेली ही मुलाखत. १९७३ च्या सवाई गंधर्व पुण्यतिथीमध्ये सर्वांच्या कौतुकाचा विषय असलेले अॅकॉस्टिक इंजिनियर्स ते हेच !

**'या उद्योगधंद्यामध्ये प्रवेश करायला तुम्हाला सगळ्यात कोणती गोष्ट कारणीभूत झाली ? धंद्याची आवड का अॅम्प्लिफायर—तंत्रज्ञानाची आवड का आणखी काही ?'**

'खरं म्हणजे शिरीष आणि मला दोघांनाही इलेक्ट्रॉनिक्सची लहानपणापासून खूपच आवड. आम्ही दोघेही अगदी शाळेपासून बारीकबारीक वस्तू बनवत असू.'

'म्हणजे खूपच वर्षे तुमचं सहकार्य सुरू आहे तर ?'

'नाही नाही. सारंग आणि माझी ओळख झाली ती आम्ही दोघे बी. ई. इलेक्ट्रिकलला होतो तेव्हा. त्याआधी आमचा इलेक्ट्रॉनिक्सचा छंद आपापल्या घरीच सुरू होता. आमची ओळख आणि मैत्री झाल्यावर आम्ही दोघांनी मिळून आमचा छंद पुढे चालू ठेवला.'

'स्टिरिओची कल्पना तुम्हाला कशी काय सुचली ?'

'त्याचं असं झालं. बी. ई. च्या वर्षातच आम्ही विजेची उपकरणं दुरुस्त करण्याचा धंदा थोडथोडा सुरू केला. एवढ्यात हॉटेल पर्लसाठी संगीताची सिस्टिम करण्याचं कॉंट्रॅक्ट आम्हाला मिळालं. यामध्ये आम्हाला अनुभव चांगला मिळाला आणि मुख्यतः आत्मविश्वास वाटायला लागला की, आपण स्टिरिओ सिस्टिम बनवू शकू.'

'सध्या तुम्ही काय काय तयार करता ?'

'सध्या आम्ही घरगुती आणि औद्योगिक दोन्ही उपयोगांसाठी स्टिरिओ सिस्टिमस् आणि नाट्य-चित्रपटगृहांची साउंड सिस्टिम ह्यांवरच लक्ष केंद्रित करतो आहोत.'

'भारतामध्ये ही दोन्ही क्षेत्रं—विशेषतः नाट्य-चित्रपटगृहांच्या साउंड सिस्टिमनं—कितपत प्रगत आहेत ?'

'आपल्याकडे मुख्य समस्या ही आहे की, अॅकॉस्टिक्स—ध्वनितंत्र (आवाज – ध्वनितंत्र पोहोचवण्याचं तंत्र) फार मागासलेलं आहे. याचं कारण अनेकदा थिएटरचा मालक या बाबतीमध्ये अजाण आहे. एखाद्या चित्रपटगृहाचं अॅकॉस्टिक्स उत्कृष्ट बनवायचं तर अगदी पाया खणण्यापासून ते प्रोजेक्टर बसवेपर्यंत सर्व गोष्टींचा सर्वांगीण विचार करावा लागतो हे त्याला समजलेलं नाही. बाकी तसं पाहिलं, तर ध्वनिविद्युत तंत्रज्ञान पुष्कळ पुढे गेलेलं आहे आणि उपलब्ध आहे.'

'म्हणजे चित्रपटगृहाचा रचनाकार आणि साउंड एक्स्पर्ट यांचं सतत सहकार्य पाहिजे.'

'आणि ते तर मिळणं कठीण जातं. बऱ्याचदा साउंड एक्स्पर्टला इतक्या उशीरा काम देण्यात येतं की, ॲकॉस्टिक्स-वर परिणाम करणाऱ्या बहुतेक सगळ्याच गोष्टी पूर्ण झालेल्या असतात. कलाकुसर, वातानुकूलित सामग्रीच्या नलिका, स्टेजची जागा, बांधकामाचं साहित्य ठरलेलंच असतं.'

'तुम्ही यावर काय उपाय करता?'

'आमचा सतत प्रयत्न राहतो की, थिएटरच्या अगदी पायापासून आमचा बांधणीशी संबंध राहावा आणि आमच्या कल्पना अंमलात याव्यात. मला एका गोष्टीचा उपयोग झाला. ती ही की, **मी महाविद्यालयीन कलासहकार संस्थेचा चिटणीस होतो.** यामुळे मला रंगमंच, खेळती हवा, प्रेक्षकांची बसण्याची सोय यांचं परस्पर नातं काय असावं याची चांगली माहिती झाली.'

'आता सध्या अहमदनगरचा एक प्रकल्प आमच्याकडे आहे. विविध उपयोगांसाठी वापरासाठीच एका सभागृहाची साउंड सिस्टिम आम्ही करत आहोत.'

'भारतीय संगीताचे गुणधर्म आणि स्टिरिओ तंत्रज्ञान यांचं कितपत सख्य आहे?'


'गंमत अशी आहे की, स्टिरिओ हा पाश्चात्य देशांतून आलेला आहे. त्यांच्या संगीतात खूप वाद्ये असतात. यामुळे त्यांच्याकडे ध्वनिमुद्रण आपल्यापेक्षा फार वेगळं लागतं. त्यातून आपल्याकडे 'बहोतअच्छे', 'वाहवा', 'क्या बात है' वगैरे उद्गार श्रोतृवर्ग मोकळेपणानं काढत असतो. शांतपणे कार्यक्रम ऐकण्याची पद्धत (किंवा शिस्त!) आपल्याकडे नाही. या सगळ्यामुळे आमचे प्रश्न फार वाढतात.'

'पुन्हा भारतीय श्रोत्यांच्या आवाजाच्या प्रतीबद्दलच्या कल्पना मध्ये येत असतीलच?'

'आपल्याकडे स्टिरिओ किंवा विद्युत्-ध्वनितंत्र (इलेक्ट्रो ॲकॉस्टिक्स) हे संगीतापुरतंच आणि ध्वनिमुद्रणापुरतंच मर्यादित आहे असा एक समज बराच प्रचलित आहे. वास्तविक हे क्षेत्र फार व्यापक आहे. प्रत्यक्ष कार्यक्रमातही त्याचा फार मोठा उपयोग आहे–मग ते भाषण असो, नाटक असो अगर संगीताचा कार्यक्रम असो.

दुसरा एक विनोद म्हणजे आपल्याकडे लोकांना आवाज ठणठणीत लागतो. मग परवीन सुलतानाचा आवाज आणि निसार हुसेनखांचा आवाज सारखाच आला तरी त्यांना चालतो! आवाजाची स्पीकरमधून होणारी भ्रष्टता (डिस्टॉर्शन) त्यांना चालते.'

'म्हणजे श्रोत्यांना चांगला आवाज म्हणजे काय हे शिकवायला हवं तर?'



'एसेन स्टिरिओज्'चे अद्ययावत मॉडेल

'अगदी खरं! हाच हेतू ठेवून आम्ही सवाई गंधर्वपुण्यतिथीच्या वेळेस एक पुस्तिका वाटली होती. आमची थोडी जाहिरातही झाली त्यामुळे आणि लोकांना थोडंबहुत ज्ञान दिल्याचं समाधानही आम्हाला लाभलं. **'हाय फायडेलिटी' म्हणजे काय याची ओळख आम्ही करून दिली होती.'**

'बरं झालं तुम्ही सवाई गंधर्वपुण्यतिथीचा उल्लेख केला ते. मी त्यासंबंधी विचारणारच होतो तुम्हाला. पुण्याचा अखिल भारतीय कीर्तीचा हा संगीतमहोत्सव. तिथं प्रेक्षक हजारोंनी येणारे. तुमचं तंत्र–कौशल्य आणि परिश्रम यांची कसोटीच लागली असेल तिथं?'

'आम्ही खूप परिश्रम– अगदी रात्रंदिवस घेतले हे तर नक्की. या महोत्सवामुळं पब्लिक रिलेशन्स हा आमचा मोठा कार्यभाग सिद्ध झाला.

आम्ही स्पीकर्सची अशी झिगझॅग रचना केली की, एखाद्या भागातील सगळे एकाच वेळेस कधीच बंद पडणार नाहीत. लाउडस्पीकर्स ॲम्प्लिफायरला 'मॅच' होणं हे आवाजाच्या चांगल्या प्रतीसाठी महत्त्वाचं असतं. सर्वसाधारणतः हे मॅचिंग ट्रॅन्सफॉर्मरनं केलं जातं; पण ट्रॅन्सफॉर्मरमुळं आवाजाची भ्रष्टता वाढते. आम्ही एकही ट्रॅन्सफॉर्मर ठेवला नाही. स्पीकर्सची संख्या इतकी वाढवली की, चार वेगवेगळ्या सिस्टीमम्मधून श्रोत्यांना संगीताचा आस्वाद घेता येईल.'

'हे सर्व ज्ञान श्रोत्यांपर्यंत सातत्यानं गेलं पाहिजे, नाही का?'

'हे तर खरंच आणि त्यासाठीच जाहिरात हाच आमच्यापुढं मार्ग असतो; पण जाहिरात ज्या प्रमाणावर करावी लागते, ते आमच्यासारख्या लघुउद्योगाला परवडत नाही.'

'तुम्ही जाहिरात करतच नाही?'

'तसं नव्हे, पण आम्ही फारच कमी प्रमाणावर करतो. सध्या आमचं बजेट वर्षाला फक्त ५००० रुपये आहे. त्यातून एकदा आम्ही जी मोठी जाहिरात केली, तिनं आम्हाला एक मोठा धडा शिकवला. **जाहिरात देताना जेवढ्या ऑर्डर्स**

अपेक्षित असतील,तितक्या पुरवठ्यासाठी लागणारा उत्पादनाचा कार्यक्रम आधीच तयार पाहिजे याची आम्हाला पुरेशी कल्पना नव्हती.'

'मग तुम्ही मार्केटिंगची समस्या कशी सोडवली आहे ?'

'नुकतीच आम्ही दक्षिण भारतातल्या एक एजन्सीची आमचे सोल सेलिंग एजंट म्हणून नेमणूक केली आहे. त्यांना आम्हाला भारी कमिशन द्यावं लागणार आहे खरं; परंतु त्याला इलाज नाही.'

'तुमच्या या उद्योगधंद्यात रिसर्च अँड डेव्हलपमेंटला (संशोधन आणि विकास) खूप महत्त्व असेल नाही ?'

'हा छंद फार महागडा आहे. पुन्हा आपली करांची रचना भयानक आहे. १०० रुपयांचा एक सुटा भाग ग्राहकापर्यंत पोहोचेपर्यंत त्याची किंमत २२० रुपये होते. यामुळे संशोधन आणि विकास म्हणजे खूपच पैसा जातो; पण तुमच्या मालाची क्वालिटी तर तुमच्या विकासखर्चावर अवलंबून असते. शेवटी संशोधन, प्रत आणि पैसा यांची सांगड यशस्वीरीत्या घातली, तरच विक्री व्यवस्थित होते.'

आजवर आम्ही सुमारे १५००० रुपये डेव्हलपमेंटवर घालवले असतील. अर्थात् हे सर्व आम्ही धंद्यातल्या अंतर्गत उत्पन्नांतूनच मिळविले याचा उल्लेख केला पाहिजे. हे पैसे खर्च करून आम्ही सुरुवातीला घरी दीडशे रुपये देऊ शकत होतो. म्हणजे आम्ही तसे स्वयंपूर्ण होतो.'

'क्वालिटी कंट्रोल तुम्ही कसा ठेवता ?'

'सात हजाराची टेस्टिंग सामग्री आमच्याकडे आहे. तसं पाहिलं तर हा डेडस्टॉक आहे. कारण त्यापासून आम्हाला उत्पादन काहीच मिळत नाही, पण मालाच्या प्रतीसाठी टेस्टिंग, अत्यावश्यक आहे.'

'बँकांचं सहकार्य तुम्हाला कितपत मिळालं ?'

'आम्हाला एक विशेष अनुभव आला. आम्ही स्टिरिओ बनवतो हे थोडं प्रसृत झाल्यावर बँकाच पुढे आल्या आम्हाला कर्ज द्यायला ! अर्थात क्रेडिट स्क्वीझपूर्वीची गोष्ट आहे ही. नंतर जास्त कर्ज मिळणं जरा अवघड गेलं; पण दिलेल्या कर्जात काही काटछाट झाली नाही.'

'मोठमोठ्या कंपन्यांच्या 'ब्रँड' नावाचा तुम्हाला त्रास होतो का ? भारतीय ग्राहक हा ब्रँडला बळी पडतो अशी एक विचारधारा आहे.'

'प्रसिद्ध ब्रँड्सना घाबरून काहीच उपयोग नाही. पुन्हा त्यात असं आहे— आज आम्ही ज्या अवस्थेतून जात आहोत, त्या अवस्थेतून केव्हा ना केव्हा आजच्या प्रथितयश कंपन्या गेलेल्याच आहेत. आज त्यांच्या ब्रँडला जी किंमत आहे, तीमागे अनेक वर्षांचे कष्ट, संशोधन आणि खर्च आहे.'

'ही किंमत तुम्हाला परवडते का नाही हा प्रश्न आहे.'

'ही किंमत आम्ही वेगळ्या स्वरूपात देतो— ते स्वरूप म्हणजे आमच्या मार्केटिंग एजंटला आम्ही कमिशन देतो ते. यासाठी विक्रीच्या ३०% नफा हे सर्वसाधारण तत्त्व बाजूला ठेवून १०% ते १२% नफ्यावर आम्हाला समाधान मानावं लागतं; पण ही किंमत आम्हाला देणं हे अपरिहार्य आहे.'

'तुमच्या उत्पादनांतल्या दैनंदिन अडचणी खूपच असतील नाही ?'

'भारतीय उद्योगधंद्यांना त्रास देणारी कच्च्या मालाची टंचाई आम्हाला सहसा भेडसावीत नाही. कारण आम्हाला लागणारे उपभाग (कॉम्पोनन्टस्) मुबलकपणे (भारतीय बनावटीचे) उपलब्ध आहेत. आमची तक्रार आहे ती मालाच्या प्रतीविषयी. अचूकता हा भाग आपल्याकडे अभावानेच आढळेल. आमच्या ॲम्प्लिफायर चॅसीचंच घ्या ना. आम्ही ड्रॉइंग काढून देतो. जेथे बाहेर नॉब येतील, त्यासाठी लागणाऱ्या भोकांच्या जागा सर्व काही दिलेलं असतं. तरी हमखास प्रत्येक नॉब बरोबर बसेल असं कधीच होत नाही. स्क्रूजचंही असंच. २० ते ३० टक्के बादच होतात (रिजेक्टस्).'

'तुम्ही रिजेक्टस्ची किंमत थोडीच देता ?'

'हे म्हणणं सोपं आहे. १ पॅकेट आणले, तर त्यातले रिजेक्टस् मोजणं आणि ते परत पाठवून नवे मागवणं या द्राविडी प्राणायामाची किंमत त्या स्क्रूपेक्षा जास्त होईल ! अर्थात या सगळ्या प्रकारात ग्राहकाचा—म्हणजे आमचा आणि आमच्या ग्राहकाचा—मोठा तोटा होतो. कारण तेवढ्याच मालासाठी आम्हाला प्रसंगी दुप्पट किंमत द्यावी लागते.'

'तुमचे भविष्यकालात काय काय मनोरथ आहेत त्याविषयी सांगाल ?'

'मागच्या बजेटमध्ये एक्साइज ( उत्पादन—कर ) एवढा भरमसाट वाढवला आहे की, आमच्या स्टिरिओला बराच मार बसला. म्हणून आता नुसत्याच स्टिरिओवर अवलंबून न राहता आम्ही बऱ्याच नवनव्या क्षेत्रांत पाऊल टाकतो आहोत.

'कॅसेट प्लेअर' हा प्रकार आम्ही भारतात नव्यानं आणत आहोत. याचा उपयोग सिनेमाच्या जाहिराती, निवडणूक-प्रचार वगैरे खूप गोष्टींसाठी होईल. या यंत्रात एका माणसाचा— एका पुढाऱ्याचा म्हणा, एखाद्या नव्या प्रॉडक्टविषयी म्हणा— आवाज रेकॉर्ड होईल. प्रचारक हे यंत्र दूरवर नेऊन तो आवाज

पृष्ठ २८ वर

चलन वित्त बँका विकास नियोजन

# पाचवी योजना

**प्रा. राम बिवलकर**

महाडच्या डॉ. आंबेडकर कॉलेजमधील अर्थशास्त्राचे प्राध्यापक राम बिवलकर ह्यांचा पाचव्या पंचवार्षिक योजनेची पार्श्वभूमी, योजनेतील तरतुदी व संभाव्य अडचणी ह्यासंबंधी सुटसुटीत माहिती देणारा हा लेख विशेषतः अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांस उपयुक्त होईल.

सन १९६६ ते १९६९ या तीन वर्षांच्या काळात नियोजनाला सुटी द्यावी लागली; पण नियोजनमंडळाचे उपाध्यक्ष ख्यातनाम अर्थतज्ज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली नव्याने तयार झालेल्या चौथ्या पंचवार्षिक योजनेची कार्यवाही दि. १ एप्रिल १९६९ पासून सुरू झाली. निर्यातवाढ व उत्पादनवाढ या दृष्टीने त्या योजनेने पहिल्या दोन वर्षांत गतीही घेतली; पण तेवढ्यात बांगला देशाचे युद्ध उभे राहिले. योजनेमध्ये पाहणीत रेल्वे व सरकारी उद्योग यांमधून हवी तेवढी साधनसामग्री उभी राहिली नाही असे दिसून आले व त्यामुळे साधनसामग्री उभारणी व उत्पादन-लक्ष्ये यांचा फेरविचार करणे क्रमप्राप्त ठरले. योजनेच्या उर्वरित काळात चौथी योजनाही बारगळण्याची भीती निर्माण झाली. अशा परिस्थितीत पाचव्या योजनेचा आराखडा आकार घेत होता. त्याने प्रथम ७१–७२ सालातील किमती पायाभूत धरल्या होत्या; पण बांगला देशाचे युद्ध, निर्वासितांचा प्रश्न, यामुळे अर्थव्यवस्थेवर जो विलक्षण ताण पडत होता त्यामुळे किमतपातळी झपाट्याने चढत होती. साहजिकच पाचव्या योजनेच्या आराखड्यातील पायाभूत किमतीत बदल करून ७२–७३ सालाच्या किमती पायाभूत धरायच्या ठरले. आराखडा पुन्हा आकार घेत असतानाच, देशातील दहा राज्यांत पडलेला महाभयंकर दुष्काळ, मध्यपूर्वेतील 'तेली' राष्ट्रांनी खनिज तेल पुरवठ्याबाबत निर्माण केलेली तंगी, तेलाच्या भावात झालेली भयंकर वाढ व त्यामुळे तेलवापरावर आणि पर्यायाने औद्योगिक उत्पादनावर झालेला प्रतिकूल परिणाम, यामुळे या देशातील सर्वसाधारण किमतपातळी महाभयंकर वेगाने वाढली. आता ७२–७३ सालच्या किमतीही परीकथेतील भासू लागल्या! पण तरीही त्यांच्या आधारे तयार झालेला पांचव्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा, राष्ट्रीय नियोजन समितीपुढे सादर केला गेला व १७ डिसेंबर १९७३ रोजी तो मंजूरही करण्यात आला.

या मसुद्यात उत्पादनवाढीचा एकूण वेग वार्षिक ५·५ टक्के धरण्यात आला होता. त्यात शेतीउत्पादनातील वार्षिक ४·७ टक्क्यांची वाढ जमेस धरली होती आणि औद्योगिक उत्पादन वार्षिक ८ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज मांडला होता. उत्पादनवाढीचा हा वेग गाठण्यासाठी, योजनाकालात एकूण ५३,४११ कोटी रुपयांचा विकासखर्च करायचा, असे गणित योजनाकारांनी मांडले होते. यापैकी सरकारी अर्थ-क्षेत्रातील चालू विकासखर्चावर ५८५० कोटी रुपये खर्च व्हायचे होते आणि ३१,४०० कोटी रुपयांची नवी भांडवल-गुंतवण त्या क्षेत्रात करायचा मनसुबा योजनाकारांनी जाहीर केला होता. खाजगी क्षेत्रातील भांडवल गुंतवण १६,१६१ कोटी रुपये एवढी होईल असेही अंदाजिले होते.

वार्षिक साडेपाच टक्क्यांचा उत्पादनवाढीचा वेग फार मोठा होता असे नाही. तिसऱ्या व चौथ्या योजनाकाळात हाच वेग ठेवायचे उद्दिष्ट होते; पण ते गाठले गेले नव्हते. म्हणूनच वाढत्या किमतींच्या प्राप्त परिस्थितीत अंदाजित साधनसामग्री उभी करणे शक्य नसल्यामुळे नियोजनमंडळातील डॉ. मिन्हास-प्रभृती अर्थतज्ज्ञांनी साडेपाच टक्क्यांच्या वाढीच्या दराला विरोध दर्शविला होता. त्यांच्या मते, उद्योग व शेती याकरता तेल, पोलाद, रसायने, निरिंद्रिय खते या गोष्टींची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागणार असल्याने व औद्योगिक कच्च्या मालाच्या जागतिक किमती भरमसाठ वेगाने वाढत

असल्याने देशाच्या आयात-निर्यातीचा तोल, मसुद्यात अपेक्षिल्या-प्रमाणे साधणे केवळ असक्य होते. योजनेच्या मसुद्यातील साधनसामुग्री उभारणी आणि उत्पादनलक्ष्ये या बाबतचे अंदाज परिस्थितीने पार उधळून दिले आहेत. योजनेची गृहीतकृत्ये फोल ठरविली आहेत. अशी योजना कार्यवाहीत आणून पैसे मात्र खर्च होतील, प्रत्यक्ष उत्पादनलक्ष्ये गाठली जाणार नाहीत.

पण अशी भूमिका घेऊनही सरकारला पाचव्या योजनेची कार्यवाही १ एप्रिल १९७४ पासून सुरू करता आली नाही. योजना, 'मसुदा' या पातळीवरच राहिली. तिचा अंतिम प्रबंध आजवरही तयार झाला नाही. रोज वाढत जाणाऱ्या किमतींची परिस्थिती कायम आहे तोपर्यंत योजना आखणे शक्य नाही ही नियोजनमंडळातील अर्थतज्ज्ञांची भूमिका रास्त नाही असे कसे म्हणता येईल?

किमती वाढत असल्या की सरकारच्या विकासेतर खर्चात वाढ होणे क्रमप्राप्तच असते. महागाई वाढली की सरकारी कर्मचाऱ्यांना महागाईभत्ता वाढवून देणे, नव्या वेतनश्रेणींची त्यांची मागणी मान्य करणे सरकारला भाग पडते. जनतेला स्वस्त धान्य उपलब्ध करण्याच्या उपक्रमावर, वाढत्या किमती-मुळे, सरकारला वाढती खोट सहन करावी लागणे हेही योग्यच; पण त्यामुळे विकासेतर खर्च वाढले की विकास-खर्चात कपात करणे अनिवार्य ठरते.

वाढत्या महागाईमुळे राहणीमानाचा खर्च वाढला की प्रत्येक क्षेत्रातून पगारवाढीच्या, मजुरीवाढीच्या मागण्या पुढे येणारच. संघटित कामगारक्षेत्रात त्या मान्य करण्यावाचून गत्यंतर नसल्यामुळे उत्पादनखर्चातील वाढ अटळ ठरते. विकास-कार्यक्रमांच्या व प्रकल्पांच्या खर्चातही वाढ होते. पैशातील भांडवलगुंतवण फुगलेली दिसली तरी प्रत्यक्ष खरी गुंतवण खूपच कमी होते, साधनसामुग्रीच्या तुटवड्यामुळे अनेक चालू प्रकल्पांवरील खर्च रोखून धरावे लागले की विकासप्रकल्पांची वेळापत्रकेही उधळली जातात.

पण हे सारे खरे असले तरी पुन्हा नियोजनाला सुटी देणे सरकारला राजकीयदृष्ट्या गैरसोयीचे असल्यामुळे नियोजन-मंडळाचे नवे उपाध्यक्ष डॉ. हक्सर यांच्या नेतृत्वाखाली पाचव्या योजनेला अंतिम स्वरूप द्यायची घाईघाई नियोजन-मंडळात उडाली आहे. केंद्र आणि राज्यसरकारांनी महसूल आणि इतर उत्पन्नात वाढ करण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे पाचव्या योजनेच्या मसुद्यातील या ६,८५० कोटी रुपये उभारणीचा अंदाज कधीच ओलांडून जाईल, चालू चढ्या किमतीमुळे सरकारच्या हाती अधिक उत्पन्न येईल, असे योजनाकारांना आणि नियोजनमंत्रालयाला वाटत आहे. १९७५-७६ साली केंद्र सरकारने व रेल्वेने उत्पन्नवाढीचा जो दर अपेक्षिला आहे, त्यामुळे ४०० कोटी रुपये तरी ज्यादा उपलब्ध होतील असे ती ती मंत्रालये म्हणत आहेत. विकासेतर खर्चांना कात्री लावण्याचे व अधिक पैसा उभारायचे राज्यसरकारांनी मान्य केले आहे. या साऱ्या गोष्टी पाचव्या योजनेच्या साधनसामग्रीच्या दृष्टीने आशादायक आहेत असे नियोजनमंडळाला वाटत आहे.

महागाई व भावफुगवटा यांचे मूळ गेल्या चार योजनांतील तुटीच्या अर्थभरण्यात आहे हे ओळखून पाचव्या योजनेच्या काळात तुटीचा अर्थभरणा मुळीच करावा लागू नये असा प्रयत्न योजनेच्या आराखड्यात होता. पुढे मसुदा तयार झाला तेव्हा तुटीच्या अर्थभरण्याची मर्यादा १ हजार कोटी रुपये ठरविण्यात आली. तरीही योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत तुटीचा अर्थभरणा मुळीच करू नये असे योजनाकारांचे म्हणणे होते. गतसाली तुटीचा अर्थभरणा किती करावा लागला ते आकडे आता माझ्याजवळ नाहीत; पण २८ फेब्रुवारी १९७५ रोजी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी लोकसभेला सादर केलेल्या ७५-७६ सालच्या अर्थसंकल्पात चालू वर्षी ६२५ कोटी रुपयांचा तुटीचा अर्थभरणा करावा लागेल असे निर्देशित केले आहे. त्यांतील ३३० को. रुपये आयात अन्नधान्ये व खते यांच्या हाती असलेल्या साठ्यावरील असल्याने ते लवकरच वसूल होतील. शिवाय ते परकीय हुंडणावळीच्या साठ्यातून उचलले असल्यामुळे भाववाढीला कारणीभूत होणार नाहीत असे अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सूचित केले आहे. उरलेले २९५ कोट रुपये. मूळच्या १२६ कोटी रुपयांच्या अंदाजाच्या संदर्भात खूपच आहेत हे खरे; पण अर्थमंत्री म्हणतात, वाढत्या महागाई-मुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत व महागाईभत्त्यात जे फेरबदल क्रमप्राप्त आहेत त्याकरता, जनतेला स्वस्त धान्य पुरवण्याकरता व सरकारी उद्योगातील तूट भरण्याकरता हे आवश्यक आहे. पुढील वर्षी, भाववाढ रोखून धरून आणि विकासप्रकल्पावरील खर्च चालू ठेवूनही तुटीचा अर्थभरणा २२५ कोटी रुपयांपलीकडे जाऊ देणार नाही असा सरकारचा निर्धारही अर्थमंत्र्यांनी बोलून दाखवला.

अर्थव्यवस्था स्वावलंबी बनविणे आणि देशातील दारिद्र्याचे निर्मूलन करणे ही उद्दिष्टे समोर ठेवणारी पाचवी योजना, शेती व उद्योगक्षेत्रात वेगाने उत्पादनवाढ करणार आहे. उद्योगांच्या पायाभूत क्षेत्रातील उत्पादन वाढविणार आहे. अधिक रोजगारसंधि उपलब्ध करणार आहे. निर्यातवाढ करावी, आयात-पर्यायी उत्पादने वाढवावी म्हणून प्रयत्नशील राहणार आहे. देशातील शक्तिनिर्मितीचा पाया मजबूत करणार आहे.

# कागदी सोनियाचे दिवस !

## आंतरराष्ट्रीय विनिमयमाध्यमाचे नवे प्रकार

प्रा. वि. ज. गोडबोले
सी. टी. बोरा कॉलेज, शिरूर (घोडनदी)

आंतरराष्ट्रीय व्यवहारात सोने, स्टर्लिंग व डॉलर ह्यांचा उपयोग कसा केला जातो ह्याचे विवेचन, तसेच आंतरराष्ट्रीय देवघेवीचे व्यवहार पुरे करण्यासाठी जी रोखतेची टंचाई भासते ती कमी करण्याकरता ज्या विविध योजना सादर केल्या गेल्या त्यांपैकी ट्रिफिनयोजना, बर्नस्टाइन-प्रस्ताव, स्टँपयोजना, रूसायोजना इ. ह्यांची सुबोध माहिती ह्या लेखाद्वारे उपलब्ध झाली आहे.

### आंतरराष्ट्रीय रोखतेचा प्रश्न

आंतरराष्ट्रीय रोखतेची (International Liquidity) कल्पना ही आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीच्या व्यवहारांशी संबंधित आहे. प्रतिकूल व्यवहारशेष मिटवण्यासाठी संबंधित देश ज्या ज्या साधनांचा वापर करतात आणि अनुकूल व्यवहारशेष असलेले देश जी साधने स्वीकारतात त्या सर्व साधनांचा आंतरराष्ट्रीय रोखतेत समावेश केला जातो.

अशी साधने तरी कोणती ? आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या नियमांनुसार पुढील गोष्टी आंतरराष्ट्रीय रोखतेत येतात : अ. निधी आणि मध्यवर्ती बँका यांच्याजवळील सोन्याचे साठे. ब. अमेरिकेव्यतिरिक्त इतर देशांजवळील डॉलरसाठे. क. इंग्लंडव्यतिरिक्त इतर देशांजवळील स्टर्लिंग साठे. ड. निधीच्या सदस्य देशांची कर्ज घेण्याची पात्रता, जी सदस्य देश भरत असलेली निधीची वर्गणी आणि निधीबरोबर त्यांचे झालेले अल्प मुदती कर्जाचे करार यांना अनुसरून ठरते. इ. देशानी आपापसात केलेले कर्जकरार.

या साधनांपैकी सोने आणि डॉलर किंवा स्टर्लिंग ही चलने यांना रोखतेच्या दृष्टीने प्रथम दर्जा दिला जातो. सोन्याच्या मोबदल्यात कोणत्याही देशाकडून कितीही चलन मिळू शकते. म्हणजेच त्या देशातून पाहिजे तितकी आयात करता येते. तीच गोष्ट डॉलर किंवा स्टर्लिंगसारख्या चलनांची इंग्लंड किंवा अमेरिकेच्या आर्थिक समृद्धीमुळे त्या देशांना आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्या देशांची चलनेही आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीसाठी सर्व देशांकडून स्वीकारली जाऊ लागली. डॉलरगट आणि स्टर्लिंगगट असे ती चलने वापरणाऱ्या देशांचे गट तयार झाले. त्या चलनांचे मूल्य घसरणार नाही असा इतर देशांना विश्वास वाटत असल्याने आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीत अशा 'मजबूत' चलनांचा सोन्याइतकाच सर्रास वापर केला जातो. १९६० पासून मात्र रोखतेच्या संदर्भात जगापुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

सोन्याच्या जागतिक उत्पादनात प्रतिवर्षी २% ते ३% एवढीच वाढ होत असते. आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रतिवर्षी होणाऱ्या वाढीच्या तुलनेने अत्यल्प आहे. पूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमाण कमी असताना सोन्याचा विशेष तुटवडा जाणवला नाही; पण आता मात्र परकीय चलनांची गरज भागवण्याच्या दृष्टीने बहुतेक सर्वांजवळच सोन्याची चणचण निर्माण झालेली आहे. भावी काळात सोन्याचा तुटवडा आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे निर्माण करील. आंतरराष्ट्रीय व्यापार खुंटल्यावर जगाचीच भरभराट थांबेल.

असा हा रोखतेच्या प्रमाणाचा जसा प्रश्न निर्माण झालेला आहे तसाच प्रश्न रोखता निर्माण करणाऱ्या इतर साधनांच्या दर्जाबाबत निर्माण झालेला आहे. १९६० पासून डॉलर किंवा स्टर्लिंग या चलनांबाबत इतर देशांना वाटणारा विश्वास डळमळावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे या चलनांचे मूल्य अस्थिर बनून ही चलने पूर्वीसारखी स्वीकारार्ह राहिलेली नाहीत. उदाहरणार्थ अमेरिकन डॉलरच्या

चलनी निर्यातीत परदेशांतील डॉलर्सची गुंतवणूक, व्हिएटनाम युद्धखर्च, मागास देशांना आर्थिक मदत यांमुळे फार मोठी वाढ झालेली आहे. तथापि वास्तव निर्यात आहे तेवढीच राहिलेली आहे. अनेक युरोपीय देशांजवळ किंवा पेट्रोलउत्पादक देशांजवळ त्यांच्या परकीय चलनाच्या साठ्यात जे डॉलर्स जमा आहेत त्यांना युरो-डॉलर्स, पेट्रो-डॉलर्स असे संबोधले जाते. या देशांना अमेरिकेकडून मालाची आयात त्याच प्रमाणात करायची गरज वाटत नाही आणि म्हणूनच अमेरिकेच्या चलनी निर्यातीत वाढ झाली तरी वस्तूंच्या निर्यातीत वाढ झालेली नाही. त्याचे पर्यवसान डॉलर्सचा पुरवठा वाढून त्याचे सोन्यातील पर्यायाने इतर चलनातील मूल्य कमी झालेले आहे. त्यामुळे परकीय देशांनी आपल्याजवळील डॉलर्स इतर चलनात किंवा सोन्यात बदलून घ्यायच्या केलेल्या प्रयत्नामुळे मध्यंतरी अमेरिकन डॉलर संकटात आला होता. व्हिएटनाम युद्ध थांबवावे, परकीय मदतीचे प्रमाण कमी करावे, सार्वजनिक खर्चावर बंधने घालावीत असा जो मतप्रवाह अमेरिकेत निर्माण झाला. त्यामागे डॉलर्सचा पुरवठा घटवून डॉलरचे गडगडणारे मूल्य थोपवून धरण्याचाच हेतू होता. इंग्लंडलाही आपल्या देशात सातत्याने झालेल्या चलनवाढ व भाववाढीमुळे १९६७ मध्ये स्टर्लिंगचे अवमूल्यन करणे भाग पडले. स्टर्लिंगचे सोन्यातील मूल्य कमी करावे लागले. सारांश काय...मजबूत चलने कमजोर होणे यामुळेच आंतरराष्ट्रीय रोखतेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

## —यावर तोडगा ?

प्रत्येक देशास संबंधित देशाकडून कर्ज न घेता किंवा संबंधित देशांना सोने न पाठवता होणाऱ्या आयातीचे मूल्य फेडता येणे म्हणजेच जेवढी निर्यात होईल तेवढ्याच प्रमाणात आयात करणे हाच रोखतेची समस्या सोडवायचा योग्य तोडगा आहे. आयात-निर्यात जर समान असेल तर आंतरराष्ट्रीय रोखतेची अडचण चुटकीसरशी नाहीशी होऊ शकेल. आता हा तोडगा वाटतो तितका सोपा नाही. विकसनशील देशांना आर्थिक प्रगतीसाठी आयात ही अपरिहार्य असते, तर निर्यात वाढवणे त्यांना जवळजवळ अशक्यच असते. तांत्रिक प्रगतीच्या अभावी त्यांच्या उत्पादनाचा दर्जा चांगला नसला तर त्यांच्या मालाला इतर देशांत विचारतो कोण? तसेच हे देश करून करून निर्यात करणार कशाची? तर शेतीउत्पादनाची किंवा इतर प्रकारच्या कच्च्या मालाची! हा माल परकीय बाजारपेठेत खपवताना त्यांना इतरांबरोबर जबरदस्त स्पर्धा करणे भाग पडते. निर्यातमालाच्या किमती उतरवणे त्यांना भागच पडते म्हणजेच व्यापारशर्ती त्यांना सदैव प्रतिकूल राहून निर्यातवाढीबरोबर त्यांच्या तोट्यातच वाढ व्हायचा धोका संभवनीय! मागास देशांना निर्यात वाढवता येणार नाही व आयात मात्र वाढतच राहणार. भांडवलनिर्मितीसाठी, तांत्रिक प्रगतीसाठी, टंचाई रोखून धरण्यासाठी आयात ही अपरिहार्य आहे.

आता प्रगत राष्ट्रांनी उदारपणाने आयात करायचे धोरण स्वीकारल्यास त्यांच्या अंतर्गत आर्थिक हितसंबंधांना धोका पोचणार. अंतर्गत भांडवलगुंतवणूक, रोजगारी या क्षेत्रांना हानी पोहोचेल. तसेच आयातवाढीमुळे त्यांच्या चलनाचे सोन्यातील मूल्य घसरून रोखतेची समस्या ही जास्तच गुंतागुंतीची होईल.

आणि म्हणूनच 'आंतरराष्ट्रीय रोखतेचा प्रश्न' हा रॅडक्लिफ कमिटीच्या मतानुसार आंतरराष्ट्रीय समतोल विकासाच्या प्रश्नाशी निगडित आहे. जगातले सर्वच देश जेव्हा विकासाच्या समान पातळीवर येतील; सर्वच देशातल्या भांडवलनिर्मितीचे प्रमाण जेव्हा समान राहील त्याच वेळी आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सुटू शकेल. प्रत्येक देशाच्या संदर्भात कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल व्यापारशेष जरी राहिला तरी अल्पमुदती कर्जाच्या देवाणघेवाणीने व्यवहार पूर्ण होऊ शकतील.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने सदस्य राष्ट्रांसाठी अल्पमुदती कर्जाची तरतूद करून, वेळोवेळी निधीच्या वर्गणीत वाढ करून त्यायोगे सदस्य राष्ट्रांची कर्ज घेण्याची पात्रता वाढवून १९६२ पासून उसनवारीच्या सर्वसामान्य करारानुसार (General Agreement to Borrow) सातत्याने अनुकूल व्यवहारशेष असणाऱ्या सदस्य राष्ट्रांकडून कर्ज घेऊन, ते गरजू राष्ट्रांना उपलब्ध करून देऊन, किंवा १९६७ मध्ये विशेष उचल अधिकारयोजना (Special Drawing Rights Scheme) संमत करून, १९७० च्या जानेवारीपासून सदस्य राष्ट्रांना त्यांच्या वर्गणीच्या प्रमाणात उचल करण्याच्या तरतुदी करून आपल्यापरीने आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवर्षी भरणाऱ्या निधी बँक परिषदेत विविध अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय रोखतेच्या संदर्भात अनेक योजना मांडल्या आहेत.

## विविध योजना

**१. सोन्याच्या मूल्याची फेरनिश्चिती :** रॉय हॅरॉड यांच्या मतानुसार सर्वच देशांतील किमतपातळीत मोठी वाढ झालेली आहे. तथापि सोन्याचे मूल्य मात्र निधीच्या स्थापनेपासून आ

तेवढेच म्हणजे **१ औंस सोन्याला ३५ डॉलर्स हे कायम आहे.** (१९७५ मध्ये मात्र निधीच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी सोन्याची ही अधिकृत किंमत रद्दबातल ठरवली.) तेव्हा हे मूल्य दुप्पट म्हणजे **१ औंस सोन्याला ७० डॉलर्स केले** जावे. त्यायोगे आपोआपच डॉलरचे मूल्य घटेल. सदस्य देशांच्या सोन्यात दिल्या जाणाऱ्या वर्गणीचे मूल्य वाढून त्यांची कर्ज घेण्याची पात्रता वाढेल. निधीला कोणतेही चलन अधिक प्रमाणात उपलब्ध होऊ शकेल. महत्त्वाचे म्हणजे सुवर्ण-किंमत-पातळी व वस्तू-किंमत-पातळी यात सुसंवाद निर्माण होईल.

अर्थात या योजनेत काही धोके आहेत. सुवर्णमूल्याच्या वाढीने सोन्याच्या सट्टेबाजीला उत्तेजन मिळेल. रशिया किंवा दक्षिण आफ्रिकेत सोन्याच्या खाणी असल्याने त्या देशांचा भरमसाठ फायदा होईल. डॉलरचे मूल्य घटले की सर्वच देशांची आपापल्या चलनाचे अवमूल्यन करण्याची शर्यत लागेल. कर्ज घेण्याची पात्रता वाढली की प्रतिकूल व्यवहार-शेष असणारे देशही आयात धोरण शिथिल करतील. यामुळे सोन्याचे मूल्य वाढवण्यातील हेतूच असफल होऊन जाईल.

२. **ट्रिफिन योजना :** दुसऱ्या महायुद्धानंतर लॉर्ड केन्स यांनी आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीसाठी BANCOR असे एखादे चलन असावे व विविध चलनांच्या देवाणघेवाणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय निरसन केंद्र (International Clearing Union) असावे असे जे विचार मांडले त्यातील मध्यवर्ती कल्पनेवर ट्रिफिन यांची योजना आधारलेली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने स्वतः उच्चतम मध्यवर्ती बँक म्हणून कार्य पहावे किंवा अशी बँक स्थापन करावी. जगातल्या सर्व मध्यवर्ती बँकांनी आपला सुवर्णसाठा या उच्चतम मध्यवर्ती बँकेकडे सुपूर्द करावा. त्याच्या आधारावर या बँकेने सुवर्णपत्रे निर्माण करून विविध देशातल्या मध्यवर्ती बँकांना कर्जे द्यावीत. **व्यापारी बँक ज्याप्रमाणे पतपैसा निर्माण करते त्याच पद्धतीने या बँकेला कागदी सोने निर्माण करता येईल.** आरंभी प्रत्येक सदस्य देशाने आपल्याजवळील सोने व परकीय चलन निधीचा २०% भाग या बँकेकडे ठेव म्हणून ठेवावा. त्यावर या बँकेने व्याज द्यावे. यामुळे सोन्याचे चलनात वा चलनाचे सोन्यात रूपांतर करणे केव्हाही शक्य होईल. सदस्य देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्माण होणाऱ्या बिलांची फेरवटवणूक करून, प्रतिकूल व्यवहारशेष असणाऱ्या सदस्य देशांचे चलनरोखे खरेदी करून त्यायोगे त्यांना कर्ज उपलब्ध करून देऊन व येण्यादेण्याचे हिशेब संबंधित देशांच्या खात्यावर रकमा जमा किंवा नावे टाकून पूर्ण करणे हे या उच्चतम बँकेला शक्य होईल. या मार्गाने ही उच्चतम बँक मोठ्या प्रमाणात रोखता निर्माण करू शकेल.

या योजनेमध्ये जागतिक चलनवाढीचा मोठा धोका आहे व त्याला ही उच्चतम मध्यवर्ती बँकच आपल्या पतनिर्मितीमुळे कारण होईल. त्याचप्रमाणे ज्या देशांच्या चलनांना मागणी जास्त अशी चलने ठेव म्हणून उपलब्ध होणे हे उच्चतम बँकेलाही दुरापास्त होईल. याउलट बाकीच्या चलनांचा मोठा साठा बँकेकडे निव्वळ पडून राहील.

३. **बर्नस्टाइन प्रस्ताव :** बर्नस्टाइन यांनी आंतरराष्ट्रीय रोखतेची मागणी विचारात घेतली आहे. या मागणीमागेही व्यवहाराचा, सावधगिरीचा व सट्टेबाजीचा असे तीन हेतू असतात. पहिल्या दोन हेतूनुसार आंतरराष्ट्रीय रोखतेची अल्पकालीन मागणी ठरते. ही मागणी भागविण्यासाठी निधीला सदस्य देशांना जमा होणाऱ्या वर्गणीतून अल्पकाळासाठी कर्जाऊ रकमा देता येतील, तर तिसऱ्या हेतूने निर्माण होणाऱ्या मागणीसाठी निधीने, ज्या देशांच्या चलनांना सुरक्षित गुंतवणूक या दृष्टीने दीर्घकालीन मागणी आहे अशा इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जपान, युरोपीय आर्थिक समाजातील बाकीचे देश, अशा देशांबरोबर दीर्घमुदती कर्जे पुरवावे.

४. **स्टँप योजना**—या योजनेनुसार दरवर्षी निधीने तीन अब्ज डॉलर्स किंमतीची निधिपत्रे विक्रीसाठी काढावीत व अनुकूल व्यवहारशेष असणाऱ्या देशांनी ती खरेदी करावीत. ही निधिपत्रे त्यांना इतर देशांना मदत देण्यासाठी तसेच आपल्या परकीय-चलन-गंगाजळीसाठी वापरता येतील. ही योजना विकसित देशांना मान्य होण्यासारखी नाही. कारण जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय विकाससंस्था, आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा महामंडळ अशा विविध संस्थांमार्फत हे देश इतर विकसनशील देशांना मदत करतातच. त्यात आणखी एकाची भर त्यांना डोईजड होईल.

५. **मोल्डिंग प्रस्ताव**—अनुकूल व्यवहारशेष असणाऱ्या देशांनी आपली अतिरिक्त रक्कम निधीकडे सुपूर्द करावी म्हणजे सोन्याचा वापर न करताही निधीला परकीय चलनाची गरज भागवता येईल व सोन्याचे महत्त्व आपोआपच घटेल.

६. **रुसा-योजना**—निधीने आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे कागदी चलन निर्माण करून ते देवाणघेवाणीसाठी वापरावे. अर्थात या योजनेचे यश पूर्णपणे देशादेशांतील परस्पर सहकार्यावर अवलंबून आहे.

## कागदी सुवर्ण-रोखे

या सर्व योजनांचा साकल्याने विचार करून १९६७ मध्ये निधीने विशेष उचल अधिकारयोजना संमत केली. ट्रिफीन

यांनी मांडलेली 'कागदी सोन्याची कल्पना' या योजनेत अभिप्रेत आहे. निधी आपल्याजवळ असणाऱ्या सोने व परकीय चलनाच्या जोडीला विशेष उचल अधिकाररोखे निर्माण करेल. या रोख्याच्या एका परिमाणाची किमत ·८९ ग्रॅम शुद्ध सोने ठरवण्यात आलेली आहे. १९७० पासून कार्यवाहीत आलेल्या या योजनेनुसार पुढील तीन वर्षांत निधीने ९५० कोटी डॉलर्स किमतीचे असे रोखे निर्माण केले. प्रतिकूल व्यवहारशेष असणारे देश आपले देणे भागवण्यासाठी या रोख्यांचा उपयोग करतात, तर धनको देशांच्या मध्यवर्ती बँका सोने व परकीय चलनाच्या जोडीला हे रोखे आपल्या गंगाजळीत ठेवतात. निधी या रोख्यांवर थोडे व्याजही देतो. प्रत्येक देशाचा उचल करण्याचा अधिकार हा त्याच्या वर्गणीच्या प्रमाणात ठरतो. आंतरराष्ट्रीय विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीने निधीने प्रतिवर्षी ठराविक मर्यादितच असे रोखे निर्माण करण्याचे बंधन घालून घेतले ते आवश्यकच आहे.

अशा तऱ्हेने हे कागदी सोने म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आलेली पतनिर्मितीच आहे. आंतरराष्ट्रीय रोखतेचा प्रश्न त्यामुळे सध्या तरी काही प्रमाणात सुटलेला आहे.

☘

## नवीन यंत्रे, प्रक्रिया, प्रकल्प : पृष्ठ २२ वरून

ऐकवील. एका वेळेस पाचशे ते हजार लोक तो ऐकू शकतील एवढी या यंत्राची क्षमता राहील.'

'दुसरी एक गोष्ट आमच्या मनात आहे. ती म्हणजे रेडिओ-स्टेशन स्टुडिओसाठी मिक्सर्स. आमच्या धंद्यात एक फार चांगली गोष्ट अशी आहे की, एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात उडी घेणं सहज शक्य आहे. उदाहरणार्थ, ज्या उपभागांपासून ॲम्प्लिफायर बनतो, त्यापासून 'बर्गलर अलार्म'ही बनू शकतो.'

'एक गोष्ट तुम्ही सांगितली नाहीत—इथं बुद्धिप्रामाण्याला फार महत्त्व आहे, नाही का?'

'यात एक गंमत अशी आहे की, 'लर्निंग इन द कॉन्स्टन्ट प्रोसेस' हा धडा रोज आचरणात आणावा लागतो. नाही तर टिकाव धरणंच कठीण असतं.'

'तुमचं सध्याचं उलाढालीचं उद्दिष्ट किती ठेवलं आहे तुम्ही?'

'आमची कंपनी ऑक्टोबर १९७२ ला रजिस्टर झाली. तेव्हापासून सव्वादोन लाखांचा व्यवहार आम्ही केला आहे. येत्या दोन वर्षांत तो प्रतिवर्षी साडेतीन लाखांवर नेण्याची ईर्षा आहे. तीनचार लाखांचं भांडवल लागणार आहे. हल्ली ते काही स्वस्त नाही! परंतु आम्ही आशावादी आहो.'

'तुमच्या कंपनीची रचना कशी काय आहे?'

'आम्ही तिघे भागीदार आहोत. दोन ऑपरेटर्स आहेत आणि एक सुतार. म्हणजे सगळे मिळून सहा. भरपूर कष्ट घेण्याची आमची तयारी असल्यामुळं काहीच प्रश्न नाही.'

'तुमच्या तिघांच्या आयुष्यक्रमात आणि उद्योगधंद्यात जॉब सॅटिस्फॅक्शन या भागाला तुम्ही किती महत्त्व देता?'

'जॉब सॅटिस्फॅक्शन या एका गोष्टीमुळंच आम्ही इथं टिकून आहोत. नाही तर केव्हाच आरामाची नोकरी पत्करून धंद्यात विराम घेतला असता! तशी वेळ आम्हाला आली नाही हा दैवाचा भाग; पण ती आली असती तर ती निभावून नेण्याची मनाची जिद्द व चिकाटी कमी होईल असे वाटत नाही.

१०० रुपयांच्या वस्तूची किमत ग्राहकापर्यंत २२५ रुपये कशी होते?

| | रुपये |
|---|---|
| कचा माल व उपभाग | ९०—०० |
| मजुरी | ४—०० |
| ओव्हरहेड्स्—वीज, स्टेशनरी, प्रवास वगैरे | १०—०० |
| ठोकळ नफा | २०—०० |
| एक्साईज ड्युटी | २७—०० |
| सोल एजंट कमिशन | ८—०० |
| वाहतूक आणि विमा | ३—७५ |
| केंद्रीय विक्रीकर | ४—०० |
| स्थानिक डीलर | ३०—०० |
| स्थानिक कर | २८—२५ |
| | २२५—०० |

☘

# सहकारी साखर कारखाने व कामगार संघटना

प्रा. अरविंद द. पुराणिक
वैकुंठ मेहता इन्स्टिटयूट ऑफ को-ऑ. मॅनेजमेंट, पुणे

**सहकारी साखरकारखान्यातील मजूरसंघटनांनी उत्पादक, मालक व मजूरसंबंधातील गुंतागुंत लक्षात घेऊन कृषक-कामगार संयुक्त सहकार्याची भावना वाढविण्याकरता कोणती भूमिका घ्यावी ह्याबद्दलचे प्रा. पुराणिक ह्यांचे विवेचन काहींना पटेल, काहींना अमान्य होईल; पण ह्या विचाराला चालना द्यावी ह्या दृष्टीने हा लेख उद्बोधक होईल.**

महाराष्ट्रात सहकारी साखरकारखान्यांची फार मोठी वाढ झालेली आहे. कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही प्रकारची कारखानदारी वाढू लागली की, कामावर असलेल्या कामगारांची संघटना होणे अपरिहार्य असते. ह्या नियमानुसार आज सहकारी साखरकारखान्यांमधून कामगारसंघटना कार्य करताना दिसून येतात. कामगारसंघटनांविरुद्ध आता कोणत्याही प्रकारचा औपचारिक स्वरूपाचा किंवा तात्त्विक स्वरूपाचा विरोध राहिला नाही.

मालक व कामगार यांच्या उद्दिष्टात काही बाबतीत मूलभूत स्वरूपाचा फरक राहणे अपरिहार्य असते. उदा. कारखान्याचे मालक व त्यांचे प्रतिनिधी आपल्या कारखान्याचे हित सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतात. याच्या उलट कामगारसंघटना व त्यांचे प्रतिनिधी कामगारांचे हित सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. हित सांभाळण्याचा दोन्हीही पक्षांचा प्रयत्न कारखान्याला खर्चापेक्षा मिळणाऱ्या उत्पन्नाभोवती जास्त केंद्रित झालेला असतो. या उत्पन्नाचा जास्तीत जास्त हिस्सा मिळवण्याचा प्रयत्न दोन्हीही पक्षांकडून सतत होत असतो. ज्याची ताकद जास्त त्याला अधिक मोठा हिस्सा मिळण्याचा संभव असतो. जर कामगारांनी उत्पादकता जास्त दाखविली तर आधुनिक दृष्टिकोनाच्या व्यवस्थापकाकडून कामगारांना पुष्कळ वेळा त्यांच्या वेतनापेक्षा अधिक रक्कम मिळू शकते. जोडीला अलीकडच्या काळात शासनसंस्थेमार्फत केल्या जाणाऱ्या कामगारविषयक कायद्याचा लाभही कामगारवर्गाला मिळू शकतो.

स्थूलमानाने कारखाना व कामगारसंघटना यांच्या संबंधावर वरील परिच्छेदात प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशी परिस्थिती जरी असली तरी खाजगी क्षेत्रातील कारखानदारी व सहकारी क्षेत्रातील कारखानदारी यांच्यात संघटनात्मक स्वरूपाचा फरक असल्यामुळे काही वेगळ्या प्रकारचे प्रश्न निर्माण होऊ शकतात याची जाणीव पुरेशा प्रमाणात अजूनही झालेली दिसून येत नाही. त्यामुळे काही कामगारविषयक प्रश्न वेगळ्या रीतीने हाताळावे लागतील याची कल्पना स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे असे वाटते.

सहकारी साखरकारखाना हा सहकाराच्या मान्यवर तत्त्वानुसार प्रस्थापित केलेला असतो. सहकाराच्या तत्त्वांचा जर विचार केला तर असे म्हणावे लागेल की, ज्या सभासदांच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे ते सभासद एकत्र येतात व कारखान्याचे रूपात प्रक्रिया-केंद्र प्रस्थापित करतात. उदा. ऊस पिकविणारा शेतकरीच सहकारी साखरकारखान्यांचा सभासद होऊ शकतो. अशा तऱ्हेच्या साखरकारखान्यांपुढे खाजगी साखरकारखान्यापेक्षा वेगळा प्रश्न निर्माण होतो. खाजगी कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना शक्यतो कमी किंमत देऊन ऊस विकत घेण्याचे धोरण आखावे लागते. याच्या उलट सहकारी साखरकारखाने हे धोरण आखू शकत नाहीत. कारण ऊस पिकविणारा शेतकरीच हा सहकारी साखरकारखान्याचा मालक असतो. कोणताही मालक आपणा स्वतःविरुद्ध धोरण आखू शकत नाही. एवढेच नव्हे तर सहकारी साखरकारखान्याच्या सभासदाला आपल्या उसाच्या लागवडीचा एकरी खर्च बाहेर काढता येतो की नाही याचा विचार जरूर करावा लागतो. खाजगी साखरकारखान्याचा नफा मिळवणे हा एकमेव उद्देश असतो. त्यामुळे कामगार-

संघटना व कच्चा माल पुरविणाऱ्या उत्पादकसंघटना यांचा खाजगी साखरकारखान्याकडे बघण्याचा दृष्टिकोन अगदी वेगळा असतो. सहकारी साखरकारखान्यात ही परिस्थिती अस्तित्वात नसते.

म्हणून कामगारसंघटना आपला प्रश्न दोन प्रकारे सोडवून घेते. (१) मालकांचेबरोबर सामुदायिक प्रकारचा करार करून वेतनविषयक सवलती ते मिळवू शकतात. (२) संचालक–मंडळावर प्रतिनिधित्व मिळवून अनेक निर्णयांत ते सहभागी होऊ शकतात. स. सा. कारखान्यांचे संदर्भात सामुदायिक करार करून घेण्याचीच शक्यता अधिक असते. कामगारसंघटनांचे प्रतिनिधित्व सहकारी तत्त्वानुसार मान्य होण्यासारखे ठरेल असे वाटत नाही. त्याची कारणे दोन. प्रतिनिधित्वाचे स्वरूप कोणते असावे याबाबत एकमत होणे अवघड आहे. उदा. नुसतेच प्रतिनिधित्व दिले तर उसाला किती किमत यावी याबद्दल फार मोठे वादग माजू शकेल. खाजगी कारखान्यात मात्र नफ्यातील कोणता हिस्सा कामगारांना किंवा उत्पादकांना (कच्चा माल पुरविणारांना) द्यावा यावर चर्चा होऊ शकेल व मालकांना मिळणाऱ्या नफ्यातील चढउतार करारानुसार स्थिर करता येतील; परंतु सहकारी साखरकारखान्यांत मात्र याबद्दल चर्चा करणे आवश्यक ठरू शकेल. जोडीला तात्त्विक दृष्ट्या कामगार किंवा उत्पादक हे दोन्ही वर्ग खाजगी कारखान्यात भागभांडवलाचे धारक होऊ शकतात. सहकारी साखरकारखान्यांत मात्र कामगारांना भागभांडवलाचे धारक होता येणार नाही. म्हणूनच सहकारी साखरकारखान्यांत कामगार–संघटनांच्या प्रतिनिधित्वाला आज तरी विरोध होण्याची शक्यता आहे.

---


अर्थची वार्षिक वर्गणी चेक वा मनीऑर्डरने खालील पत्त्यावर पाठवावी.

संपादक, 'अर्थ' मासिक

९०६ शिवाजीनगर, पुणे ४

(वार्षिक वर्गणी ३० रुपये)


---

(२) ऊस न पिकविणाऱ्या कामगाराला सहकारी साखरकारखान्याचे सभासदत्व देता येत नाही. म्हणून कामगार–संघटनांचे प्रतिनिधींना संचालक मंडळावर येता येणार नाही. सहकाराच्या मान्यवर तत्त्वानुसार हा मुद्दा आपणास विचारात घ्यावा लागेल. या दोन कारणांकरिताच मला असे वाटते की, सह. सा. कारखान्यात सामुदायिक करारालाच महत्त्व राहील.

सह. सा. कारखान्यांनी आपल्या कारखान्यांचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण आखलेले दिसते. याचा अर्थ असा की, नुसत्या सभासदांच्या हिताचा विचार न करता ते सर्व परिसराचा विचार करू लागले आहेत. अशा परिस्थितीत कामगारसंघटनांनी सह. सा. कारखान्याकडे बघण्याचा आपला पारंपारिक दृष्टिकोन सोडला पाहिजे व सामुदायिक कराराचे महत्त्व लक्षात घेऊन आपले धोरण आखले पाहिजे.

सह. सा. कारखान्याच्या उत्पादक सभासदांना ऊस लागवडीकरिता लागणारे साहित्य व साधनसामग्री चढ्या भावानेच विकत घ्यावी लागतील. त्यामुळे त्यांच्या उत्पादन–खर्चावर नियंत्रण असे कोणतेही रहात नाही. शिवाय शासनाच्या धोरणानुसार त्यांना लेव्ही द्यावी लागते. पीक–नियोजनाच्या कार्यक्रमाखाली आपल्याजवळील शेतीचा काही भाग धान्यपिकाखाली आणावा लागणार आहे. अशा परिस्थितीत उत्पादकाच्या पुढच्या ज्या अडचणी आहेत त्यांचा विचार केला नाही तर कामगारसंघटनांना कारखान्यांकडून ज्या अपेक्षा आहेत त्या पुऱ्या होणे शक्य नाही.

म्हणूनच सहकारी साखरकारखाने म्हणजे नवीन प्रकारची भांडवलशाही आहे असे म्हणणे तर्काला धरून होणार नाही. "भांडवलशाही" हा शब्द कामगारनेत्यांनी लिहिला किंवा उच्चारला की ताबडतोब सह. सा. चे मूळ स्वरूप कामगाराच्या दृष्टीने अस्पष्ट होऊ लागते व सह. साखरकारखान्यावर असमर्थनीय स्वरूपाची टीकाही चटकन सुरू होऊ शकते. याच कारणाकरिता मला असे वाटते की, कामगारसंघटनांच्या कार्यकर्त्यांनी सहकारी तत्त्वाचा अधिक खोल अभ्यास करावा व त्याप्रमाणे आपले धोरण आखावे. सहकारी साखरखानदारीमुळे महाराष्ट्राचा कायापालट फार वेगाने झाला आहे. कारण महाराष्ट्राच्या लहान शेतकऱ्याला सुद्धा आपल्या कर्तबगारीबद्दल फार मोठा आत्मविश्वास निर्माण झालेला आहे.



# नायजेरिया

## सत्तापालट झालेला आफ्रिकेतील एक संपन्न देश

अरविन्द महादेव पटवर्धन


नायजेरिआ हा आफ्रिकेतील सर्वांत जास्त लोकवस्ती असलेला संपन्न देश आहे. ह्या देशाच्या उत्पन्नात पेट्रोलचा भाग मोठा. अलीकडे पेट्रोलच्या किंमती भडकल्यामुळे त्या देशाचे उत्पन्नह एकदम वधारले आहे. नुकत्याच झालेल्या लष्करी क्रांतीने जगाचे लक्ष ह्या देशाने वेधून घेतले आहे. भारतातील अनेक वस्तू नायजेरियात निर्यात होतात. तसेच देशाच्या संपन्नतेमुळे आपल्याकडील (इंजिनिअरिंग इंडस्ट्रीजना, तसेच तंत्रज्ञांना एक नवी बाजारपेठ खुली झाली आहे. नायजेरिआवर माहितीपूर्ण लेख घेताना चक्षुर्वै सत्यं ह्या तत्त्वानुसार, नायजेरियात गेली अनेक वर्षे राहात असलेले आमचे एक स्नेही श्री. अरविंद पटवर्धन ह्यानाच आम्ही हा लेख लिहिण्यास सांगितले. ते थोड्या दिवसांकरता इथे सुटीत आले आहेत. त्यांतील काही दिवस 'सार्थकी' लावण्याकरता 'अर्थ'ने त्यांना गळ घातली.

श्री. पटवर्धन ह्यांचे शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल, सातारा, तसेच फर्ग्युसन कॉलेज, पुणे, येथे झाले. वनस्पतिशास्त्राची एम. एस्. सी. पदवी संपादन करून पुण्यातील M. E. S. कॉलेजात अध्यापन केल्यानंतर १९६० मध्ये ते इथिओपियात शास्त्रशिक्षक म्हणून गेले. १९६४ पासून ते आजतागायत नायजेरियातच ते आहेत. : 'French for Indians' ह्या लोकप्रिय पुस्तकाचे ते लेखक. छंद—बॅडमिंटन, गिर्यारोहण, सृष्टिनिरीक्षण, फोटोग्राफी, प्रवास, आंतरराष्ट्रीय पत्रमैत्री, नाणी व तिकिटसंग्रह. ग्रीस, स्वित्झर्लंड, इटली, फ्रान्स, नेदर्लंड, इंग्लंड, इजिप्त, सूदान, केनया, लेबॅनॉन, कुवेत, बाहरीन, इराक, इराण, अफगणिस्तान ह्या देशांचा प्रवास.


**दि. २९ जुलाय १९७५ ला नायजेरियांत रक्तहीन सत्ता-बदल झाल्यामुळे या देशाविषयी बऱ्याच आप्त व मित्र-मंडळींनी मला प्रश्न विचारले. ह्या लेख वाचून मराठी जिज्ञासू वाचकांचे समाधान होईल अशी आशा आहे.**

**देशाचे नाव :** फेडरल नायजेरिआ. १२ घटकराज्यांचा एकसंधी देश.

**नायजेरिआची ऐतिहासिक स्थित्यंतरे :** गेल्या शतकात कॅप्टन क्लॅपर्टन या इंग्रजी धाडसी प्रवासी–संशोधकाने नायजेर नदीचा उगमापासून मुखापर्यंत प्रत्यक्ष प्रवास करून शोध लावला. व्यापाराच्या व ख्रिस्ती धर्माचा प्रसार करायच्या निमित्ताने आलेल्या ब्रिटिश लोकांनी जम बसवायला सुरुवात केली. या भूभागातून नायजेर नदी वाहते म्हणून या देशाला 'नायजेरिआ' नाव पडले. क्रमशः निरनिराळ्या टोळ्यांना जिंकून स्थानिक राजांना अंकित करण्यात आले. कालांतराने ब्रिटिशांची सत्ता पक्की झाली. फ्रेंच व ब्रिटिश वसाहतवाद्यांनी आपल्या सोईसाठी आफ्रिका खंडाची आपसात वाटणी केल्यामुळे मूळ सलग असलेल्या टोळ्या विभक्त झाल्या आणि परस्परांशी हाडवैर असलेल्या टोळ्यांना 'युनिअन जॅक'खाली एकत्र आणण्यात आले. या सक्तीच्या प्रयोगाकडे देशभक्त निग्रो अजूनही साशंकतेने पहातात; विशेषतः नायजेरिआत पुढील कलहाचे बीज या प्रयोगाद्वारे ब्रिटिशांनी रुजविले अशी ठाम समजूत सर्वत्र आहे. सर्व पश्चिम आफ्रिकेत स्वातंत्र्याचे वारे वाहू लागल्यावर दि. १ ऑक्टोबर, १९६० रोजी नायजेरिआ एक स्वतंत्र राष्ट्र झाले. त्या वेळी डॉ. एन्.



शेंगाची पोती



युनिव्हर्सिटी कार्यालय

माडी आझिकिवे या इबो पुढाऱ्याला राष्ट्रपति आणि अल्हाजी मर अबुबकर तफावा बालेवा या हौसा टोळीपुढाऱ्याला पंतप्रधान नेमण्यात आले. त्या दोघांच्या नेतृत्वाखाली लोकसत्ताक राज्यघटनेप्रमाणे राज्यकारभार सुरू झाला. मागासलेल्या अशा या अविकसित देशात शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले. त्या वेळी देशात फक्त ४ प्रांत होते. १९६३ ची जनगणना व १९६४ मधील प्रांतिक निवडणुका या प्रामाणिकपणे झाल्या नाहीत असा विरोधीपक्षांचा दावा होता. संप, बहिष्कार, निवडणुकांचा शिमगा यातून निर्माण झालेला कलह वेळीच मोडून न काढल्याने राज्यकारभारात गोंधळ माजला. शिस्तीत वाढलेल्या व प्रबळ असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांना या स्वार्थी पुढाऱ्यांच्या राजकारणाचा उबग आल्याने लोकशाही बरखास्त करून लष्करी सरकार प्रस्थापित झाले. जानेवारी १९६६ मध्ये जनरल इरोन्सी राज्यप्रमुख बनले. ७–८ महिन्यांच्या कारकीर्दीत तेही आपले आपमतलबी राजकारण खेळत आहेत असे पाहिल्यावर लष्कराने ऑगस्ट १९६६ मध्ये उत्तर नायजेरियातल्या हौसा टोळीच्या ३० वर्षांच्या उमद्या मेजर जनरल याकुबू गोवान यांना राज्यप्रमुखपदी नेमले. त्यांनी प्रथम 'ब्रिआफ्रा' बंड मोडून राष्ट्रपुनर्रचनेच्या व राज्यकारभारात कडक शिस्तीने यशस्वी योजना आणून राज्यकारभार फार चांगला सुधारला असे म्हणावे लागेल. दि. २९ जुलाय ७५ ला पुनः रक्तहीन क्रांती होऊन ब्रिगेडिअर रुफाई महम्मद सध्या राष्ट्रप्रमुख आहेत.

सत्ता कोणाच्याही हातात असली तरी त्याचे सामान्य नायजेरिअनला सोयर–सुतक नाही. या निग्रो देशातले लोक आपल्या प्राचीन धर्म, संस्कृती, रीतिरिवाज, परंपरा, भाषा, पेहराव यांचा सत्यशोध घेऊ लागले आहेत. अमेरिकन निग्रोंनी पुरस्कारिलेल्या BLACK IS BEAUTIFUL या तत्त्वाचा पगडा तरुण पिढीवर पडला आहे. नव्या विज्ञानतंत्रसंस्कृतीचा फायदा घेऊन आपले जीवनमान सुधारावे अशी धडपड या एके काळी मागासलेल्या राष्ट्राने सुरू केली आहे.

**लोकसंख्य :** ७½ कोटी. उत्तर प्रदेशात विरळ तर दक्षिणेत दाट लोकवस्ती.

**भौगोलिक स्थान :** पश्चिम आफ्रिकेतील एक सधन पण औद्योगिक दृष्ट्या मागासलेला असे या नायजेरिआला म्हटले जाते. उत्तरेची सरहद्द सहारा वाळवंटाला भिडल्याने हवामान ( आपल्या विदर्भासारखे ) उष्ण व कोरडे असते. हिवाळ्यात थंडी व धुळीची वादळे सहारावरून येतात. त्याला लू किंवा हरमॅटन असे म्हणतात. देशाचा मधला पट्टा गवताळ प्रदेशाने व्यापला आहे. दक्षिणेत पावसाचे प्रमाण जास्त असल्याने हवामान दमट व उष्ण झाले आहे. राजकीय दृष्ट्या पश्चिमेला दाहोमे, उत्तरेला निझेर व चाड, पूर्वेला कॅमेरून्स या फ्रेंच भाषिक स्वतंत्र राष्ट्रांचे कडे नायजेरिआभोवती पडले आहे. दक्षिणेला अटलांटिक महासागराची मर्यादा पडली आहे.

**नैसर्गिक संपत्ती :** निरनिराळ्या प्रकारची ही संपत्ती विपुल असून शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ संशोधन करून देशाचा आर्थिक विकास घडवत आहेत.

(अ) खनिज संपत्ती : पेट्रोल व पेट्रोरसायने व लिक्विफाईड गॅस यांच्या निर्यातीपासून गेल्या वर्षी ५३ कोटी नायरांचे परदेशी चलन मिळाले. या प्रवाही सुवर्णाच्या जोडीला कच्चे लोखंड, कोकेबल कोळसा, कथील, शिसे, संगमरवर ही महत्त्वाची औद्योगिक खनिजे मिळतात.

(ब) वनसंपत्ती : मोठ्या वृक्षांत महॉगनी, शिसवी, रोझवुड, इरोको हे उत्तम दर्जाचे लाकूड इमारती, बोटी, फर्निचर-



लाकडी पेटीवाला, खाद्यपदार्थ विक्रेता



समुद्रकिनाऱ्याचे विहंगम दृश्य

निर्मितीत वापरले जाते. औषधी वनस्पतींचा उपयोग वैदू-लोक निरनिराळ्या रोगांवर करतात.

(क) पशुसंपत्ती : पाळलेल्या पशूंत मुख्यत्वे गाई, बकऱ्या, गाढवे, घोडे, उंट यांचे कळप उत्तरेत दिसतात. यांचे मांस, दूध व दुग्धजन्य पदार्थ या दृष्टीने महत्त्व आहे. त्से त्से माशा गुरांना व माणसांना चावून 'स्लीपिंग सिकनेस' पसरवतात म्हणून दक्षिणेत असे कळप दिसत नाहीत. म्हशी कोठेही अस्तित्वात नाहीत. मासेमारी मोठ्या प्रमाणावर नाही.

(ड) शेतकी माल : गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, चवळी, सोयाबीन्स, मूग, भुईमूग, कापूस, कसावा, कोको, कोलानट, तंबाखू.

(ई) फळे : केळी, रानकेळी, पपनस, लिंबे, मोसंबी, नारळ, अननस, पोपई, आंबे, पेरू, कलिंगडे, टरबूज, ॲवोकॅडो.

(फ) फळभाजी व पालेभाजी : कांदे, बटाटे, रताळी, आले, वांगी, कोबी, कॉली, फ्लॉवर, मटार, फ्रेंचबीन्स, मिरच्या, टोमॅटो, लसूण, याम्लो व याम.

**व्यापार : (अ) निर्यातीचा व्यापार** प्रामुख्याने अमेरिका व युरोपिअन राष्ट्रे व जपानशी आहे. पेट्रोल व पेट्रोकेमिकल्स, कमावलेली कातडी ( सुप्रसिद्ध मोरोक्को लेदर उत्तर नायजेरिआत होते ) कोकोबीन्स, पामऑइल, गोडे तेल, खोबरे, भुईमूग, कथील यांपासून प्रचंड प्रमाणावर परदेशी चलन मिळते.


**(ब) आयात व्यापार :** कारखान्यांची यंत्रे, विद्युत्‌उपकरणे, रेडिओ, टी. व्ही. सेटस्, पखे, रेफ्रिजरेटर्स, एअरकंडिशनर्स, सलूनकार्स, बसेस, ट्रक्स, लॉरीज, मोटरसायकल्स, सायकली, औषधे, रसायने, कापड, तयार कपडे, दूध, चीज, लोणी, मद्ये, साखर, सिमेंट, बांधकामाचे लोखंडी सामान, चैनीच्या वस्तू, शिवण-यंत्रे, घड्याळे इत्यादी.

आयात वस्तूंत क्रमशः जपान, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, पूर्व युरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रे, चीन यांचा उल्लेख करावा लागेल. **'हम भी कुछ कम नही' असे म्हणत बराच भारतीय बनावटीचा माल हिन्दी व्यापाऱ्यांनी आणवला आहे. त्यात प्रामुख्याने कापड, तयार कपडे, सायकली, वीज-फिटिंगचे साहित्य, वायर्स, स्विचेस, बल्ब-होल्डर्स, टाटा ट्रक्स व बसेस, नांगर, उषा शिवणयंत्रे व पंखे, हिन्दी चित्रपट, ताईत, गंडे, अंगठ्या, बासमती तांदूळ, डाळी, मसाले, लोणची, पापड, उदबत्त्या, क्रिकेट, हॉकी, फूटबॉल, टेनिस, बॅडमिंटन इत्यादी खेळांचे सामान.**

**स्वदेशी मालाची निर्मिती :** गेल्या १५ वर्षांत स्वातंत्र्योत्तर कालात नायजेरिअन सरकारने देशी उद्योगधंद्यांचा विकास पंचवार्षिक योजनेद्वारे केला आहे. परदेशांतून येणारी आवक कमी करण्यासाठी देशातच तयार होणाऱ्या कच्च्या मालाचे तयार वस्तूंत रूपांतर करण्याचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. Made in Nigeria मालाच्या प्रदर्शनात निरनिराळ्या प्रकारचे कापड ( सुती, टेरिलिन, टेरीकॉट, टेरीवुल वगैरे ); रेडिओ, टेलेव्हिजन सेटस्, बिअर, बाटा कंपनीचे शूज, कोका-कोला, फांटा, स्प्राइट आदि सॉफ्ट ड्रिंक्स, सिमेंट, काचसामान, ॲल्युमिनिअम व एनॅमल भांडी, साबण, साबूपावडर, पेट्रो-केमिकल्स, रासायनिक खते, इंधनी गॅस, न्यूजप्रिंट, सिगारेटस्, प्लॅस्टिकच्या बादल्या, डबे, भांडी, साखर, काही पेटंट औषधे, पंखे, रेफ्रिजरेटर्स नजरेला पडतात.

**देशी हस्तकला :** ही कला बाल्यावस्थेत असली तरी पॉटरीज, एम्ब्रॉयडर्ड कापड, कपडे, काचेचे मणी, माळा, पितळ वा ब्रांझच्या वस्तू, पुतळे, मूर्ती, मुखवटे; मऊ कातड्याचे पुस्त, पिशव्या, हॅंडबॅग्ज, प्रवासी साहित्य या वस्तूंना त्यांच्या




आफ्रिकन वैशिष्ट्यामुळे युरोप-अमेरिकेत प्रचंड मागणी आहे.

राष्ट्रातील उद्योगधंदे व नागरी सेवा कार्यालयात नायजेरिअन प्रशिक्षित 'मनुष्यबळ' कमी पडत असल्याने परदेशी तंत्रज्ञांची आवक मोठ्या प्रमाणावर अजूनही आढळते. इंग्लिश, अमेरिकन, फ्रेंच, इटालिअन, रशिअन यांच्या जोडीला भारतीय, पाकिस्तानी, श्रीलंकी, अरब, जपानी, चिनी व फिलिपिनो तंत्रज्ञ दिसतात.

भारतातून आलेल्या वा परदेशांत शिकून नायजेरिआत नोकरीसाठी आलेल्या भारतीयात डॉक्टर्स, इंजिनिअर्स, आर्किटेक्टस्, पायलटस्, शिक्षक, अकाउंटंटस्, ऑडिटर्स, ट्रेन-ड्रायव्हर्स, औद्योगिक तंत्रज्ञ आपल्या वैशिष्ट्यांने व चोख काम करण्याच्या कसबाने लोकप्रिय झाले आहेत. कडूनाच्या नायजेरिअन मिलिटरी अॅकॅडमीची संस्थापना व रचना भारत सरकारच्या लष्करी तज्ज्ञांनी खडकवासल्याच्या नॅशनल डिफेन्स अॅकॅडमीसारखी केली असून तेथे लष्करी व इतर विषय शिकवायला अध्यापक व प्राचार्य भारतीय लष्करातून पाठवले जातात. त्यांची कामगिरी प्रशंसनीय आहे. युनायटेड नेशन्सच्या शाखांतून नियुक्त झालेले भारतीय तंत्रज्ञ व सल्लागार केंद्रीय व राज्यसरकारांना मार्गदर्शन करताना आढळतात. या सर्व भारतीयांत प्रामुख्याने केरळी व पंजाबी लोक आहेत. मराठी माणसे तुलनेने फार कमी दिसतात. आसाम, ओरिसा, नेपा येथील एकही माणूस मला आफ्रिकेत भेटला नाही.

आयात-निर्यातीच्या मोठ्या प्रमाणावरील व्यापारात गाजलेले भारतीय व्यापारी म्हणून के. चेलाराम; चेनराय; भोजसन; केवलराम या सिंधी संस्थांचा बोलबाला आहे. मारवाडी व गुजराथी अगदी हाताच्या बोटावर मोजण्याएवढे.

दिल्ली येथील नायजेरिअन हायकमिशनतर्फे भारतीय इंग्लिश भाषेच्या वृत्तपत्रात आवश्यक असलेल्या सेवांसाठी वारंवार जाहिराती येतात. केंद्र वा राज्यसरकारांचे इंटरव्ह्यू पॅनेल्स उमेदवारांच्या मुलाखती दिल्लीत घेतात. कोणत्याही नोकरीत पगार चांगले आहेत. करपात्र मिळकतीचा ५०% भाग मायदेशा पाठविण्याची परवानगी आहे. उमेदवारांनी चांगले सहजसुंदर इंग्लिश बोलावे अशी अपेक्षा असते. इंग्लिशवरील प्रभुत्वाने नायजेरिआत कोठल्याही क्षेत्रात चांगले वजन पडते. निवड झाल्यास मराठी उमेदवारांनी नायजेरिआत येण्यास काहीच प्रत्यवाय नाही. इमानेइतबारे नोकरी केल्यास त्यांचा भाग्योदय सहज होईल.

**अर्थव्यवस्था :—** सेंट्रल बँक ऑफ नायजेरिआचे (आपल्या रिझर्व्ह बँकेसारखे) देशातील आर्थिक उलाढालीवर नियंत्रण असते. पूर्वीचे पौंड, शिलिंग, पेन्स जाऊन ३ वर्षांपूर्वी त्या जागी दशमानपद्धतीतील नायरा व कोबो ही राष्ट्रीय चलने आली आहेत. १ नायरा= १०० कोबो. १०, ५, १ नायरा व ५० कोबोच्या नोटा आहेत. २५, १०, ५, १ व ½ कोबोची नाणी आहेत.

**1 NAIRA = Ind. Rs. 12·00 = 70 Pence (British)**

फार पूर्वीपासून नायजेरिआचा बँकिंग व व्यापारउदीम प्रामुख्याने परदेशी लोकांच्या ताब्यात होता. त्यात इंग्लिश, भारतीय, लेबानीज, सीरिअन ग्रीक व ज्यू यांच्या हातात आयात-निर्यात व्यापार डिस्ट्रिब्युटिंग व दलालीचा धंदा होता. नायजेरिअन सरकारने शांततेने व धीमेपणाने या व्यापाराचे क्रमशः राष्ट्रीयीकरण करण्याचे १९७२ मध्ये जाहीर केले. ज्या



ईदचा नामस्मरण-जप करण्याकरिता बसलेले धर्मगुरू

ारदेशियांची व्यापारी उलाढाल (वार्षिक) २ लाख नायरा-
ेक्षा कमी आहे. त्यांनी आपली दुकानदारी नायजेरिअन व्यापाऱ्याला विकून स्वदेशी परत जावे. त्यांचे पैसे सेंट्रल बँक ऑफ नायजेरिआने पौंडात वा डॉलर्समध्ये स्वदेशी नेऊ दिले. पुढील काही वर्षांत १० लाख नायरापर्यंत राष्ट्रीयीकरणाची मर्यादा नेली जाईल असा अंदाज आहे.

## नायजेरियातील वेतनाचे प्रमाण

| | | |
|---|---|---|
| पट्टेवाला, शेतमजूर वा अकुशल कामगार | दररोज | २ नायरा |
| ुतार, गवंडी, कुशल कामगार | ,, | ५ ,, |
| कारकून, टायपिस्ट, प्राथमिक शिक्षक दरमहा | ,, | ८० ,, |
| ुय्यम शाळाशिक्षक, डॉक्टर्स, इंजिनिअर्स | ,, | ३००-३५० ,, |
| र्जन, स्पेशालिस्टस्, विद्यापीठ-प्राध्यापक | ,, | ४००-५०० ,, |

रील सरकारी नोकरीत इतर भत्ते, पेन्शन, प्रॉ. फंड किंवा ग्रॅच्युइटी मिळते. अमेरिका, युरोप वा भारताच्या मानाने प्राप्तिकर फार कमी आहे. स्थानिक उद्योगधंद्यांना संरक्षण व प्रोत्साहन देण्यासाठी व्यापारी कंपन्यांच्या वार्षिक ६००० नफ्यावर कर नाही.

१९७५–७६ या वर्षाच्या बजेटाकडे पाहिल्यास खालील प्रमुख गोष्टी ध्यानात येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| ५३ | कोटी | नायरा | रेव्हेन्यू |
| १७·२ | ,, | ,, | रिकरंट खर्च |
| ६५ | ,, | ,, | सरप्लस |
| ४९ | ,, | ,, | कॅपिटल खर्च |
| १३ | ,, | ,, | १२ घटक राज्यांना अनुदाने |

नायजेरिआतील प्रमुख शहरे :—लेगॉस ही केंद्र राजधानी. त्याशिवाय १२ घटक राज्यांच्या राजधान्या लेगॉस, इबादान, इलोरीन, कडुना, सोकोतो, कानो, माईदुगुरी, जॉस, बेनीन,

एनुगू, पोर्ट हर्किर्ट व कलाबार.

विद्यापीठ-शहरे :—लेगॉस, इबादान, ईलेईफे, झारिआ, एनुगू, बेनीन.

आंतरराष्ट्रीय विमानतळ :—लेगॉम (दक्षिण भागासाठी) कानो (उत्तर भागासाठी)

सागरी बंदरगावे :—अपापा, वारी, पोर्ट हर्किर्ट.

ओनित्शा ही प. आफ्रिकेतील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. येथे दररोज कोट्यवधींचा नायरांची बाऊक व किरकोळ विक्री-खरेदी होते. येथे आयातीच्या सर्व वस्तू स्वस्त मिळतात हे वैशिष्ट्य आहे.

**राष्ट्रधर्म :** घटनेने हे निधर्मी राज्य आहे. सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य आहे. मुस्लिमांची संख्या अंदाजे ५०% आहे. ते मलिकी पंथाचे आहेत. निरनिराळ्या पंथांच्या ख्रिश्चनांची संख्या ४०% आहे. पेगन्स १०%. मात्र मुस्लिमांची संख्या वाढत आहे. सुशिक्षित नायजेरिअन्सना हिंदुधर्म, इतर पंथ, योगाभ्यास, योगी, साधुसंत इत्यादींविषयी कमालीची उत्सुकता आहे.

**राष्ट्रभाषा :** या सबंध देशातील जनता निरनिराळ्या टोळ्यांत (TRIBES) विभागली गेली आहे. विशिष्ट टोळीतील भाषा, परंपरा, रीतिरिवाज, आचारविचार यावर त्या टोळीवाल्यांची जबरदस्त निष्ठा असते. ती इतकी की दुसऱ्या टोळीचे लोक कमअस्सल, अडाणी, असंस्कृत असे मानण्यापर्यंत जाते. आपली टोळीच सर्वश्रेष्ठ ! प्रमुख टोळ्या हौसा, योरूबा व इबो या आहेत. त्यांच्या भाषा अप्रगत आहेत. त्यांना स्वतःची लिपी नाही म्हणून गेल्या शतकापासून त्या 'रोमन' लिपीत लिहिल्या जातात. राष्ट्रभाषेचा मान इंग्लिशला आहे. सरकारी कार्यालये, शाळा, कॉलेजेस, विद्यापीठ यामधील कारभार वा शिक्षण इंग्लिशमधूनच होते.

**लोकजीवन :** निरनिराळ्या प्रसंगांनी नायजेरिअन्स एकत्र येतात तेव्हा एकमेकांशी सहज मिसळतात. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव आढळत नाही. एकंदर लोकसंख्येच्या मानाने लक्षाधीश फार कमी. मध्यमवर्ग फारच थोडा. बहुजनसमाज गरीब आहे. एकंदरीत सर्व लोक खाऊनपिऊन सुखी आहेत. लोक कमालीचे खर्चिक आहेत. जीवनाचा दृष्टिकोण केवळ ऐहिक सुख (JOIE DE VIVRE) लुटण्याकडे असल्याने लोकांना चांगल्या कपड्यांचा शौक आहे; नव्या फॅशन्सप्रमाणे नटण्याभुरडण्याकडे कल आहे; नाटके व चित्रपट; खेळात बॉक्सिंग व फूटबॉलचे भयंकर वेड; पाश्चात्य व हिंदी फिल्मी संगीताची मोहिनी आफ्रिकन संगीताइतकीच आबालवृद्धांवर आहे. कानावर गाण्याची वा वाद्याची लकेर आली की लगोलग एखादे लहान मूलसुद्धा तालासुरात नाचायला लागते. संगीत, ऑर्केस्ट्रा मैफली व नाइट-क्लब येथे रसिकांची बरीच गर्दी असते. रोजगारी, पगार वा बोनस त्यांनी उडवलाच असे समजावे. 'उद्याची' फिकीर त्यांना केव्हाही नसते.

**हे लोक स्वतःच्या स्त्रियांना मानाने वागवत नाहीत. स्त्रीदाक्षिण्य वा बायकोला बरोबरीच्या नात्याने वागवावयाचे या कल्पना संपूर्ण परकीय असल्याचा त्यांचा दावा आहे.** चांगल्या घराण्यातील मुलींच्या लग्नाच्या वेळी वधूपिते अवास्तव हुंडा व भेटवस्तू मागतात, त्यामुळे गरीब होतकरू तरुणांना लग्न परवडत नाही. त्यामुळे 'वेश्याव्यवसाय' फार तेजीत चालतो. त्याचा परिणाम म्हणून गुप्तरोगांचा प्रादुर्भाव समाजातील सर्व थरांत झालेला दिसतो.

आपल्याकडील तरुणींची छेड काढणारे सख्याहरी वा गल्लीगोपाळ तेथे कधी आढळत नाहीत. कारण वयात आलेल्या सर्वांची कामतृप्ती झालेली असते. लग्न ही बाब कोणी गंभीरपणे घेत नसल्याने, संसारात पटले नाही की क्षणार्धात काडीमोड व फटाफट घटस्फोट घेतले वा दिले जातात. पुन्हा दुसरी बायको वा दुसरा नवरा ! त्यात बहुपत्नीकत्वाचा रिवाज ! थोड्याफार फरकाने हा समाज 'सखाराम बाईंडर' छाप वाटतो हे नाटक तिथल्या रंगभूमीवर आले तर ते पाहायला ढुंकून कोणीसुद्धा जाणार नाही.

**नायजेरिअन्सना भारताविषयी काय वाटते ? :** गेल्या ५०० वर्षांपासून अरब प्रवाशांच्यातर्फे 'हिंदू' संस्कृती, लोककथा, दंतकथा विशेषतः हौसा लोकांना माहीत आहेत. दुसऱ्या महायुद्धात बर्मा-फ्रंटवर लढायला ब्रिटिशांनी नायजेरिअन लढाऊ सैनिक आणले होते. ते माजी सैनिक आम्हाला मोठ्या अभिमानाने सांगतात, 'आम्ही इंडिआ-रिटर्न आहोत !' गेली १५ वर्षे सर्व देशभर चित्रपटगृहात दररोज रात्री एक हिंदी फिल्म दाखविण्याच्या प्रघाताने सर्वसामान्य जनतेला थोडेबहुत हिंदी कळू लागले आहे. **त्यातील बहुसंख्य नागरिकांचा देवआनंद, शम्मीकपूर, धर्मेन्द्र, राजेश खन्ना, अमिताभ यांच्याशी पत्रव्यवहार आहे. आशा पारेख, हेमामालिनी, मुमताज, हेलन, शर्मिला टागोर यांचे रंगीत** फोटो तरुणांच्या पाकिटात (व कदाचित हृदयाच्या खोल कप्प्यातही !) सापडतील. आम्हाला भारतीय मुली आवडतात, त्यांच्याशी आम्हाला लग्न करायचे आहे, त्यांचे पत्ते आम्हाला द्या अशी आग्रहवजा विनंती 'युवाजन' नेहमी करतात.

विचारी, सुशिक्षित नायजेरिअन्सना या दे-मार, जादूवाल्या, हिंदी फिल्मस् अजिबात आवडत नाहीत. कित्येकांनी महात्मा

गांधी, जवाहरलाल नेहरू, डॉ. राधाकृष्णन् व कविवर्य रवींद्रनाथ टागोर वाचून आत्मसात केले आहेत. भारताने गेल्या वर्षी केलेल्या अणुस्फोटप्रयोगाचे व या वर्षीच्या 'आर्य-भट्टाचे' वृत्त वाचून त्यांनी भारताचे कौतुक केले.

**नायजेरिआपुढील समस्या :** १. जनतेमधील प्रांतीयता, ट्रायबॉलिझम घालवून राष्ट्राची एकात्मता कशी टिकवायची ? २. तरुणवर्गातील बेशिस्त, आळस, गांजा, विषारी औषधांचो चटक निर्मूलन कशी करता येईल ? ३. सामान्य जनतेला भेडसावणारे दारिद्र्य, रोगराई, निरक्षरता यांना कसे नष्ट करता येईल ?

**तृतीय पंचवार्षिक १३ कलमी योजना : १९७५ ते १९८०**

वरील समस्या समाधानकारकपणे सोडविण्यासाठी नायजेरिअन सरकार सिद्ध झाले आहे. सुदैवाने पेट्रोलनिर्यातीपासून कोटयवधी नायरांचे परदेशी चलन उपलब्ध झाले आहे. त्याचा भांडवलासारखा उपयोग या विकास-योजना सफल करण्याकडे केला जाईल.

**१. शिक्षण :** २५ कोटी नायरा खर्च करून शिक्षणाचा प्रसार सर्वत्र करावयाचा आहे. सर्व देशभर प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. त्यायोगे साक्षरता तर वाढेलच व पुढील शिक्षणासाठी विद्यार्थी व तदनंतर आवश्यक ते सर्व मनुष्यबळ स्वदेशीच मिळेल. ८०० नवीन विद्यालये, प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेजेस, चार नवी विद्यापीठे प्रस्थापित करावयाची आहेत. भविष्यकालात विद्यालयीन शिक्षण मोफत व सक्तीचे राहील व विद्यापीठीय शिक्षण मोफत मिळेल.

**२. आरोग्य :** ७० कोटी नायरा खर्च अपेक्षित आहे. १५०० फिरते दवाखाने खेडेगावांना वैद्यकीय मदत पोहोचवतील. ५००० नवीन हॉस्पिटले; १२ प्रशिक्षण देणारी हॉस्पिटल्स् आणि ११० मोठी जनरल हॉस्पिटल्स् यांचे जाळे देशभर विणता येईल.

**३. दळणवळण :** ७० कोटी नायरा. ३०,००० किलोमीटर लांबीचे नवे रस्ते; प्रचलित रेल्वे, शिपिंग लाइन, नायजेरिआ एअरवेजची कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्न होतील.

**४. शेतकी व ग्रामोद्धारयोजना :** २२ कोटी नायरा. लागवडीला योग्य त्या सर्व जमिनीची मशागत ट्रॅक्टर व इतर यंत्रांचा वापर करून शेतीमालाचे सर्व क्षेत्रात उत्पन्न वाढवावयाचे आहे. त्याला अनुसरून नद्यांवर धरणे, पाटबंधारे, कालवे काढून जलसिंचनाच्या योजना वाढवावयाच्या आहेत. प्रत्येक राज्यात प्रायोगिक गवळीवाडे काढून पशुसंपत्तीचा विकास साधावयाचा आहे. रासायनिक खते, बीबियाणे व कीटकनाशके स्वस्त दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावयाची आहेत.

**५. औद्योगिक विकासाला** २३ कोटी नायरा. देशांतर्गत कारखाने वाढवून उपयुक्त माल स्वदेशातच बनवायचा निर्धार आहे.

**६. नगर-रचना :** १८ कोटी नायरा. शहरांची सर्वांगीण सुधारणा.

**७. वाहतूकव्यवस्था :** ७३ कोटी नायरा.

**८. डाक व टेलेफोन्स :** १३ कोटी नायरा.

**९. माहिती, नभोवाणी व चित्रवाणी :** ३८ कोटी नायरा.

**१०. कामगारउन्नतिकेंद्रे :** ४ कोटी नायरा.

**११. सामाजिक उन्नती व ऑलिंपिक सामने :** १४ कोटी नायरा.

**१२. सहकार सोसायट्या व लोककल्याण :** १९ कोटी नायरा.

**१३. जल-विकास-योजना :** ६१ कोटी नायरा.

भारतीय उद्योगपतींना वरील १३ कलमी योजनेत प्रत्यक्षपणे भाग घेता येईल. ३०० कोटींच्या वरील अर्थसंकल्पाचा फायदा आपण अंशतः उठविला पाहिजे दिल्लीच्या नायजेरिअन हायकमिशन वा लेगॉसच्या भारतीय दूतावासाशी संपर्क साधून आपल्याला योग्य त्या क्षेत्रात माहिती मिळवता येईल. प्रत्यक्ष जाऊन वाटाघाटी, पहाणी व योजना केल्यास जास्त फायदेशीर होईल.

??? 

# प्रश्नमंजूषा

डॉ. शरद बोकील

पेट्रोडॉलरचे परिणाम कोणते ह्या प्रश्नाचे संक्षिप्त उत्तर देऊन वाचकांची जिज्ञासा पुरी करता आली नसती म्हणून ह्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर डॉ. बोकील ह्यांनी दिले आहे.

## पेट्रोडॉलर्सचे संभाव्य परिणाम कोणते ?

जूनच्या अंकांत पेट्रोडॉलर्स म्हणजे काय ते आपण पाहिले. पेट्रोल व इतर द्रवरूपी इंधने ही मुख्यतः मध्यपूर्व व पश्चिम आशिया या भागातून जगभर निर्यात होतात. आफ्रिकेमधून लिबिया व लॅटिन अमेरिकेतून व्हेनिझुवेला ही पेट्रोल निर्यात करणारी प्रमुख राष्ट्रे आहेत. पेट्रोलच्या पुरवठ्यावर दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतरही म्हणजे ( १९६० पर्यंत ) सात मोठ्या अमेरिकन व ब्रिटिश कंपन्यांचे स्वामित्व होते. पेट्रोल-निर्मिती करणारे देश स्वतंत्र झाल्यावर ते स्वतंत्र धोरण आखू लागले आणि त्या त्या देशांच्या कंपन्या अस्तित्वात आल्यावर व काही ठिकाणी राष्ट्रीय सरकारांच्या कणखर धोरणामुळे या कंपन्यांची पकड ढिली होऊ लागली. रशियाच्या पाठिंब्यामुळे ब्रिटन / अमेरिका या धोरणाविरुद्ध आरडाओरड करण्यापलीकडे कोणतेही पर्यायी उपाय योजू शकले नाहीत.

या नवीन धोरणाच्या प्रक्रियेचा परिणाम असा झाला की तेल-उत्पादक राष्ट्रांना आपल्या शक्तीची जाणीव झाली. त्यांची अस्मिता जागी झाली. लवकरच त्यांच्या लक्षात आले की पाश्चिमात्य राष्ट्रे वर्षानुवर्षे आपले तेल ( ज्याला पाश्चिमात्य द्रवरूपी काळे सोने म्हणतात ) ते अतिशय स्वस्त दराने घेत आहेत. आपल्या वस्तू मात्र वाटेल त्या चढ्या दराने आपल्याला विकत आहेत. तसेच पाश्चिमात्यांची भरभराट ही स्वस्त तेलावर आधारलेली आहे. म्हणून त्या भरभराटीतील आपला हिस्सा आपण तेलकिंमत वाढवून हस्तगत केला पाहिजे हा विचार पुढे आला. त्यासाठी उत्पादक राष्ट्रांनी समान धोरण आखण्याचे ठरवले. त्यामुळे त्यांची पूर्ण मक्तेदारी झाली व त्यानंतर खंड ( Royalty ) धरून येणारी किंमत ( Posted Price ) ती वाढवण्याचे ठरवले. त्यानुसार १९७३ मध्ये एकदम २·५० डॉलरवरून किंमत १० डॉलरपर्यंत वाढविण्यात आली. पेट्रोलची अल्पकालीन मागणी अलवचिक असल्याने या राष्ट्रांकडे पेट्रोल व पेट्रोलियम पदार्थ यांच्या प्रीत्यर्थ कोट्यवधी डॉलर्सचा जगाच्या कानाकोपऱ्यातून ओघ सुरू झाला. १९७४–७५ मध्ये सुमारे ५० बिलियन म्हणजे ५००० कोटी डॉलर्स यामुळे या देशांच्या नावे जमा झाले आहेत. एक अंदाज असा आहे की, १९८० पर्यंत हीच किंमत राहिली तर ६०० बिलीन डॉलर्स जमा होतील. त्यातील ३/४ भाग हा पाश्चिमात्य राष्ट्रांकडून आलेला असेल.

अशा रीतीने पेट्रोलउत्पादक राष्ट्रांनी पाश्चिमात्यांच्या उत्पन्न व संपत्तीत वाटा मिळवण्याचा प्रभावी उपाय शोधून काढला आहे. हे जे डॉलर्स जमा होत आहेत त्याला पेट्रोडॉलर्स म्हणतात. डॉलर्स हे अजूनही आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाणीचे माध्यम असल्याने व देवाण-घेवाण ही पेट्रोलच्या संदर्भात होत असल्याने त्याला काही वृत्तपत्रांनी पेट्रोडॉलर्स हे नामाभिधान बहाल केले आहे. हे सर्व डॉलर्स जगाच्या ख्यातनाम बँकांत या उत्पादक राष्ट्रांच्या नावे जमा झाले आहेत व होत आहेत.

या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाणीतील समतोल बिघडू लागला आहे. विशेषतः जपान व पश्चिम युरोपीय राष्ट्रे यांचे पेट्रोवरचे अवलंबन जास्त असल्याने त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील समतोल त्यांच्या विरुद्ध जाऊ लागला आहे. त्याचा त्यांच्या विकासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यांचे चलनदर खाली जाऊ लागले आहेत. त्यामानाने डॉलर सुधारू लागला आहे. ही गोष्ट फार प्रकर्षाने झाली तर जपान व पश्चिम युरोपमधून भांडवलाची अपेक्षित ( Speculative ) निर्यात चालू होईल व त्यामुळे गुंतवणूक कुंठित होऊन मंदीच्या मार्गाने अर्थव्यवस्था मार्गक्रमण करू लागेल. हा धोका जगाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मारक ठरेल. आंतरराष्ट्रीय व्यव-

हारांतून या गोष्टी दुसऱ्या देशामध्ये पसरू लागतील व जागतिक मंदी निर्माण होण्याचा संभव निर्माण होईल.

हा धोका लक्षात घेऊन पाश्चिमात्य राष्ट्रे पेट्रोलबद्दलची देणी कर्जाच्या किंवा निर्यातीच्या रूपाने आपल्याकडे परत यावीत यासाठी एकमेकांशी अहमहमिका करीत आहेत; पण या स्पर्धेमध्ये अमेरिका यशस्वी होण्याची शक्यता आहे. कारण गुंतवणूक करणाऱ्या राष्ट्राच्या अग्रक्रमाप्रमाणे योग्य ते मार्ग उपलब्ध करून देणे यामध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्क मार्केट व तेथील ख्यातनाम वित्तसंस्था आघाडीवर आहेत. तसे झाल्यास प. युरोप व जपान यांना अमेरिकेकडूनच कर्जे घ्यावी लागतील. या सर्व व्यवहारात अमेरिकेची आर्थिक पकड पक्की होईल व डॉलर इतर चलनांच्या मानाने स्थिर राहील.

१९७१ नंतर प्रमुख चलन-दर स्थिर नसून तरते आहेत. त्यामुळे जे चलन स्थिर व ज्याचा दर वाढण्याचा संभव अधिक त्या माध्यमात पेट्रोलराष्ट्रे आपला पैसा ठेवतील. अमेरिकन डॉलर त्या दृष्टीने खास कामगिरी बजावू शकेल. शिवाय हे पेट्रोडॉलर्स अमेरिकेत गेले तर अमेरिकन बाजारपेठ मोठी असल्याने चलनवृद्धीचा धोका त्या प्रमाणात कमी राहील. उलटपक्षी जर्मनी व जपानमध्ये जर हे डॉलर्स येऊ लागले तर चलनवृद्धीचा धोका तिथे तुलनेने अर्थव्यवस्था लहान असल्याने जास्त आहे. चलनदर तरते असल्याने १९७० च्या आधी नाणेबाजारात जी स्थिर दरामुळे अस्थिरता निर्माण होत असे व त्यातून Confidence crises निर्माण होत असत ते निर्माण होणार नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्था फारशा तणावाखाली येणार नाही.

पेट्रोलियम राष्ट्रे हा डॉलररूपी पैसा जेवढा बाहेर गुंतवतील तेवढे त्यांचे भविष्यकालीन उत्पन्न वाढेल. जर त्यांनी चैन व उपभोग यावर खर्च केला तर ही ऐतिहासिक संधी गमावून बसतील. मुख्य म्हणजे हा पैसा हा त्या देशातील सरकारे व शेख यांच्या मालकीचा असल्याने त्यापासून त्या देशात चलनवृद्धीचा धोका कमी आहे. जर तो जनता किंवा पेढ्या यांच्या मालकीचा असता तर यांच्या नावे त्या देशाच्या चलनात डॉलर्सच्या बदल्यात सरकारला पैसे देणे भाग पडले असते. हा धोका मोठ्या प्रमाणांत इथे निर्माण होत नाही.

♣


## आमची प्रकाशने

एस्. एस्. सी. नंतर
कॉलेज शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
सुमारे २०० अभ्यासक्रम व व्यवसाय ह्यांची
माहिती देणारी

**व्यवसायमार्गदर्शनपुस्तिका भाग १**

प्रा. कमलाकर परचुरे
किंमत २ रुपये

एस्. एस्. सी. पर्यंत
शिक्षण न घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
सुमारे १०० अभ्यासक्रम व व्यवसाय ह्यांची
माहिती देणारी

**व्यवसायमार्गदर्शनपुस्तिका भाग २**

प्रा. कमलाकर परचुरे
किंमत १ रुपया फक्त

हायरसेकंडरी, पदवीपूर्व अर्थशास्त्राच्या
विद्यार्थ्यांकरता उपयुक्त अभ्यासपुस्तक

**मिनि अर्थशास्त्र**

प्रा. कमलाकर परचुरे

नव्या आवृत्तीकरता मागणी नोंदवावी.
वरील पुस्तकांकरता खालील ठिकाणी
संपर्क साधा.

सत्यशिवसुंदर प्रकाशन
९०६ शिवाजीनगर, पुणे ४.



# तरुणांचे मनोगत


# २० कलमी आर्थिक कार्यक्रम

**श्यामकांत देशपांडे**

---

हा लेख पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातील टी. वाय्., बी. कॉम्. चा विद्यार्थी श्यामकांत देशपांडे ह्यांनी लिहिला आहे. श्री. देशपांडे मूळचा जळगावचा. वडील चार्टर्ड अकौंटंट. उच्च-शिक्षणासाठी तो पुण्यात आला आहे. कॉलेजच्या निबंधस्पर्धांत बक्षिसे. एक अभ्यासू विद्यार्थी म्हणून कॉलेजमध्ये सर्वांच्या परिचयाचा. आठवडाभर दररोज चार तास बसून त्याने हा लेख पुरा केला आहे. त्याकरता खूप वाचले. माहिती मिळवली. अत्यंत महत्त्वाच्या विषयावरचा त्याचा हा लेख विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल. तसेच काहींना असे लेखन आपणही करावे अशी स्फूर्ती देईल.

---



श्यामकांत देशपांडे

दि. २६ जून रोजी आणीबाणी जाहीर केल्यानंतर सहा दिवसांतच पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी २१ कलमी आर्थिक कार्यक्रमाची घोषणा केली. हा नवीन आर्थिक कार्यक्रम म्हणजे **'आर्थिक गतिमान व न्यायावर आधारलेला समाज'** निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे.

या आर्थिक कार्यक्रमात कमाल जमीनधारणा कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी, ग्रामीण कर्जबाजारीपणा नष्ट करणे, नागरी जमिनीचे सामाजीकरण करणे आणि अत्याव-श्यक वस्तूंचे सुविहीत वितरण करणे, या मुद्द्यांबरोबरच परवानापद्धती सुलभ करणे, कर्ज देण्याचे निर्बंध चालू ठेवणे व चलनवाढीस आळा घालणाऱ्या कार्यक्रमाचाही समावेश आहे. शेतमजूर, कामगार आणि गिरिजन यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पावले उचलण्यासंबंधीचाही कार्यक्रम त्यांनी जाहीर केला. या नव्या कार्यक्रमानुसार नागरी मालमत्तेवर **मर्यादा घालण्यात आली आहे; आयकरपात्र रकमेची किमान मर्यादा ६ हजार रुपये वार्षिक उत्पन्नावरून ८ हजारापर्यंत वाढविण्यात आली आहे आणि ग्रामीण कर्जवसुलीसाठी तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.** या आर्थिक कार्यक्रमा-तील काही बाबींची येत्या सहा महिन्यांत ते एक वर्षात अंमलबजावणी होणार असल्याने जनतेत आत्मविश्वास निर्माण होईल आणि या राष्ट्रीय आत्मविश्वासामुळे दीर्घकालीन धोरणे मार्गी लागण्यास मदत होईल.

सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच गरीब मध्यम-वर्ग आणि व्यापार–उद्योगक्षेत्रांतील लोक यांच्या उन्नतीची योजना असलेल्या या आर्थिक कार्यक्रमाचा गोषवारा खालीलप्रमाणे–

## शेतकरी, शेतमजूर वगैरे

### ग्रामीण कर्जबाजारीपणा

एकवीस कलमी कार्यक्रमात ग्रामीण कर्जबाजारीपणा नष्ट करण्यासाठी, भूमिहीन, शेतमजूर, छोटे शेतकरी व कारागीर यांच्याकडील कर्जवसुलीच्या मुदतवाढीला कायदेशीर मान्यता

देण्यात येणार आहे. दोन हेक्टर म्हणजे सुमारे ५ एकरांपेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी व ग्रामीण भागातील कारागीर यांना कर्ज व पतपुरवठा व्हावा यासाठी पर्यायी नव्या यंत्रणा उभारण्याचा प्रयत्न करीत असतानाच या लोकांकडून कर्ज-वसुलीसाठी कज्जे-खटले करण्याविरुद्ध काही निर्बंध घातले जाणार आहेत. अतिशय गरीब शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याचीही योजना आहे. असे पाऊल कधीच उचलले गेले नव्हते. हे निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र सरकारी मालकीच्या बँका व सहकारी बँका यांच्याकडून घेतलेल्या कर्जाला यातून वगळण्यात आले आहे. १९७१-७२ च्या कर्ज आणि गुंतवणूक पहाणीच्या (All-India Debt and Investment Survey) अहवालानुसार उत्तरप्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामीळनाडू या राज्यांत ग्रामीण कर्ज-बाजारीपणा बराच वाढलेला आहे. काही भागात तर शेत-मजुरांच्या कुटुंबांपैकी ६० टक्के कुटुंबे कमालीची कर्जबाजारी आहेत. या अहवालानुसार उत्तरप्रदेशात ४७५ कोटी रु. तर आंध्रप्रदेशात ४४४ कोटी रु. चा कर्जबाजारीपणा आहे. अनेकांकडील कर्ज हे मुळातच बेकायदेशीररीत्या वाढलेले आहे.

## किमान वेतनाची तरतूद

ग्रामीण भागातील शेतमजुरांना किमान-वेतन मिळवून देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी कसोशीने केली जाईल आणि आवश्यक वाटल्यास या किमान वेतनाचा दर वाढवून देण्यात येईल. किमान वेतन कायदे लागू करूनही त्यांची अंमलबजावणी यापूर्वी रेंगाळली म्हणून बंगाल आणि बिहार-सारख्या भागात कोठे धड रुपयासुद्धा रोजमजुरी मिळत नाही असे १९७१ च्या सरकारी पहाणीत आढळले होते. आता किमानवेतनविषयक कायद्याची फेरतपासणी केली जाईल आणि अंमलबजावणीची तरतूद करण्यात येईल. देशात कोठे वेठबिगारी पद्धती, सक्तीने कामाला जुंपण्याची पद्धती अस्तित्वात असल्यास ती रद्द केली जाईल व ते योग्य आहे. महाराष्ट्रात आजही सालदार-पद्धती काही ठिकाणी आहे. त्याचप्रमाणे जेथे आदिवासी जनता विशेष आहे, तेथे या वेठ-बिगारीची विविध रूपे दिसतात.

## जमीनसुधारणा आणि भूमिहीनांना जमीन

ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने जमिनीच्या कमालधारणेच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे आणि जादा जमीन आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि भूमिहीन शेतकऱ्यांना वाटण्याचे काम अधिक जोमाने हाती घेण्यात येईल. ह्या सुधारणा तसेच जमिनीचे कागदपत्र (लँड रेकॉर्डस्) तयार करताना आदिवासींच्या जमिनी हिरावून घेतल्या जाणार नाहीत याची काळजी घेण्याची सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे. ग्रामीण भागातील भूमिहीनांना घरांसाठी जागा मिळवून देण्याचा कार्यक्रम अधिक मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येईल; तसेच मालकाच्या जागेवर काही काळ घरे बांधून रहात असलेल्या भूमिहीन शेतमजुरांना त्या जागेचे मालकी हक्क मिळवून देण्याच्या उद्देशाने कायदे केले जातील. १९७२ च्या मुख्य मंत्र्यांच्या परिषदेनंतर अनेक राज्यांनी जमीन-सुधारणा कायद्यात बदल केले आहेत; परंतु त्यांची कार्यवाही मात्र मंदगतीने होत आहे. राज्यसरकाराच्या अंदाजानुसार एकूण १५ लाख हेक्टर जमीन ही कमालधारणेपेक्षा अधिक (Surplus) आहे; काही राज्यांचे आकडे पुढीलप्रमाणे— आंध्रप्रदेश ४ लाख हेक्टर्स, आसाम १ लाख ७१ हजार हेक्टर्स, कर्नाटक १ लाख ६० हजार हेक्टर्स आणि महाराष्ट्र १ लाख ४८ हजार हेक्टर्स. या उपाययोजनेमुळे एकूण ५ कोटी भूमि-हीन शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

## हातमाग उद्योग

हातमाग हा देशातील एक मोठा कुटिरोद्योग आहे. यासाठी हातमागउद्योगाच्या वाढीवर विशेष भर देण्यात आला आहे. या क्षेत्रातील कारागिरांची मोठी संख्या लक्षात घेऊन त्यांना आवश्यक माल वाजवी भावात मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येऊन हातमागक्षेत्रासाठी राखीव कापडाच्या धोरणात योग्य तो फेरबदल करण्याचा विचार केला जाईल. त्वरित अंमल-बजावणीसाठी हातमागविभागासाठी स्वतंत्र आयुक्त नियुक्त केले जाईल. तसेच शिवरामन् कमिटीच्या अहवालातील सर्व तरतुदींचा स्वीकार करण्यात आला आहे. नियंत्रित दराच्या कापडाच्या उत्पादन आणि वाटपव्यवस्थेमध्ये हातमाग-विभागाच्या विकासामुळे बरीच मदत होईल.

## कमी उत्पन्नाचा मध्यम गट आयकरात सूट

२१ कलमी कार्यक्रमानुसार, मध्यमवर्गाला आयकरात सूट देण्यात आली असून आयकरपात्र रकमेची किमान मर्यादा ६००० रु. पासून ८००० रु. पर्यंत वाढवून देण्यात आली आहे. म्हणजे जवळजवळ साडेसहाशे रुपयापर्यंत मासिक प्राप्ती असलेल्या एकूण ७ लाख करदात्यांना सूट मिळत आहे. या योजनेमुळे शहरातील मध्यमवर्ग व विशेषतः औद्योगिक कामगार यांना फायदा होणार आहे. उदाहरणार्थ मुंबईतील 'प्रीमियर

'ऑटोमोबाइल' या कारखान्यातील ९००० कामगारांपैकी ८००० कामगार आयकरदाते आहेत. आता आयकरपात्रतेची मर्यादा ८००० रुपयांपर्यंत वाढविल्यामुळे या कामगारांपैकी एकालाही आयकर द्यावा लागणार नाही! नियोजनकाळात मध्यमवर्ग भाववाढीने बराच भरडला गेला होता—ह्या योजनेमुळे त्याला बराच दिलासा मिळणार आहे. ८००० रु. ची मर्यादाही थोडी अधिक वाढवून दिली जावी अशी अपेक्षा आहे. सध्या या सुधारणेमुळे एका पूर्ण वर्षासाठी ४० कोटी रु. आणि चालू वर्षी २४ कोटी रुपयांचा भूदंड बसणार आहे.

## नागरी मालमत्तेचे सामाजीकरण

शहरातील (मोकळ्या जमिनी व बांधकाम झालेल्या) जमिनीच्या मालकीवर कमालमर्यादा घालण्यात येणार असून नव्या निवासस्थानांच्या क्षेत्रफळावरही मर्यादा येणार आहे. तसेच जादा (Surplus) जमीन ताब्यात घेऊन त्यांचे सामाजीकरण करण्यासाठी कायदे करण्यात येतील. अशा मिळालेल्या जमिनीचा उपयोग कारखाने, क्रीडांगणे, शाळा, हॉस्पिटले इ. सामाजिक उपयोग होऊ शकेल. बेकायदेशीर बांधकामाचे योग्य मूल्यमापन (Valuation) करून त्यावरील करचुकवेपणास आळा घालण्यासाठी खास पथकांची उभारणी करण्यात येणार आहे. ज्या मालकांनी आपल्या जमिनींच्या किंमती कमी दाखविल्या आहेत, त्यांच्याविरुद्ध त्वरित खटले भरून त्यांना कडक शिक्षा देण्यात येईल.

## आर्थिक गुन्हेगारांविरुद्ध कडक उपाय

करचुकव्यांविरुद्ध आयकरखात्याने पुन्हा मोहीम उघडली असून इमारतींची किंमत कमी दाखविण्यात आलेल्या तीनशेहून अधिक मालमत्तांच्या बाबतीत कारवाईस सुरुवात केली आहे. गतवर्षी या खात्याने ७७९ प्रकरणांची छाननी करून त्यापैकी ३९२ प्रकरणी कारवाईस आरंभ केला. तसेच शहरी मालमत्तेचे (मोकळ्या जमिनी व बांधकाम झालेल्या) मूल्यांकन करण्यासाठी आणि करचुकवेगिरी हुडकून काढण्यासाठी केंद्र सरकारने मुंबई, दिल्ली, कलकत्ता आणि मद्रासमध्ये खास पथके उभारली आहेत. आतापर्यंत देशातील एकूण १ कोटी ७ लाख रुपये किंमतीच्या १३७ मालमत्ता जप्त करण्यात आल्या. प्रत्येक मालमत्तेची विक्री होताना काही बेहिशेबी पैशाची देवाणघेवाण होते त्यामुळे मालमत्तेची खरी किंमत कागदोपत्री नसल्याने बाजारातील मूल्य ठरविताना ती पायाभूत धरता येत नाही हीच मुख्य अडचण आयकरखात्यास येते. तसेच, जमिनी व इमारती यांच्या हस्तांतराविषयीची कागदपत्रे नोंदली जातात व या गोष्टी प्रस्थापित म्हणून खात्याला सादर केल्या जातात. यामुळे मालमत्ता ताब्यात घेण्याच्या कामी अनेक कायदेशीर अडचणी उद्भवतात. यासाठी कडक कारवाई करता यावी म्हणून कायद्यात आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येणार आहे. शहरी भागातील जमिनींचो सामाजिक मालकी करण्याच्या पंतप्रधानांच्या घोषणेचा मुंबई, दिल्ली, कलकत्ता आणि इतर मोठी शहरे यातील जमिनींच्या किंमतीवर फार चांगला परिणाम झाला असून त्या खाली आल्या आहेत. आर्थिक गुन्हेगारीविरुद्ध करण्यात आलेली महत्त्वाची कृती म्हणजे सर्व ज्ञात स्मगलर्सना पुन्हा पकडण्यात आले असून त्यांना दूर ठेवण्यात आले आहे. स्मगलरांची सर्व मालमत्ता जप्त करण्याची तरतूद असलेला नवा कायदा तयार होत आहे. तसेच परकीय चलनसंबंधात आणि स्मगलिंगविरोधी १९७४ च्या कायद्यातील तरतुदींमुळे चोरट्या आयात व्यापारात मोठ्या प्रमाणावर गुंतलेला पैसा बाहेर येण्यास मदत होईल.

गेल्या काही महिन्यांत जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती सतत उतरत असून त्या पुन: चढू नयेत म्हणून आपला प्रयत्न राहील असे पंतप्रधानांनी सांगितले. काळ्याबाजारास वाव मिळू नये यासाठी कडक उपाययोजना करण्यात येत आहे. नफेखोरी, साठेबाजी तसेच काळी कृत्ये करून आणि कायद्यातील पळवाटांचा लाभ उठवून सहीसलामत सुटणारांसाठी ३० जून रोजी अंतर्गत सुरक्षा कायद्यात (Maintenance of Internal Security Act) दुरुस्ती करण्यात आली आहे या दुरुस्तीनुसार कोणतेही कारण न दाखविता कोणालाही एक वर्षभर स्थानबद्ध करून ठेवण्याचे अधिकार सरकारने घेतले असून त्याबाबत न्यायालयाकडे दादही मागता येणार नाही. जीवनावश्यक वस्तूंचा साठा आणि त्यांच्या किंमती दर्शविणारे फलक लावण्यात व्यापाऱ्यांना भाग पाडण्यात आले आहे. विविध आर्थिक अपराध्यांविरुद्ध खंबीर उपायही योजण्यात आल्यामुळे चलनवाढीचा वेग शून्यावर आला आहे.

## जनता कापडाचे वाटप आणि नियंत्रण

गरीबवर्गातील जनतेला नियंत्रित भावाचे कापड व इतर जीवनावश्यक वस्तू अधिक प्रमाणात तसेच अधिक चांगल्या दर्जाच्या उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने धोरणविषयक सुधारणा करण्यात येत असून ग्रामीण व शहरी भागातून त्याच्या वाटपाची व्यवस्था करण्यात येईल. नियंत्रित कापडाच्या उत्पादनात सध्या धोतरजोड्या, साड्या, लॉंगक्लॉथ, शर्टिंग, ड्रिल तसेच पॉपलीन, कोटिंग या प्रकारांचा समावेश आहे. गरीब-

वर्गाकडून धोतरजोड्या आणि साड्यांना फार मोठी मागणी असल्याने या दोन वस्त्रप्रकारांचे उत्पादन या वर्षी १६ कोटी चौरस मीटर्सपर्यंत वाढविण्यात आले आहे. १९७४ साली हे उत्पादन १० कोटी चौरस मीटर्सइतके होते. ५ ऑगस्ट रोजी 'नियंत्रित कापडाचे उत्पादन आणि वितरण' या विषयावर आकाशवाणीवर बोलताना केन्द्रीय व्यापारमंत्री श्री. डी. पी.

## दृष्टिक्षेपात एकवीस कलमी आर्थिक कार्यक्रम

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी दि. १ जुलै रोजी आकाशवाणीवरील भाषणात जाहीर केलेला कार्यक्रम सूत्ररूपाने पुढे दिला आहे—

१. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती खाली आणण्यासाठी उपाययोजना करणे, या वस्तूंचे उत्पादन, वसुली आणि वितरण सुव्यवस्थित करण्यासाठी पावले उचलणे, सरकारी खर्चात बरीच काटकसर करणे.

२. कमाल जमीनधारणा कायद्याचा आढावा घेऊन त्याची त्वरित अंमलबजावणी आणि कमाल धारणेपेक्षा अधिक जमिनीचे त्वरित वाटप. शेतजमीनविषयक अधिकृत कागदपत्रे ( लँड रेकॉर्डस् ) पूर्ण करणे.

३. आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटकांसाठी आणि भूमिहीन शेतमजुरांच्या निवासांसाठी त्वरित तरतूद करणे.

४. वेठबिगारपद्धती ( सक्तीने कामाला जुंपणे ) देशात कोठे अस्तित्वात असल्यास ती बेकायदा ठरविणे.

५. ग्रामीण कर्जबाजारीपणा नष्ट करणे. भूमिहीन शेतमजूर, छोटे शेतकरी आणि ग्रामीण भागातील कारागीर यांच्यावरील कर्ज–वसुलीला मुदतवाढ देणे.

६. शेतमजुरांच्या किमान–वेतन कायद्याची फेरतपासणी करणे आणि शक्य झाल्यास किमानवेतनाचे दर वाढवून देणे.

७. पन्नास लाख हेक्टरहून अधिक जमीन पाणी–पुरवठ्याखाली आणणे. भू–गर्भातील पाण्याचा शोध घेण्यासाठी राष्ट्रीय कार्यक्रम तयार करणे.

८. वीज–उत्पादन कार्यक्रमाची गती वाढविणे. भावी काळात प्रचंड औष्णिक केंद्रे उभारणीचे कार्य केंद्र सरकारच्या अधिकाराखाली हाती घेणे.

९. विणकरांचे अधिक हित साधण्याच्या हेतूने हातमाग-क्षेत्राच्या विकासासाठी नवी योजना तयार करणे.

१०. जनता कापडाचा दर्जा आणि त्याचा पुरवठा यात सुधारणा करणे.

११. शहरातील, गावातील व शहरे उभारण्यास योग्य अशा भागातील जमिनीच्या मालकीवर आणि रिकाम्या जमिनीच्या मालकीवर कमाल मर्यादा घालण्यासाठी, जादा जमीन ताब्यात घेण्यासाठी आणि त्यांचे सामाजीकरण करण्यासाठी कायदे करणे. नव्या निवासस्थानांच्या क्षेत्रफळांवर मर्यादा घालणे.

१२. बेकायदेशीर बांधकामांचे योग्य मूल्यमापन करून त्यावरील करचुकवेपणास आळा घालणे व त्यासाठी खास पथकांची उभारणी करणे. आर्थिक गुन्हेगारांवर त्वरित खटले भरणे आणि त्यांना कडक शिक्षा करणे.

१३. तस्करांची मालमत्ता जप्त करण्यासाठी खास कायदा करणे, बेनामी मालमत्ता जप्त करणे.

१४. गुंतवणुकीची पद्धती सुलभ करणे, आयातपरवान्याच्या दुरुपयोगाविरुद्ध कार्यवाही करणे.

१५. उद्योग–व्यवसायात कामगारांच्या सहभागासाठी नव्या योजना आखणे.

१६. रस्ते–वाहतुकीच्या सुलभतेसाठी राष्ट्रीय–परवाना–पद्धती सुरू करणे.

१७. मध्यमवर्गाला प्राप्तीकरात सूट. प्राप्तीकरपात्र रकमेची किमानमर्यादा ६००० रु. पासून ८००० रु. पर्यंत वाढवून देण्यात येईल.

१८. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अत्यावश्यक वस्तू नियंत्रित दरात उपलब्ध करून देणे.

१९. शालेय क्रमिक पुस्तके आणि अन्य साहित्य सर्व घरांतील विद्यार्थ्यांना नियंत्रित दरात उपलब्ध करून देणे.

२०. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांतील लोकांना चांगले प्रशिक्षण मिळावे आणि रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून कारखान्यातील उमेदवारी प्रशिक्षणाची योजना (अॅप्रेंटिसशिप) अधिक विस्तारित केली जाईल.

२१. हातमागव्यवसायाला मदत करण्यासाठी हातमाग विभागासाठी स्वतंत्र विकास आयुक्त नियुक्त करणे. ◻

---

**पुणे विद्यापीठाच्या एस्. वाय्. बी. कॉमच्या जून ७५ मध्ये झालेल्या परीक्षेत श्री. श्यामकान्त देशपांडे हे पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत, असे नुकत्याच जाहीर झालेल्या निकालावरून समजते.**

चट्टोपाध्याय म्हणाले—कापडउत्पादनातील २५ टक्के वाढीमुळे १९७८ पर्यंत दरमाणशी १३·५ चौरस मीटर्सपर्यंत सुती कापडाची उपलब्धता होऊ शकेल. किरकोळ कापडविक्री केंद्रांपैकी ७५ टक्के केंद्रे ग्रामीण भागात व २५ टक्के नागरी भागात आहेत. कमी उत्पन्नाच्या गटाच्या विद्यार्थ्यांसाठी माफक किंमतीत पुस्तके व वह्या मिळावयाची आहेत. या योजनेचा तपशील व अंमलबजावणी विशेष काटेकोरपणे करण्यात येणार आहे.

## शेती व औद्योगिक उत्पादनवाढीसाठी कडक परवानापद्धती

या आर्थिक कार्यक्रमात भांडवल-गुंतवणूक व उत्पादन यावर विशेष भर आहे. परवानापद्धती अधिक सुलभ होणार आहे. अनावश्यक व जिकिरीच्या परवानापद्धतीबरोबरच भांडवल-उभारणीबाबतच्या पद्धतीतही सुधारणा करण्यात येणार आहे; त्यामुळे आयातपरवान्याच्या दुरुपयोगास पायबंद घालण्यात येणार आहे.

## पाणीपुरवठा व विद्युतयोजना

शेती आणि उद्योग यांची वाढ होण्याकरिताही या कार्यक्रमात तरतूद आहे. त्यासाठी पाणीपुरवठा आणि विद्युत्-उत्पादनयोजनांना अग्रक्रम मिळणार आहे. कारण कृषि व औद्योगिक उत्पादनवाढीसाठी हमखास पाणीपुरवठा आणि अखंडित विद्युतपुरवठा यांना महत्त्व आहे. या दृष्टीने आणखी ५० लक्ष हेक्टर्स जमीन पाणीपुरवठ्याखाली आणण्यात येणार आहे. भू-पृष्ठाखालील पाण्याच्या योग्य वापरासाठी राष्ट्रीय कार्यक्रम तयार करण्यात येऊन त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी १९७५–७६ साली मोठ्या व मध्यम पाटबंधारे योजनांसाठी ४६८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच वीजउत्पादन कार्यक्रमाची गती वाढविण्यासाठी नजीकच्या काळात मोठी औष्णिक केंद्रे उभारणीचे कार्य केंद्र सरकारच्या अधिकाराखाली हाती घेतले जाईल. मोठी औष्णिक केंद्रे उभारून चालू केंद्रांची क्षमता वाढवून चालू वर्षात आणखी २६०० मेगॅवॅट वीज उत्पादन करण्यात येणार आहे. दरम्यानच्या काळात चार अवजड औष्णिक केंद्रे उत्तर-प्रदेश, मध्य प्रदेश, प. बंगाल आणि तामीळनाडू येथे उभारण्यात येणार आहेत. उत्तर विभागातील उत्पादन ३३ टक्क्यांनी आणि पश्चिम विभागातील उत्पादन १० टक्क्यांनी वाढविण्यात येणार आहे. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स यांनीही काही नवीन विभाग उघडून सुट्या भागांचे उत्पादन वाढविले आहे. राज्य विद्युत्‌महामंडळांची पुनर्रचना करून त्यांचे कार्यक्षेत्र अधिक विस्तृत करण्यात येणार आहे. तसेच जलवाहतूकीसाठी देशभर कोठेही संचार करण्याचे परवाने वाहनांना दिले जाणार आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील मालवाहतूक वेगवान होईल.

## मजुरांची सहभागी

औद्योगिक क्षेत्रात मजुरांच्या सहभागीवरही (Worker's Participation) या कार्यक्रमात भर आहे. या कार्यक्रमानुसार, कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करण्याच्या दृष्टीने सरकारी व खाजगी क्षेत्रात येत्या काही महिन्यांत निश्चित पावले टाकली जातील. तसेच कामगारांच्या कल्याणासाठी एक खास गुंतवणूकयोजनाही तयार करण्यात आली आहे. त्यामुळे जवळजवळ एक कोटी मजुरांना फायदा होणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लोकांना चांगले प्रशिक्षण मिळावे आणि रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून कारखान्यातील उमेदवारी शिक्षणाची (अॅप्रेंटिसशिप) योजना अधिक विस्तारित केली जाईल.

या दोन्ही क्षेत्रांतील संकलित विविध उपाययोजनांमुळे देशाची अन्नधान्य आणि औद्योगिक आघाडी सावरण्यास खूपच मदत होणार आहे. अर्थमंत्री श्री. सुब्रमण्यम् यांनी ३० जुलै रोजी संसदेत चालू आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना सांगितले—संकलित आर्थिक उपाययोजनांमुळे देशाचे राष्ट्रीय उत्पादन १९७५–७६ मध्ये ५ ते ६ टक्क्यांनी वाढेल. गतवर्षी ही वाढ फक्त २ टक्के होती. औद्योगिक ६ ते ७ टक्के वाढेल, तसेच ६९० लक्ष टनांचे खरीप लक्ष्य गाठले जाईल अशी अपेक्षा आहे.

चलनफुगवटाविरोधी उपाययोजना म्हणून यापुढे पतपुरवठा करताना बरीच काळजी घेण्यात येईल. पंतप्रधानांनी चैनबाजीच्या जीवनाबद्दल नापसंती दर्शवून काटकसरीचा अवलंब सर्व थरांवर करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. या दृष्टीने केंद्र व राज्यसरकारांनी अनावश्यक कार्यक्रम, प्रकल्प यांना कात्री लावण्याचे ठरविले आहे.

हा आर्थिक कार्यक्रम तातडीने अंमलात आणण्यात सरकारचा निर्धार असला आणि त्या दृष्टीने पावले टाकण्यास केंद्र व राज्यसरकारांनी सुरुवातही केली असली तरी देशातील दारिद्र्य केवळ जादूची कांडी फिरवून नष्ट होणार नाही. त्यासाठी दूरदृष्टी, दृढनिश्चय, कठोर शिस्त आणि अविश्रांत कष्ट यांची आज गरज आहे.

☘



# वाचकांची पत्रे

श्री. परचुरे यांस स. न. वि. वि.  २४-५-७५

आपले ता. २५-४-७५ चे पत्र व अर्थचा नवीन स्वरूपातील अंक पोचला. त्याबद्दल आभारी आहे. आपण या जुन्या साप्ताहिकाचे पुनरुज्जीवन केलेत याबद्दल अभिनंदन. आपल्या कार्यात माझ्याकडून सर्व प्रकारचे सहकार्य देण्याचे आश्वासन आपल्याला देतो. निःसंकोचपणे कळवावे व प्रसंगी हक्काने मागून घ्यावे. कळावे

नी. वि. सोवनी
गोखले इन्स्टिटयूट, पुणे

संपादक अर्थ यांस न. वि.  ११-४-७५

आपण दर्जेदार मासिक काढाल असा विश्वास वाटतो. वर्गणीचे चेक पोचल्याचे उलटटपाली कळवावे. अर्थशास्त्रीय विषयावर वृत्तपत्रात लिहिणारा म्हणून मी काही सामान्य वाचकांना माहीत आहे. जुन्या काळी टिळक विद्यापीठाची पदवी मी मिळविली; पण आजच्या अर्वाचीन विद्यापीठीय विद्वत्ता मला नाही. आपल्या मासिकात लेखन करावे असे वाटते. उपक्रमाबद्दल शुभेच्छा.

गां. बा. माडगीळ
सितारामभुवन, गोखले रोड,
मुंबई २८.

१२-५-१९७५

प्रिय मा. श्री. कमलाकर परचुरे
सा. न. वि. वि.

आपल्या अर्थ मासिकाचा वर्षप्रतिपदेचा एप्रिल ७५ चा अंक मिळाला. आपण अर्थ मासिकाचे पुनरुज्जीवन करून ते नव्या दृष्टीने आणि नव्या जोमाने चालविण्याचे ठरवून ते चालवीत आल्याबद्दल मला समाधान वाटले. त्याबद्दल आपले अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो, धन्यवाद देतो व आभार मानतो.

समाजाचे जीवन समर्थ आणि संपन्न करण्यासाठी अनेक अंगांनी प्रयत्न करावे लागतात. समाजाचे परिवर्तन अनेक अंगांनी घडत असते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक दृष्टीने समाजाला मार्गदर्शन करण्याची गरज असते. त्यापैकी आर्थिक अंग हा विषय महत्वाचा आहे. अर्थ मासिकद्वारा या महत्वाच्या अंगाचे शिक्षण आणि समाजाचे आर्थिक जीवन योजनाबद्ध रीतीने प्रगत करण्याचे काम आपण करीत आहात. खरोखरच या महत्वाच्या कामासाठी मी पुन्हा एकदा आपले अभिनंदन करतो आणि आपल्या कार्याला सुयश चिंतितो.

आपला अर्थचा अंक नियमितपणे पाठवून देत असावे आणि वेळोवेळी काही विशेष कामासाठी आपण मला जरूर लिहीत असावे.

कळावे ही विनंती.

रत्नाप्पा कुंभार
अन्न व नागरी पुरवठा मंत्री
महाराष्ट्र शासन
सचिवालय, मुंबई ३२

प्रिय श्री. परचुरे,  नागपूर, १५-५-१९७५
स. न. वि. वि.

आपले दिनांक २५ एप्रिलचे पत्र व त्यासोबत पाठविलेला अर्थ या मासिकाचा अंक मिळाला. स्मरणपूर्वक आपण अंक पाठविला त्याबद्दल फार आभारी आहे. आपले हे मासिक वाचकांना उपयुक्त ठरेल अशी मी आशा करतो. कळावे.

दे. ब. मोहोकर
एम. ए. एलएल. बी.,
बी. एम. एफ. एम. डी. लिट.,
कुलगुरु

मा. प्रिय श्री. कमलाकर,  १८-५-७५
स. न. वि. वि.

आपले अर्थ मासिकाविषयी लिहिलेले पत्र पोहोचले. मी आपला आभारी आहे. स्तुत्य व आवश्यक उपक्रम म्हणून आपणास माझे हार्दिक धन्यवाद.

अर्थ नियतकालिकासाठी लौकरच माझा लेख पाठवीत आहे. कळावे ही विनंती.

तात्यासाहेब कोरे
श्रीवारणा सहकारी साखर कारखाना लि.
वारणानगर, जि. कोल्हापूर

सप्रेम नमस्कार— ४–७–७५

अर्थचा जून ७५ चा अंक मिळाला. आभार. दोन दिवसांपूर्वी स्टॅंपपावती माझ्या वर्गणीच्या चेकची मिळाली. दरम्यान मे ७५ चा दुसरा अंक अजून आलाच नाही ! का असे व्हावे ? कृपया त्या अंकाची प्रत लगेच धाडावी.

पुरुषोत्तम गणेश मावळंकर
लास्की इन्स्टिटयूट, अहमदाबाद

प्रिय प्रा. कमलाकर परचुरे यांना २६–५–७५
स. न. वि. वि.

आपण अर्थच्या संपादकत्वाची धुरा स्वीकारलीत. धन्यवाद व अभिनंदन. आपले अर्थचे अंक वाचले. त्यातील 'आलोक' सदर माझ्या माहितीप्रमाणे मराठी मासिकात प्रथमतः येत आहे. हे सदर माहितीपूर्ण व अद्यावत वाटले. अर्थचा संबंध विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर यावा हा आपला उद्देश अत्यंत योग्य आहे. महाराष्ट्रात महाविद्यालयांची संख्या वाढली असताना त्याचेशी संपर्क ठेवून त्यांना विचारमंथनासाठी प्रवृत्त करण्याचे आपले काम शैक्षणिक विकासास अत्यंत पूरक आहे. कळावे.

एम्. बी. नाचण
रयत शिक्षण संस्थेचे
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर

संपादक अर्थ–स. न. वि. वि.

आम्हांस वर्षअखेरीस संपूर्ण सेट बाइंड करून घेणेस सर्व अंकांची जरुरी आहे. करिता कृपया आपले पहिले प्रसिद्ध झालेले अंक पाठवून देणेची व्यवस्था करावी.

मा. श्री. कामत (प्राचार्य)

प्रिय महोदय, २७–५–७५

अर्थसंबंधीचे आपले प्रदीर्घ कृपापत्र मिळाले. तदर्थ धन्यवाद. अर्थ आजच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनातील अनिवार्य अशी गरज म्हणून अर्थ काढण्यामागील आपल्या विचारांशी व हेतूंशी आम्ही पूर्णतः सहमत आहोत. अर्थची वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवीत आहे. धन्यवाद. कळावे.

सदाविजय आर्य, प्राचार्य
धनंजयराव गाडगीळ को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज
सहकारमंदीर, P. B. 328, महाल, नागपूर

म. न. १९–४–७५

पत्रक वाचून मासिकाबद्दलच्या आशा फार उंचावल्या आहेत. मी आपल्या मासिकाचा वर्गणीदार होऊ इच्छितो. उपक्रमास सुयश चिंतितो.

म. ल. बागळे
सारस्वत हितवर्धक मंडळ वाडी
शिवाजीपार्क रोड नं. ५
मुंबई नं. १६

स. न. वि. १७–४–७५

काल आपण दोघे आलात; पण मी टी. व्ही. वरील एक महत्त्वाचा कार्यक्रम पाहण्यात गुंतलेला असल्याने आपल्याशी फार बोलू शकलो नाही याबद्दल माफ करा. 'अर्था 'बद्दलची माझी अक्षमता मी व्यक्त केली आहेच. इतर विषय तुमचे तुम्ही ठरवा–पण मराठीतून अर्थशास्त्राचा अभ्यास करणारांना हे नियतकालिक खास उपयोगी पडावे अशी त्याची रचना व्हावी असे वाटते. त्या दृष्टीने 'आलोक' ह्या सदराची रचना करता येईल आणि ते एकाच व्यक्तीने लिहिले पाहिजे असे नाही. मा आपल्या उपक्रमास सुयश चिंतितो.

प्रभाकर पाध्ये

स. न. ७–५–७५

अर्थच्या वर्षप्रतिपदा अंकाची प्रत पाठविल्याबद्दल धन्यवाद. अंक चांगला काढला आहे.

गो. स. कामत
वैकुंठ मेहता इन्स्टिटयूट, पुणे १६

Dear Sir,

We are thankful to you for prosiding us an information about the publication of Artha Journal on monthly basis.

We are happy to subscribe for the same. We

may kindly be informed about our subscriber No.

Thanking you.

Yours faithfully,
Sd/– R. S. Deshpande
Vice Principal

१९–५–७५

प्रिय कमलाकर परचुरे यांना स. न. वि.

अंक मोठा वाचनीय आणि अपेक्षा वाढविणारा आहे हे निर्विवाद. आपल्या नवीन उपक्रमाला सुयश लाभो ही प्रार्थना. कळावे.

व्यं. सु. पाटणकर
अर्थशास्त्रविभाग
एस्. एस्. व्ही. पी. कॉलेज, धुळे

स. न.

आपण खंडित झालेले अर्थ मासिक पुन्हा चालू केल्याचे महाराष्ट्र टाइम्सच्या टिपणीवरून कळले. उपक्रमाबद्दल धन्यवाद. मी स्वतःच मराठी भाषेतून आर्थिक विषयावरील नियतकालिक सुरू करण्याचा येथून प्रयत्न करीत होतो. असो.

दिनकर बोरीकर
सरस्वतीभुवन कॉलेज, औरंगाबाद

---

व्यवसाय मार्गदर्शनावरील लेखांबद्दल प्रशंसा करणाऱ्या, तसेच मार्गदर्शन-पुस्तिकांची मागणी करणाऱ्या काही वाचकांची नावे व पत्ते—

---

१. सर्वश्री आर्. एस्. कुलकर्णी M. A. ( फिलॉसॉफी ) व M. A. ( Politics ), २६११ ए वॉर्ड, कोल्हापूर.
२. हे. भ. भारदे, B. Sc. ( Hon. ), मॅथेमॅटिक्स.
३. रत्नाकर महाजन, विश्वासनगर, रूम नं. ४. औरंगाबाद.
४. ल. ओ. पाटील, मु. पो. टेकावडे, ता. शिरपूर, जि. धुळे.
५. व्ही. के. जोशी, C/o एच्. व्ही. आरे, चेंडक बंगला, रेव्हेन्यू कॉलनी, मार्केट यार्डसमोर, सांगली.
६. संजीव माधवराव कुलकर्णी, दगडुलाल शर्मा यांचा वाडा, सुळगल्ली, लातूर.
७. एस्. बी. रानडे, ३२०२, A वॉर्ड, कोल्हापूर.
८. मोगल ए. एम्. मु. पो. नातेपुते, माळशिरस, जि. सोलापूर.
९. कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली.
१०. प्र. गो. कदम, एम्. ए., मु. पो. मसूची वाडी, ता. वाळवा, जि. सांगली.
११. महादेव वामनराव कटके, बी. ए. मु. पो. उंबडीबाजार, ता. मूर्तिजापूर, जि. अकोला.
१२. ना. ल. गणवीर, सहाय्यक इंजिनिअर कार्यालय (पूर्व) मध्य रेल्वे, अकोला.
१३. व्ही. व्ही. जोशी, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणतांबा.
१४. लक्ष्मण माधवराव बंडगर, C/o बी. ए. चौगुले, नरसिंगगिरजी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर.
१५. शहाजी जी. पाटील, मु. पो. जामखेड, ता. अहमदनगर.
१६. के. जी. वादकर, मु. पो. शिरूर ( कासार ) व्हाया अमळनेर, ता. पाटील, जि. बीड.
१७. सुधीर बाळकृष्ण रानडे, ३२०२ / A वॉर्ड, कोल्हापूर.
१८. मधुकर लक्ष्मण भरत, कृषिसेवा, कचोरी रोड, बारामती.
१९. भारत विश्वास मोरे, मु. पो. म्हसवड, ता. माण, जि. सातारा.
२०. सूर्याजीराव डी. पाटणकर, बी. ए., एल्‌एल्. बी., ॲडव्होकेट, ६३ मंगळवार पेठ, कऱ्हाड.
२१. प्रिन्सिपल, चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली.
२२. बी. जी. काकड, बँक ऑफ महाराष्ट्र, मु. पो. वडनेर भैरव ता. चांदवड, जि. नासिक.
२३. व्ही. के. जोशी, लेले ब्लॉक, बापट कॉलनी, मार्केट यार्डसमोर, सांगली.
२४. गणेश ब. दुबड, मु. कासमपुरा, पो. लोहारा, ता. पाचोरा, जि. जळगाव.
२५. प्यारेलाल डी. मुन्शी, स्टेशनरोड, चाळिसगाव, जि. जळगाव.

# धंदा, नीती आणि प्रतिष्ठा

पूर्वी एका रेसिंग स्टेबल्समध्ये शिकाऊ जॉकी म्हणून दाखल झालेल्या परंतु आता यशस्वी ट्रेनर बनलेल्या एक अश्वप्रेमी माणसाची ही हकीकत आहे. ट्रेनर म्हणून त्याचे उत्तम चालले होते; परंतु तो स्वतःवरच नाराज होता. आपण आणखी काही तरी करायला हवं असून आपण ते करीत नाही, ह्याची त्याला बोच होती. एके दिवशी त्याला परदेशातील एका अग्रेसर जॉकी क्लबाचे पत्र आले; त्या क्लबाने त्याला मोठ्या पगारावर नेमणूक करण्याची तयारी दाखविली होती. ह्या क्लबाच्या वर्तुळात बराच भ्रष्टाचार माजलेला असून घोड्यांना नियमबाह्य इंजेक्शने दिली जातात आणि हे थांबविण्याची कामगिरी त्याने बजाविण्याची होती. हे आव्हान त्याने पत्करले. अनिष्ट प्रकार आटोक्यात आणले; परंतु घोड्यांना निष्कारण क्रूरतेने वागविले जाते, असे त्याला आढळले. त्याने प्रत्येक घोड्याकडे वैयक्तिक लक्ष पुरविले; घोड्यांवरील त्याच्या प्रेमाचा तेथील नोकरवर्गावरही प्रभाव पडू लागला. जे स्वतःला पटते ते बोलून दाखवायचे आणि बोलून दाखवायचे त्याप्रमाणे वागायचे, अशा वृत्तीमुळे ह्या सामान्य माणसाने किती तरी भलेपणा निर्माण केला.

केवळ पैशाकरिता स्वतःच्या भावना आणि आवडी-निवडी बाजूस सारून, स्वतःचे हास्य, प्रेम, शारीरिक सौंदर्य आणि वासनासुख ह्यांची विक्री करणाऱ्यांना वेश्या असे म्हणतात; परंतु केवळ पैशासाठी स्वतःची मने–विचार–भावना गुंडाळून ठेवून, स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला डावलून, स्वतःला नापसंत असलेल्या उद्दिष्टांसाठी स्वतःला न पटणाऱ्या गोष्टी करणाराही तसेच वागत असतो, नाही का ? स्वतःच्या कलाविरुद्ध मुद्दाम अश्लील वाङ्मय लिहिणारा आणि प्रकाशित करणारा, केवळ भरपूर पैसा मिळतो म्हणून समाजकंटकांना वाममार्गाने सोडविणारे फौजदारी वकील, कलात्मक चित्राची अभिरुची असलेला परंतु मागणीप्रमाणे चित्रे काढून देणारा चित्रकार, गिऱ्हाइकांच्या ‘भलत्या’ आवडींना पोषक असा माल तयार करणारे कारखानदार, औषधात भेसळ करून विकणारे व्यापारी हे सर्व जण (ही यादी आणखी किती तरी वाढविता येईल.) शरीराचा नव्हे तरी मनाचा व्यभिचारच करीत असतात.


मन मारून काम करावे लागणाऱ्या गरजवंतांबद्दलही असेच म्हणता येईल. ‘बुभुक्षितः किं न करोति पापं’ अशी त्यांची अवस्था असल्यामुळे ते मनाला न पटणारे, न रुचणारे कामही करण्यास उद्युक्त होतात; म्हणजे मानसिक व्यभिचार करतात. सवयीमुळे ह्या व्यभिचाराची जाणीवही नाहीशी होऊ लागते. पैसे मिळू लागले म्हणजे अधिकाधिक मिळवावेसे वाटतात आणि समाजविघातक अशा व्यवहारातून श्रीमंत होण्याची वासना बळावत जाते.

कोणताच धंदा शंभर टक्के पवित्र आणि निर्दोष असत नाही. शुद्धता आणि अशुद्धता ह्यांचे मिश्रण त्यात आढळते. समजा काही धंदे बव्हंशी निर्दोष असले, तरी त्यात किती लोकांना काम मिळणार ? तेव्हा, जो धंदा आपल्या वाट्याला येईल, त्यात आपण किती शुद्धता राखू शकू, ह्यावरच आपल्या जीवनाचे सार्थक अवलंबून राहील. काही वेश्यांच्या व्यवसायात व्यवहारशुद्धी असेल, तर ब्रह्मज्ञान सांगणारे काही आश्रमवासी छुपे वेश्याचार्य असू शकतील. म्हणजे, तुलनेने तेच अधिक व्यभिचारी ठरतील. प्रारंभीच्या उदाहरणातील रेसिंगचा धंदा हा काही सामाजिक हिताचा म्हणता येणार नाही; तरीसुद्धा त्यातील काही लोक स्वयंप्रेरणेने तेथील अशुद्धता कमी करू शकतात, असे दिसून येते. अशा नेकीच्या सामान्य माणसांच्या व्यवहारशुद्धीवरच बड्यांचा व्यभिचार चालू असतो. त्यांच्या संसर्गाने तो आजूबाजूला आणि खाली खाली पसरतो आणि समाजाला ग्रासू लागतो.

वरील ओळी लिहून संपत असतानाच मला अहमदाबादहून एक फोन आला. ‘बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या शिवचरित्राचा सेकंडहॅंड पहिला खंड येथे मिळत आहे; तसाच दुसरा खंड पुण्यात कुठे मिळतो का, ते पहा’ हे सांगण्यासाठी ! कंपनीचा किंवा सरकारी फुकटचा फोन; तेव्हा बोलणे लवकर संपविण्याचीही त्याला गरज नव्हती. प्रत्येक चार सेकंदांना एक कॉल, ह्या गतीने मीटर फिरून जनतेचा पैसा उधळला जात होता. असे असंख्य प्रकारचे व्यभिचार समाजाच्या ऱ्हासास कारणीभूत होत असतात.

– श्री.पा.काळे

सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.


लहानशा जलाशयात,
आकाशाचे प्रतिबिंब !
छोट्या गोष्टीतही कितीतरी मोठी शक्ति दडलेली असते. रोज फक्त वीस पैशांची बचत करा पाच वर्षांनी ४२५ रुपये परत घ्या.
बँक ऑफ महाराष्ट्रची
लोकमंगल
दैनिक ठेव योजना
● २० पैशांची छोटी बचत बँकेचा अधिकृत प्रतिनिधी रोज तुमच्या घरी येऊन घेऊन जाईल.
● चार वर्षांनी ६ टक्के व्याजासह तुमची रक्कम परत केली जाईल
तुमच्या व्यक्तिगत गरजा भागविण्यासाठी तयार केलेल्या वरीलप्रमाणेच आणखी अनेक योजना आमच्या जवळ उपलब्ध आहेत. सविस्तर माहितीसाठी आमच्या नजिकच्या शाखेस भेट द्या. तुमच्या संकटकाळात उपयोगी पडणारा एकमात्र जिवलग मित्र.
M B
बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.
PRATIBHA 7414